जुलै २०१२ | किंमत : ₹१०

# लोकराज्य



RABHA

## शिक्षणाचा आधार, जीवनाचा उद्धार

# अब्राहम लिंकन यांचे गुरुजींना पत्र

प्रिय  गुरुजी,

सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात;
नसतात सगळीच सत्यनिष्ठ
हे शिकेलच माझा मुलगा कधी ना कधी
मात्र त्याला हे देखील शिकवा–
जगात प्रत्येक बदमाशागणिक,
असतो एक साधुचरित पुरुषोत्तमही.
स्वार्थी राजकारणी असतात जगात,
तसे असतात अवघं आयुष्य समर्पित करणारे नेतेही.
असतात टपलेले वैरी तसे जपणारे मित्रही.

मला माहीत आहे;
सगळ्या गोष्टी झटपट नाही शिकवता येत.
तरीही जमलं तर त्याच्या मनावर ठसवा,
घाम गाळून कमावलेला एकच छदाम
आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान आहे.

हार कशी स्वीकारावी ते त्याला शिकवा
आणि शिकवा विजयाचा आनंद संयमाने घ्यायला
तुमच्यात शक्ती असली तर
त्याला द्वेष, मत्सरापासून दूर रहायला शिकवा
शिकवा त्याला आपला हर्ष संयमानं व्यक्त करायला
गुंडांना भीत जाऊ नको म्हणावं,
त्यांना नमवणं सर्वात सोपं असतं!
जमेल तेवढं दाखवीत चला त्याला
ग्रंथभांडाराचं अद्‌भुत वैभव
मात्र त्याबरोबरच मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा
सृष्टीचं शाश्वत सौंदर्य अनुभवायला
पाहू दे त्याला पक्ष्यांची अस्मानभरारी.
सोनेरी उन्हात भिरभिरणारे भ्रमर...
आणि हिरव्यागार डोंगर उतारावर
डुलणारी चिमुकली फुलं
शाळेत त्याला हा धडा मिळू दे –
फसवून मिळालेल्या यशापेक्षा सरळ आलेलं अपयश
श्रेयस्कर आहे.

आपल्या कल्पना, आपले विचार
यांच्यावर दृढ विश्वास ठेवायला हवा त्यानं.
बेहत्तर आहे सर्वांनी त्याला चूक ठरवलं तरी
त्याला सांगा,
त्यानं भल्यांशी भलाईनं वागावं
आणि टग्यांना अद्दल घडवावी.

माझ्या मुलाला हे पटवता आलं तर पहा–
जिकडे सरशी तिकडे धावत सुटणाऱ्या भाऊगर्दीत
सामील न होण्याची ताकद त्यानं कमवायला हवी.
पुढे हेही सांगा त्याला,
ऐकावं जनाचं, अगदी सर्वांचं.
पण गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून,
आणि फोलपटं टाकून
निकं सत्त्व तेवढं स्वीकारावं.
जमलं तर त्याच्या मनावर बिंबवा–
हसत राहावं ऊरातलं दु:ख दाबून
पण म्हणावं त्याला
आसू ढाळायची लाज वाटू देऊ नकोस.
त्याला शिकवा...
तुच्छवाद्यांना तुच्छ मानायला
अन् चाटुगिरीपासून सावध रहायला.

त्याला हे पुरेपूर समजवा की
करावी कमाल कमाई त्याने
ताकद आणि अक्कल विकून.
पण कधीही विक्रय करू नये
हृदयाचा आणि आत्म्याचा!
धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या तर
काणाडोळा करायला शिकवा त्याला
आणि ठसवा त्याच्या मनावर
जे सत्य आणि न्याय्य वाटते
त्याच्यासाठी पाय रोवून लढत रहा.

त्याला ममतेने वागवा पण
लाडावून ठेवू नका.
आगीत तावून सुलाखून निघाल्याशिवाय
लोखंडाचं कणखर पोलाद होत नसतं.
त्याच्या अंगी बाणवा अधीर व्हायचं धैर्य
पण धरला पाहिजे धीर त्यानं
जर गाजवायचं असेल शौर्य.
आणखीही एक सांगत रहा त्याला–
आपला दृढ विश्वास पाहिजे आपल्यावर
तरच जडेल उदात्त श्रद्धा मानवजातीवर.

माफ करा गुरुजी! मी फार बोलतो आहे
खूप काही मागतो आहे .
पण पहा... जमेल तेवढं अवश्य कराच.

माझा मुलगा–
भलताच गोड छोकरा आहे हो तो.

रुपांतर – वसंत  बापट

वर्ष ६४ वे | अंक ४ | जुलै २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| व्यवस्थापकीय संपादक | प्रल्हाद जाधव |
| संपादक | सुरेश वांदिले |
| कार्यकारी संपादक | प्रभाकर मुराळकर |
| विशेष साहाय्य | कीर्ती पांडे<br>क्रिती लाला |
| उपसंपादक | किरण केंद्रे |
| प्रशासन व वितरण अधिकारी | दिगंबर पालवे |
| वितरण अधिकारी | विलास बोडके |
| छायाचित्रे | वीरेंद्र धुरी,<br>राजू डोंगरे,<br>योगेश तांदळे,<br>प्रज्ञेश कांबळी |
| साहाय्य | सुधाकर गायकवाड |
| मुखपृष्ठ | राभा |
| मांडणी, सजावट | संदीप पवार |
| मुद्रण | एच. टी. मीडिया लि.<br>दिघे, ठाणे-बेलापूर<br>रोड, नवी मुंबई |



संपादकीय पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.

संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

**e-mail :** lokrajya@dgipr.maharashtra.gov.in

ई-लोकराज्यसाठी
**Website :** http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

**e-mail :** lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com


# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| तिमिरातून तेजाकडे... | संपादकीय | ५ |
| पारंपरिक चौकटींच्या बाहेर | मुख्यमंत्री | ६ |
| शिक्षण जगण्याचे साधन बनायला हवे | उपमुख्यमंत्री | ७ |
| नव्या बदलांचे प्रतिबिंब | राजेंद्र दर्डा | ८ |
| शिक्षणातून सक्षमीकरण | फौजिया खान | १० |
| ऋषिपरंपरेतील प्राचार्य- स्वयंभू गुरुकुल | राधाकृष्ण मुळी/यशवंत भंडारे | ११ |
| आमची शाळा-आमचा अभिमान | सोमनाथ पाटील | १४ |
| महाराष्ट्र : शिक्षणाची प्रयोगशाळा | किरण केंद्रे | १७ |
| आमचं शिक्षण-आमचा हक्क | अर्चना शंभरकर | २० |
| आयुष्याच्या सी.ई.टी.चं शिक्षण | डॉ. सागर देशपांडे | २२ |
| आम्ही वैज्ञानिक घडवतो | शुभदा चौकर | २५ |
| मानदंडाची प्रतिष्ठा | टीम लोकराज्य | २६ |
| अग्निपरीक्षा | छायाचित्र कथा | ३० |
| शिका आणि सक्षम व्हा! | अजय जाधव | ३५ |
| आमचं शिक्षण, आमचं सामर्थ्य | मुक्ता पवार | ३८ |
| मुख्य प्रवाहात अल्पसंख्याक | नसीम खान | ४० |
| सामान्य लोकांची सेवा करायची आहे | रवी गिते | ४१ |
| चला सैनिक होऊया... | किरण वाघ | ४२ |
| स्पर्धा परीक्षेतील मराठी टक्का! | डॉ. सुनील धापटे | ४३ |
| बालभारतीचं विश्व | माधव राजगुरू | ४५ |
| सारे शिकुया पुढे जाऊया | आकाश जगधने | ४८ |
| ओऽऽऽ नागपूर | प्रवीण बर्दापूरकर | ४९ |
| कालिदासाच्या भूमीत | अनिल ठाकरे | ५४ |
| कुमारांसाठी माहितीचा खजिना | डॉ. चारुशीला ओक | ५६ |
| एच.आय.व्ही.ची तपासणी? | सुहेल जमादार | ५८ |



**'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...**

वार्षिक वर्गणी - वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.(प्रती अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)



*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# सप्रेम नमस्कार

### कृषी क्षेत्राला सुगीचे दिवस

'समृद्ध शेती : दौलत महाराष्ट्राची' हा कृषी क्षेत्राशी संबंधित विशेषांक खरीप हंगाम सुरू होताच वाचकांच्या हातात पडला. शेतकऱ्यांना अतिशय उपयुक्त व अभ्यासपूर्ण माहिती या अंकातून मिळाली. शिवाजी महाराजांच्या काळात ज्याप्रमाणे बळीराजाची काळजी घेतली जात होती, त्याचप्रमाणे आघाडी शासनाने कृषी विशेषांक प्रकाशित करून कृषी व्यवस्थापनाचे तंत्र शेतकऱ्यांच्या हाती दिले आहे. या अंकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती उपलब्ध करून दिल्याने कृषी क्षेत्राला नक्कीच सुगीचे दिवस येतील.

**– मधुकर किसन गामणे,** मखमलाबाद, नाशिक




### प्रेरणादायी

शेतीतील नवे तंत्रज्ञान, शेतकऱ्यांसाठी शासनाच्या योजना, शेतीचे नवे प्रयोग आदींची माहिती खूपच उपयुक्त आहे. लोकराज्यच्या जून २०१२ या अंकातील शेतकऱ्यांच्या यशोगाथा प्रेरणादायी आहेत.

**– राम गोंदके,**
मोखाडा, जि. ठाणे

### ज्ञानाचा खजिना

लोकराज्य हे मासिक दर्जेदार व अचूक माहितीने परिपूर्ण असते. ४५ लाख लोकांना या अंकातून माहिती व ज्ञानाचा खजिनाच मिळतो. माझ्यासारख्या खेड्यात राहणाऱ्या, चालू घडामोडी व सामान्य ज्ञानापासून वंचित असणाऱ्यांना लोकराज्य ही संजीवनीच होय. आपले हे दर्जेदार मासिक महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील मराठी वाचकांपर्यंत पोहोचवावे.

**– अविनाश राजाराम कोकरे**
मु.पो.झरे,
जि.सोलापूर.




### उत्तम अंक

**स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त प्रकाशित झालेल्या लोकराज्यच्या विशेषांकानंतर प्रथमच मी पत्र लिहीत आहे. अंक फारच छान झाला. लेखक व लेखांची निवड अतिशय उत्तम आहे. माझ्या लेखावर मला असंख्य टेलिफोन व एसएमएस आजपर्यंत येत आहेत. त्यातले काही मी संग्रही ठेवले आहेत. लोकराज्यचा इतका खप आहे याची मला कल्पनाच नव्हती. लोकराज्य महाराष्ट्राच्या खेड्या-पाड्यात जातो हेही कळले.**

**– राम खांडेकर, माजी पंतप्रधानांचे खाजगी सचिव, नागपूर**

### 'टंचाईचा सातबारा' आवडला

लोकराज्य मासिक मी सुरूवातीपासूनच वाचतो. त्यातील सगळेच लेख खूप अभ्यासपूर्ण असतात. नवनवीन माहिती मिळते. मे महिन्याच्या 'टंचाईवर मात' या विशेषांकातील 'टंचाईचा सातबारा' हा लेख आवडला. राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर यांची राज्य निर्मितीसंबंधी 'बोलणारी फाईल.. आणि उलगडणारा इतिहास' या शीर्षकाखालील लेखात एका नस्तीचे अंतरंग उलगडून दाखविले आहे. ही माहिती अत्यंत उपयुक्त व संग्रही आहे. लोकराज्यच्या कृषी विशेषांकातील यशकथा प्रेरणादायी आहेत. त्यातून कृषी क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग करण्याचा प्रयत्न निश्चितच होईल.


**– रवी पाटील,** चंदगड, जि.कोल्हापूर.




### टंचाईग्रस्तांना दिलासा

मे महिन्याच्या लोकराज्यच्या अंकातील सर्वच लेख तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या लेखातून टंचाई परिस्थितीत केलेल्या उपाययोजनांची माहिती मिळाली. विशेषत: 'या टंचाईच्या जीआरचं म्हणणं तरी काय?' या लेखात दिलेली माहिती सर्वच शेतकऱ्यांना उपयुक्त व संग्रही ठेवावी अशी आहे. यामुळे टंचाईग्रस्त भागातील शेतकऱ्यांना खरोखरच मोठा दिलासा मिळालेला आहे.

**– बाळासाहेब गवळी**
कामरगाव, जि.अहमदनगर




### आकर्षक व वैशिष्ट्यपूर्ण

**'लोकराज्य' मासिकातील माहितीमुळे वाचकांच्या ज्ञानात भर पडते. मी गेल्या आठ वर्षांपासून 'लोकराज्य' मासिकाचा नियमित वाचक आहे. सध्याचे 'लोकराज्य'चे स्वरूप खूप बदलले आहे. 'लोकराज्य'चा नवा चेहरा आकर्षक व वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा चेहरा या मासिकातून दिसतो. या मासिकात विविध विषयांवर सखोल माहिती आणि शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची व ध्येय-धोरणांची माहिती मिळते.**

**– संजय शिर्के, कोल्हापूर**

### संवादाचे प्रभावी माध्यम

लोकराज्यमुळे शासनाच्या योजनांची आणि विकासासाठी उचललेल्या पावलांची माहिती त्वरित मिळते. लोकराज्य हे सरकार व जनता यामधील संवादाचे प्रभावी माध्यम आहे. वाचकांना सकारात्मक विचार करावयास हे मासिक प्रवृत्त करीत आहे.

**– सचिन माने,** पुणे

# तिमिरातून तेजाकडे...



जुलै महिना हा नेहमीच चैतन्याने भारलेला असतो. श्रावणसरींनी आसमंत भिजून गेलेला असतो. विठुरायाचं दर्शन घेऊन शेतकरी नव्या ऊर्जेनिशी घराकडे परतलेला असतो. शाळा गजबजून गेलेल्या असतात. विविध महाविद्यालयांतील प्रवेशप्रक्रिया पूर्ण झालेल्या असतात. समाधान, आनंद, सौख्य यांनी वातावरण भारून गेलेलं असतं. गुरुपौर्णिमाही याच महिन्यात येते. या सर्व बाबी लक्षात घेऊन या अंकात शिक्षणाचे विविध पैलू स्पष्ट करणाऱ्या विषयांचा समावेश केला आहे.

गुरूपरंपरेचा थोर वारसा प्राचीन काळापासूनच महाराष्ट्राला लाभला आहे. ब्रिटीशांच्या काळातील युरोपियन शिक्षण पद्धतीमध्ये काळाच्या ओघात आमूलाग्र परिवर्तन झाले. अभिजन वर्गापुरते मर्यादित असलेले शिक्षण चौकटीच्या बाहेर पडून सर्वसामान्यांसाठी खुले झाले आहे. १९०१ साली देशाच्या साक्षरतेचा दर केवळ पाच टक्के होता. तो आता ७५ टक्क्यांच्या जवळपास पोहचला आहे. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबूल कलाम आझाद यांच्या दूरदृष्टीला त्याचे श्रेय जाते.

महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी शिक्षणाचे महत्त्व समाजातील सर्व थरापर्यंत पोहचवण्याचा अथक प्रयत्न केला. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य या पार्श्वभूमीवर अद्वितीय स्वरूपाचे ठरले आहे. सावित्रीबाईंच्या द्रष्टेपणामुळे सक्षम आणि समर्थ होण्याची प्रेरणा 'महाराष्ट्राच्या लेकींना' मिळाली आहे.

झपाट्याने बदलणाऱ्या जगाचा कानोसा घेऊन नवनवी क्षितिजे पादाक्रांत करण्याची दूरदृष्टी महाराष्ट्राच्या नेतृत्वाकडे असल्याने पारंपरिक शिक्षणासोबतच आधुनिक व अपारंपरिक अभ्यासक्रमांचा प्रारंभ महाराष्ट्रात प्राधान्याने केला गेला. सर्वसमावेशकता आणि आधुनिकता यांचा समन्वय साधणारे, देश पातळीवरील शिक्षण धोरणही महाराष्ट्राने अग्रक्रमाने राबवले. १९६६-६७ साली स्व. मधुकरराव चौधरी यांनी शिक्षण धोरणविषयक श्वेतपत्रिका काढली. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास आणि गुणवत्ता वाढीस त्यामुळे चालना मिळाली. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने सातारा येथे सैनिकी शाळेचा प्रारंभ झाला. शौर्याची प्रदीर्घ परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील बुद्धिमान विद्यार्थ्यांना सैन्यात अधिकारी पदासाठी नवी संधी देणारी ही घटना ठरली. ग्रामीण भागातील हुशार मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शासकीय पब्लिक स्कूलची स्थापना केली गेली. शासकीय विद्या निकेतन हे पुढे त्याचेच विस्तारित स्वरूप होय, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. विद्या निकेतनांनी महाराष्ट्राच्या दोन पिढ्या घडविल्या आहेत. या विद्या निकेतनांच्याच धर्तीवर वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी मॉडेल स्कूल्स काढण्यात आली. महाराष्ट्राचा हा शैक्षणिक गुणवत्ता विकास उपक्रम 'नवोदय विद्यालया'च्या स्वरूपात देशभर राबवण्यात आला.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात महाराष्ट्राने घेतलेली आघाडी कौतुकास्पद ठरली. माजी शिक्षणमंत्री स्व. रामकृष्ण मोरे यांनी पहिलीपासून इंग्रजीच्या धोरणाचा श्रीगणेशा केला. त्यामुळे महाराष्ट्रात नव्या शैक्षणिक पर्वाची सुरुवात झाली. 'स्मार्ट पीटी' (राज्यव्यापी प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण) या उपक्रमामुळे शाळांना आणि शिक्षकांच्या अध्यापन कौशल्याला नवी झळाळी लाभली. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात शासनासोबतच इतरही अनेक शैक्षणिक संस्थांनी वाटा उचलल्याने समाजातील सर्व घटक आणि थरांतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना आधार मिळाला.

माणसाला समंजस आणि प्रगल्भ बनविण्याचं कार्य शिक्षणामुळे घडतं. प्रगल्भ समाजामुळे समर्थ राष्ट्राची निर्मिती होते. आजच्या विद्यार्थ्यांची पिढी 'कूल' आणि 'स्मार्ट' असून आधुनिक जगातील सर्व प्रकारची आव्हाने स्वीकारण्याची आणि जग पादाक्रांत करण्याची त्यांची क्षमता आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थितीचं हे आशादायक चित्र या अंकाच्या रूपाने वाचकांसमोर ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्याची ज्योत पेटवून अंधकारमय जीवन जगणाऱ्या महाराष्ट्राला शिवाजी महाराजांनी स्वराज्याची ओळख दिली. त्याचप्रमाणे २०व्या शतकात शासन आणि सामाजिक संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नाने अज्ञानरूपी तिमिरातून शिक्षणाच्या दिव्य तेजाने महाराष्ट्राची ओळख देशात 'एज्युकेशन हब' अशी निर्माण झाली. या गौरवशाली परंपरेतील काही पैलू आणि नवी आव्हाने, यासंबंधीच्या लेखांचा समावेश आम्ही या अंकात केला आहे.

दिनांक २१ जून रोजी मंत्रालयाला लागलेल्या भीषण आगीच्या झळा केवळ शासकीय यंत्रणेलाच नव्हे तर उभ्या महाराष्ट्राला लागल्या. या अपघाताने खचून न जाता सारी यंत्रणा नव्या उमेदीने पुन्हा कामाला लागली आहे. कोणत्याही संकटाने डगमगून न जाता पुन्हा नवी आव्हाने स्वीकारणे हे महाराष्ट्राच्या प्रशासनाचे आणि मराठी माणसाचे वैशिष्ट्य आहे. या आगीचा मागोवा घेणारा एक विशेष वृत्तांतही आम्ही या अंकात प्रसिद्ध केला आहे. औरंगाबादेतील प्रतिभाशाली चित्रकार श्री. राभा यांनी चितारलेले मुखपृष्ठ आणि त्यांच्या अन्य चित्रांमुळे या अंकाचे मोल वाढले आहे. त्यांचे आभार मानत असतानाच लोकराज्यच्या कुटुंबात आम्ही त्यांचे स्वागत करीत आहोत.

वाचक या अंकाचे नेहमीच्याच उत्स्फूर्त पद्धतीने स्वागत करतील, असा आम्हाला विश्वास वाटतो.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in



# पारंपरिक चौकटींच्या बाहेर



**– मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण**

**उद्याचा भारत खऱ्या अर्थाने महाशक्ती बनवायचा असेल तर त्यात नव्या पिढीचा वाटा फार मोठा असणार आहे. हे लक्षात घेऊन यापुढे आपणाला ज्ञानाच्या ज्या पारंपरिक चौकटी आहेत त्यांना धक्का द्यावा लागेल. त्यासाठी खऱ्या अर्थाने ज्ञानाधिष्ठित समाज व्यवस्था, ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न करावे लागतील. त्यामध्ये शिक्षणक्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वाची राहणार आहे.**

Education is the most powerful weapon which you can use to change the world. – Nelson Mandela

दक्षिण आफ्रिकेमध्ये वर्णविद्वेषाविरोधी यशस्वी लढा दिलेले नेल्सन मंडेला यांनी या विधानातून शिक्षणाचे महत्त्व नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. शिक्षण ही विकासाची पहिली आणि अनिवार्य अशी पूर्वअट आहे, तर प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक नागरिकाच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे. साक्षरता किंवा सुशिक्षितपणा हा एखाद्या राज्याच्या किंवा राष्ट्राच्या उभारणीमध्ये अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडीत असतो. अज्ञानामुळे किंवा अविद्येने किती नुकसान होते, हे महात्मा जोतिबा फुले यांनीही 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ, एका अविद्येने केले' या त्यांच्या प्रख्यात रचनेतून अत्यंत स्पष्टपणे सांगून ठेवले आहे.

महाराष्ट्र ही अनेक सुधारणांप्रमाणेच शैक्षणिक सुधारणांचीही भूमी राहिली आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीचा मंगलकलश महाराष्ट्रात आल्यानंतर ज्या विषयांकडे अत्यंत दूरदृष्टीने लक्ष पुरवले गेले, त्यात शिक्षणाचा क्रमांक बराच वरचा लागतो. प्रत्येक क्षेत्रात पुरोगामी, नवविचार अंगीकारण्याची महाराष्ट्राची परंपरा फार जुनी आहे. यामुळेच महाराष्ट्रात शिक्षणाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे आणि प्राथमिक शिक्षणाला राज्य सरकारने वरचे प्राधान्य दिले आहे. सर्व शिक्षा अभियान असो की शिक्षणाचा अधिकार असो कोणत्याही योजनेची अत्यंत यशस्वी आणि फलदायी अंमलबजावणी महाराष्ट्रात झाली आहे.

आजचे युग जागतिकीकरणाचे आहे. विद्यार्थी बाहेरच्या जगातील स्पर्धेला समर्थपणे तोंड देऊ शकेल, याची काळजी अभ्यासक्रम निश्चित करताना घेतली पाहिजे. आधुनिक काळाशी सुसंगत असे शिक्षण आपल्या राज्यात देण्यात येत असले तरी त्यात सुधारणेसाठी बराच वाव आहे. स्थानिक परिस्थिती आणि उद्योगधंद्यांना लागणारे तांत्रिक मनुष्यबळ लक्षात घेता अशाप्रकारचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. आज सर्वच क्षेत्रात झपाट्याने प्रगती होते आहे. सर्व विद्याशाखांमध्ये नवनवी क्षेत्रे निर्माण होत आहेत. संशोधनाचे क्षेत्र विस्तारते आहे. शिक्षणाचा प्रसारही वेगाने होतो आहे. आजचा काळ ज्ञानाधिष्ठित समाजाचा आहे. माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे जग दाराशी आले आहे. जग हे वैश्विक खेडे बनले आहे. यापुढील समाजरचना ज्ञानाधारित असणार आहे. या सर्वांचा डोळसपणे विचार केला पाहिजे. तरुण पिढीने हे आव्हान पेलण्याची तयारी करून तशी क्षमता स्वत:मध्ये निर्माण केली पाहिजे.

आज शिक्षणाच्या बाबतीत आपण संख्यात्मकदृष्ट्या खूप प्रगती केली आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा शेवटच्या वाडी-वस्तीपर्यंत पोचली आहे. महाविद्यालये, विद्यापीठे, अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षण संस्था, वैद्यकीय शिक्षणसंस्था, कृषी विद्यापीठे आदींचीही संख्या समाधानकारक आहे. परंतु, आज आपला ग्रॉस एनरोलमेंट रेशो पाहिला तर केवळ साडेबारा टक्के विद्यार्थीच उच्च शिक्षणापर्यंत पोहचतात. जर ही संख्या साडेबारा टक्क्यांवरून किमान २५ टक्क्यांपर्यंत नेली तर आपणासमोर मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. साडेबारा टक्के या संख्येचा आपण अमेरिकेसारख्या राष्ट्राशी तुलना केली तर तेथे पन्नास टक्के मुले उच्च शिक्षण घेतात आणि जपानमध्ये हाच आकडा नव्वद टक्के इतका आहे. दक्षिण कोरियामध्ये हाच आकडा पंच्याण्णव टक्के इतका आहे. यावरून आपल्यासमोर असलेले आव्हान किती मोठे आहे याची कल्पना येईल. यासाठी शाळा गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी उपाय योजणे आवश्यक आहे.

नैसर्गिक संपदेच्या बाबतीत आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणात समृद्धता नाही. आजही ८६ टक्के पेट्रोलियम तेल आपल्याला आयात करावे लागते आणि ही टक्केवारी दिवसेंदिवस वाढत जाणारी आहे. पुढच्या काळामध्ये नैसर्गिक संपत्तीवर आधारित फार मोठी श्रीमंती निर्माण करू शकू किंवा एक मोठे राष्ट्र निर्माण करू शकू अशी परिस्थिती नाही. यासाठी ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था निर्माण करावी लागेल आणि ती ज्ञानाधिष्ठित केली तरच जपानसारखी प्रगती करता येईल. जपानसारखे राष्ट्र जेथे कुठलेही खनिज पदार्थ, किलोभर कोळसा किंवा लीटरभर तेल मिळत नाही, त्या राष्ट्राने आपल्या बुद्धीच्या बळावर जी प्रगती केली आहे तोच कित्ता आपणाला गिरवावा लागेल. त्यासाठी खऱ्या अर्थाने ज्ञानाधिष्ठित समाजव्यवस्था, ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न करावे लागतील. त्यामध्ये शिक्षणक्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वाची राहणार आहे.

उद्याचा भारत खऱ्या अर्थाने महाशक्ती बनवायचा असेल तर त्यात नव्या पिढीचा वाटा फार मोठा असणार आहे. हे लक्षात घेऊन यापुढे आपणाला ज्ञानाच्या ज्या पारंपरिक चौकटी केलेल्या आहेत त्यांना धक्का द्यावा लागेल. जगाच्या पाठीवर यशस्वी होण्यासाठी आपल्याला प्रत्येकाचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व विकसित करावे लागेल. शिक्षणक्षेत्राकडून हेच अपेक्षित आहे. माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट, गुगल आणि विकिपिडीयाच्या रूपाने माहितीचा महासागर पसरलेला असताना त्याचा पुरेसा फायदा करून घेत ज्ञानसंपन्न होणे, हाच उद्याच्या प्रगतीचा महामंत्र असणार आहे.

**शब्दांकन : सतीश लळीत**
**संपर्क : ९४२२४ १३८००**




# शिक्षण जगण्याचे साधन बनायला हवे

**– उपमुख्यमंत्री अजित पवार**

एखादा समाज प्रगत आहे की अप्रगत आहे, हे केवळ उंच इमारती किंवा रस्त्यावर धावणाऱ्या अलिशान गाड्यांवरून ठरत नसतं तर त्या समाजाच्या बौद्धिक उंचीवर ठरतं. असा बुद्धिवंत समाजच सर्वांगीण विकासात नेहमी अग्रेसर रहात असतो. असा बुद्धिवंत समाज घडविला जातो तो केवळ शिक्षणामुळचं. म्हणूनच शिक्षणाचं आणि समाजाचं अतूट नातं आहे, असं म्हटलं जातं.

आज प्रत्येकाला शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. बुद्धिमत्ता असणाऱ्यांना त्यांचं बुद्धिकौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झालं आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, संशोधन, सेवाक्षेत्र, उद्योग यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये भारतीय वंशाचे अनेक लोक चमकत आहेत. याचाच अर्थ शिक्षणाची दारं जसजशी आपल्यासाठी उघडत गेली, तसतशी प्रगतीची अनेक शिखरं आपण आपल्या कवेत घेत गेलो. महात्मा फुले यांनी विद्येची महती आपल्याला सांगितली होती, तिचं महत्त्व आपल्या समाजाला उशिरा का होईना पण लक्षात यायला लागलं आहे.

राष्ट्र उभारणीत युवकांचा फार मोठा वाटा असतो. या युवाशक्तीला योग्य दिशा देणे गरजेचे असते. ही दिशा देण्यासाठी शिक्षणासारखं दुसरं परिणामकारक माध्यम नाही. प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्याला अक्षरांची आणि अंकांची ओळख करून देते तर माध्यमिक शिक्षण हे त्याच्या बुद्धीला आकार देण्याचं काम करते. महाविद्यालयीन शिक्षण हे त्याच्यातील विश्लेषण शक्तीला चालना देते. सुरुवात चांगली तर सगळंच चांगलं असं आपल्याकडं म्हटलं जाते. त्यामुळे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणादरम्यान विद्यार्थ्याच्या मनावर जे बिंबवलं जातं, त्याच्यातूनच त्याच्या भविष्याची बीजे रोवली जातात. हे बीज कसदार निघावे म्हणूनच प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण दर्जेदार करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

समाजाचा प्रत्येक घटक शिक्षित व्हावा, यासाठी शासन विविध प्रयत्न करत आहे. एक स्त्री शिकली तर तिच्या शिक्षणाचा फायदा तिच्या पूर्ण कुटुंबाला होतो, हे लक्षात घेऊन स्त्रीशिक्षणाला महत्त्व दिले जात आहे. मुलींना मोफत शिक्षण, प्रवास भाड्यात सवलत यांसारख्या योजनांच्या माध्यमातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातील स्त्रियांचा सहभाग वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आदिवासींना शिक्षण देऊन त्यांनादेखील समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना फी माफीचा फायदा मिळवून दिला जात आहे. अगदी दुर्गम भागात देखील शाळा उघडून विद्यार्थ्यांची ज्ञानाची भूक भागवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आजचे युग हे माहितीचे युग आहे याचा विसर आपल्याला पडता कामा नये. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना आपण शिकेल तो टिकेल असे म्हणत असतो. याचाच अर्थ जो शिकेल, त्यालाच माहिती मिळेल आणि ज्याच्याकडे ही माहिती असेल तोच स्पर्धेच्या युगात बाजी मारून जाणार आहे. त्यामुळे शिक्षण घेणे ही आपली मूलभूत गरज आहे, हा विचार प्रत्येकाच्या मनावर बिंबवला गेला पाहिजे. शिक्षणापासून वंचित राहिलो तर अगाध माहितीच्या या युगात आपल्याला पोरकेपणाला सामोरे जावे लागणार आहे याची जाणीव प्रत्येकाला होणे गरजेचे आहे.

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला वाव देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मागास भागातील मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या मानव विकास मिशनमध्येदेखील शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन न बनता ते जगण्याचे साधन बनले पाहिजे. यासाठी शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी शासन करत असलेल्या प्रयत्नांत प्रत्येकाने आपापल्यापरीने हातभार लावला पाहिजे. ज्ञानाधिष्ठीत समाजाच्या उभारणीस हातभार लावून आर्थिक आणि वैचारिकदृष्ट्या सामर्थ्यशाली राष्ट्राचे नागरिक म्हणून अभिमानाने मिरवता येण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहू या.

**शब्दांकन : विशाल ढगे**
**संपर्क : (०२२) २२८३५७५९**



**'शिक्षणापासून वंचित राहिलो तर अगाध माहितीच्या या युगात आपल्याला पोरकेपणाला सामोरे जावे लागेल, याची जाणीव प्रत्येकाला होणे गरजेचे आहे.'**





राज्यात शालेय शिक्षण खात्याचा कारभार हाती घेताना मी एक दृष्टी निश्चित केली. समाजातील वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, श्रीमंत आणि गरीब विद्यार्थ्यांमधील अंतर कमी करणे हे लक्ष्य समोर ठेवले. ज्या सामाजिक कार्याच्या संस्काराचा वसा आणि वारसा घेऊन मी आलो, त्या संस्कारांचा मला हे सगळे कार्य करतांना फार फायदा झाला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम लागू करण्यात यश आल्याने लक्ष्यपूर्तीसाठी मोलाची मदत झाली आहे.

# नव्या बदलांचे प्रतिबिंब



शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांचे मनोगत

२१ वे शतक हे ज्ञानाचे शतक आहे. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान ज्यांच्या हाती असेल तेच राज्य आणि राष्ट्र जगावर आपला प्रभाव पाडू शकेल ही वस्तुस्थिती आहे. शिक्षण व्यवस्थेशी जोडलेल्या सर्व घटकांनी शिक्षणाकडे अत्यंत गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. शिक्षण हे सतत बदलणारे क्षेत्र आहे. सामाजिक, आर्थिक व राजकीय बदलाचा शिक्षण क्षेत्रावर प्रभाव पडत असतो. या बदलाचे प्रतिबिंब शिक्षण व्यवस्थेवर उमटणे आवश्यक ठरते.

स्पर्धेच्या युगातील आव्हाने पेलण्यास सक्षम पिढी घडवायची असेल तर आम्हाला या सर्व बदलांना सामोरे जाणे आवश्यक आहे. त्याच धर्तीवर आपण राज्यातील मुले इंग्रजी भाषेमध्ये मागे राहू नयेत आणि त्यांच्यातील इंग्रजी भाषेचा न्यूनगंड दूर व्हावा, ती भाषा चांगल्या पद्धतीने अवगत व्हावी. यासाठी ब्रिटीश कौन्सिलसोबत अलीकडेच सामंजस्य करार करण्यात आला.

शिक्षणाच्या संख्यात्मक विकासामध्ये राज्याने भरीव प्रगती केली आहे. राज्यात आज ७५ हजार ४६८ प्राथमिक शाळा तर २० हजार ९२३ माध्यमिक शाळा आणि ७ हजार २४१ उच्च माध्यमिक शाळा असून या सर्व शाळांमधून इयत्ता पहिली ते १२ वी पर्यंत २ कोटी मुले शिक्षण घेत आहेत. राज्यातील शालेय शिक्षणाची व्याप्ती खूप मोठी आहे. शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा कणा आहे. भावी पिढी घडविणाऱ्या या वर्गाचे लहानमोठे प्रश्न सोडविण्यास मी प्राधान्य दिले. त्याचवेळी शिक्षण क्षेत्रातील अपप्रवृत्तींना अटकाव करण्यासाठी कठोर पावले उचलली.

**राज्यातील शिक्षणक्षेत्राला झळाळी देणारे पुढील निर्णय घेऊन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी मी जातीने लक्ष देत आहे.**

- **महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) विधेयक २०११**
  खाजगी शाळांमध्ये आकारण्यात येणाऱ्या अवाजवी फीबाबत विभागाकडे तक्रारी प्राप्त होत होत्या. प्राथमिक शाळांना जोडलेल्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालय यामध्ये अवाजवी शुल्क आकारले जाऊ नये, शिक्षणाचे व्यापारीकरण रोखले जावे, विद्यार्थी व पालकांच्या हिताचे रक्षण व्हावे या व्यापक भूमिकेतून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) विधेयक, २०११ विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत एकमताने मंजूर करण्यात आले.
- **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९**
  शिक्षणाचा मूलभूत अधिकार देण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानात ८६ वी घटना दुरुस्ती सन २००२ मध्ये करण्यात आली. त्यानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ हा १ एप्रिल २०१० पासून देशात लागू करण्यात आला. राज्यात या अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी या अधिनियमांतर्गत नियमावली तयार करून त्याची अधिसूचना ११ ऑक्टोबर २०११ रोजी काढण्यात आली.
- **मराठी शाळांच्या परवानगीसाठी बृहत् आराखडा**
  शैक्षणिक सुविधा सर्वदूर उपलब्ध होण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळांचा बृहत् आराखडा जिऑग्राफीकल इन्फर्मेशनचा उपयोग करून तयार करण्यात आला आहे. या आराखड्यावर नागरिकांच्या सूचना व आक्षेप मागविण्यात आले होते. शासनाने ग्रामीण भागांतील (१०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांचा) मराठी शाळांचा बृहत आराखडा अंतिम करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार राज्यात ६५१ प्राथमिक, १५७९ उच्च प्राथमिक आणि १४२ माध्यमिक शाळा सुरू करण्यात येणार आहेत.
- **शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ**
  शिक्षण सेवकांचे मानधन अपुरे असल्याने शिक्षक संघटना व लोक प्रतिनिधींकडून त्यात वाढ करण्याची सातत्याने होणारी मागणी विचारात घेऊन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षण सेवकांसाठी अनुक्रमे ६ हजार, ८ हजार व ९ हजार रुपये असे सुधारित मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला.
- **शिक्षण सेवकांच्या पदनामात बदल**
  शिक्षण सेवक पदावर नियुक्त कर्मचारी सहाय्यक शिक्षकाचीच कर्तव्ये पार पाडीत असल्याने त्यांचे 'शिक्षण सेवक' हे पदनाम बदलून त्याऐवजी 'सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन/ प्रोबेशन)' करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- **नियमित शिक्षकाची अन्यत्र नियुक्ती झाल्यास शिक्षण सेवक योजना लागू न करणेबाबत**
  प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक या शाळेत तीन वर्षे नियमित शिक्षण सेवक पदावरील सेवा पूर्ण करून नियमित शिक्षक पदावर नियुक्ती झालेल्या शिक्षकांना प्राथमिकमधून माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा अन्यत्र पुनर्नियुक्ती देताना यापुढे पुन्हा शिक्षण सेवक पदावर नियुक्ती न देता नियमित शिक्षक पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.




- **शिक्षण सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे**

नोव्हेंबर, २००५ पूर्वी शिक्षण सेवक पदावर नियुक्ती झालेल्या सर्व शिक्षण सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

- **५००० शाळांच्या मूल्यांकनास मान्यता**

इंग्रजी वगळता कायम विनाअनुदानित तत्त्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक ५ हजार शाळांचा कायम शब्द वगळण्याचा निर्णय १६ जून २००९ रोजी घेण्यात आला होता. या शाळा अनुदानावर आणण्यासाठी मूल्यांकनाच्या सुधारित निकषास मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त करून घेण्यात आली आणि या शाळांचे मूल्यांकन करण्यात आले.

- **सीमा भागात मराठी शाळांना परवानगी**

राज्यातील सीमा भागात प्रामुख्याने सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात कन्नड माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरू होत्या. मात्र त्या ठिकाणी मराठी भाषेतून शिक्षणाची सुविधा उपलब्ध नव्हती. त्यादृष्टीने राज्यातील सीमा भागात मराठी शाळांना मान्यता देण्याचा प्रश्न शासनासमोर होता. त्यानुसार १०१ प्राथमिक शाळांना व १७ माध्यमिक शाळांना परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

- **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) २०१० नुसार अभ्यासक्रमाची मांडणी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, बालभारती व बाल चित्रवाणी यांच्या समन्वयाने राज्यस्तरीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला असून या आराखड्याद्वारे अभ्यासक्रमाचे उन्नतीकरण करण्यात येऊन राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमांशी तो समकक्ष राहणार आहे. सद्य: स्थितीमध्ये शासनाने इयत्ता नववी ते बारावीच्या राज्यस्तरीय अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे. तसेच इयत्ता पहिली ते आठवीच्या अभ्यासक्रमाचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

- **कॉपीमुक्त अभियान**

शिक्षणाच्या गुणात्मक विकासाचा भाग म्हणूनच १० व १२ वीच्या बोर्ड परीक्षेमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कॉपीमुक्त अभियानाची कठोर अंमलबजावणी केली.

- **१० वी व १२ वी परीक्षेचे वेळापत्रक वर्षाच्या सुरुवातीला**

विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक कारकिर्दीच्या दृष्टीने इयत्ता १० व १२ वी ची परीक्षा हा महत्त्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासाचे नियोजन व्यवस्थितपणे करता यावे या



दृष्टीने शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस या परीक्षांचे वेळापत्रक मुलांच्या हाती देण्याचा निर्णय घेण्यात आला, त्यानुसार चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १० व १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक १ जुलै रोजी जाहीर करण्यात आले.

- **शाळांकरिता मूलभूत सुविधा**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत ७५० कोटी रुपयांची तरतूद शाळा, खोल्या व इतर बांधकामासाठी करण्यात आली आहे. यामध्ये २०११ ते २०१२ मध्ये १४ हजार ५०० शाळा व ६ हजार ५०० इतर बांधकामे घेण्यात येतील. महाराष्ट्रात सर्व शिक्षा अभियानांतर्गत आतापर्यंत ५७ हजार शाळा खोल्यांची बांधकामे झाली आहेत. तसेच शालेय शिक्षण विभागाने ६८ कोटी रुपये खर्च करून दर्जेदार 'इकोफ्रेंडली ड्यूएल डेस्क' राज्यातील शाळांना उपलब्ध करून दिले आहेत.

- **प्रत्येक तालुक्यात व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्यवस्था**

प्रशिक्षण, चर्चा आणि बैठका प्रवासावर होणारा वेळ व शासकीय निधी वाचविण्यासाठी तालुका स्तरापर्यंतची शालेय शिक्षण विभागाच्या सर्व कार्यालयांमध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची व्यवस्था करण्यात आली.

- **शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा**

केंद्र शासनाच्या मदतीने राज्यामध्ये माहिती तंत्रज्ञानासंबंधीचे प्रशिक्षण कार्य (ICT योजना) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील ५०० शाळांमध्ये पहिल्या टप्प्यात तर २ हजार ४०० शाळांमध्ये दुसऱ्या टप्प्यात सुरू करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त सर्व शिक्षा अभियानामधून ४ हजार ४४६ संगणक प्रयोगशाळा उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या असून ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

- **शिक्षकांचे प्रशिक्षण**

गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी सर्व शिक्षा अभियांनामधून १५० कोटींची तरतूद केली आहे.

- **इंग्रजी सुधार कार्यक्रम**

शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय व ब्रिटीश कौन्सिल यांच्यामार्फत राज्यातील काही शाळा United Kingdom मधील शाळांसोबत Global School Partnership तसेच Connecting Classroom या उपक्रमांतर्गत जोडण्यात आल्या आहेत. राज्यातील सुमारे ५० हून अधिक शाळा या उपक्रमामध्ये सहभागी झाल्या आहेत. या उपक्रमांतर्गत शिक्षक व अधिकारी यांच्या भेटी तसेच जोडण्यात आलेल्या शाळांचे शैक्षणिक आदानप्रदान यांचा समावेश आहे. Connecting Classroom या उपक्रमांतर्गत निवडलेल्या राज्यातील शाळांना International School Award करिता प्रोत्साहित करण्यात आले. यापैकी चार शाळांना International School Award प्राप्त झाले.

**शब्दांकन : काशीबाई थोरात**
**संपर्क :९५९४८५४३२५**

++



# शिक्षणातून सक्षमीकरण

**– फौजिया खान**



मुलींना उत्तम प्रकारे प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातील मुलींनाही शिक्षण मिळावे यासाठी राज्य शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. मुलींच्या शिक्षणाच्या या योजना म्हणजे महिला सक्षमीकरणाचा पाया आहे, असे मत शालेय शिक्षण राज्यमंत्री फौजिया खान यांनी मांडले आहे.

आपल्या राज्यघटनेने नागरिकांना काही मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत. घटनेतील कलम २१ मध्ये जगण्याचा अधिकार प्रदान केला आहे. हे जगणे सुंदर असले पाहिजे. आणि हे जगणे सुंदर होणे कशामुळे शक्य होते ते शिक्षणामुळे. भावी पिढीतील मुला-मुलींचं भवितव्य उज्ज्वल व्हावं यासाठी राज्य शासनाने शिक्षणाच्या अनेकविध अभिनव अशा योजना सुरू करून आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी करून जगणं सहज सुंदर करण्यासाठी पाऊल उचलले आहे. खासकरून ग्रामीण भागातील मुली शिक्षणापासून वंचित राहता कामा नयेत यासाठी विशेष लक्ष शासनाने दिले आहे. प्राथमिक शिक्षणातूनच महिला सक्षमीकरणाचा पाया रचला जात आहे.

राज्य शासनाने महिलांच्या शिक्षणावर खास करून लक्ष दिले आहे. शालेयस्तरावर मोफत शिक्षणाबरोबरच सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी महिलांना ३० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मुलींना मोफत सायकलींचे वाटपही करण्यात येते. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणात विशेषता ग्रामीण भागात मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

दुर्गम भागात जिथे शाळा नाही अशा ठिकाणी जवळच्या अंतरावर शाळा उपलब्ध करून मुलींच्या उपस्थितीचे प्रमाण अधिक होईल याकडे लक्ष दिले जात आहे. राज्यात शिक्षण हक्काचा कायदा कायदा लागू झाला आहे. घराच्या जवळ शाळा असावी अशी कायद्यात तरतूद आहे. पहिली ते पाचवीपर्यंतची शाळा एक कि.मी. अंतराच्या आत असावी. आठवीपर्यंतची शाळा ३ कि.मी. पर्यंत असणे गरजेचे आहे. यासाठी राज्य शासनाने बृहत आराखडा तयार केला आहे. त्यासाठी खास उपग्रहाद्वारे अभ्यासही करण्यात आला आहे. कायद्यातील तरतुदींप्रमाणे शाळा असाव्यात, याची काळजी घेतली जात आहे.

शालेय स्तरापासून ते व्यावसायिक अभ्यासक्रमांपर्यंत महिलांचा त्यात सहभाग वाढावा म्हणजेच शिक्षणातून आर्थिक स्वावलंबनाकडे जाण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत आणि मला सांगायला आनंद वाटतो की यासाठी शासनस्तरावरून सकारात्मक पाऊल उचलेले गेले आहे. आरोग्य विषयक जागृती शालेय स्तरावरूनच व्हावी यासाठी आरोग्य विषयक अभ्यासक्रमाचा अंतर्भाव होण्यासाठी आमचा प्रयत्न आहे.

## ठळक नोंदी

- शिक्षणाच्या हक्कांतर्गत विद्यार्थ्यांच्या नजीकच्या परिसरात शाळा स्थापन करणे.
- दुर्बल आणि मागास घटकातील विद्यार्थ्यांची व्याख्या तयार करणे.
- विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवेळी चाळणी पद्धत रद्द करणे (प्राथमिक शाळेशी संलग्न असलेल्या पूर्व प्राथमिक शाळांसहित)
- दुर्बल आणि मागास घटकातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा आरक्षित करण्यासंदर्भात सविस्तर आराखडा.
- विद्यार्थ्यांना त्यांच्याच वयातील विद्यार्थ्यांच्या समकक्ष पातळीवर आणून सक्षम करण्यासंदर्भात विशेष तसेच उपाययोजना समाविष्ट प्रशिक्षणाचा आराखडा तयार करण्यात आला.
- सर्वंकष आणि सातत्यपूर्ण तसेच नियमित प्रशिक्षण देण्याबाबत आराखडा विचाराधीन.
- सेवेत असलेल्या शिक्षकांना सातत्यपूर्ण आणि नियमित प्रशिक्षण देण्याबाबत विचार.
- शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना
- राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षण नियमित करण्याबाबत धोरण विचाराधीन. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना.
- शाळांसाठी पहिल्यांदाच जी.आय.एस. आधारित कृती आराखडा विकसित करण्यात आला असून तो मान्य करण्यात आला.
- हजेरी पटावरील विद्यार्थ्यांची बोगस संख्या ओळखण्यासाठी व पडताळण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची हजेरी ५० टक्क्यांपेक्षा जास्त आढळून आली त्या शाळांमध्ये कार्यवाही चालू आहे.
- कायम विनाअनुदानित प्राथमिक आणि माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यमांच्या शाळांसहित) यांना अनुदान देण्याबाबत धोरणात्मक निर्णय.
- प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची गुणवत्ता सुधारण्याबाबत विचार करण्यात आला.
- शाळांचे मूल्यमापन आणि प्रतवारी करण्याबाबत विचार चालू आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी प्रतवारी विकसित करण्याबाबत आराखडा तयार करणार ( शाळांमध्ये असलेल्या पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक दर्जा या संदर्भात )
- राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागास ४३ तालुक्यांमध्ये शाळा व मुलींसाठी वसतिगृहे उभारण्यासाठी तरतूद.
- विद्यार्थ्यांसाठी असलेल्या राजीव गांधी अपघात विमा योजनेचा फेरविचार.
- सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये खाजगी/सार्वजनिक सहभागाने आयसीटी प्रशिक्षण केंद्र स्थापन केली जातील.
- बालभारतीचा आढावा-ऑनलाईन डाऊन लोडेबल स्वरुपात सर्व पाठ्यपुस्तके आणि मासिके उपलब्ध करणे
- सर्व मासिकांसाठी केंद्रीय छपाई - या अंतर्गत इतर बोर्डाच्या आणि शालेय शिक्षण विभागाच्या संचालनालयाच्या सूचनांनुसार विषय आधारित मासिके

**- शब्दांकन : अजय जाधव**
**संपर्क :९७०२९७३९४६**




# ऋषिपरंपरेतील प्राचार्य



**राज्याच्या शैक्षणिक वाटचालीत ज्यांचा आदरपूर्वक उल्लेख केला जातो, ते श्री. वि. वि. चिपळूणकर आज औरंगाबादेत शांतपणे मार्गदर्शकाची भूमिका बजावत आहेत. विद्यार्थीप्रिय शिक्षक, प्रयोगशील प्राचार्य आणि संवेदनशील संचालक म्हणून त्यांची कारकीर्द आजही ओळखली जाते. शासकीय विद्या निकेतन सारख्या संस्थेची जडणघडण त्यांच्या नेतृत्वाखाली झाली आणि विद्यार्थीभिमुख कितीतरी शैक्षणिक प्रयोगांची सुरुवात त्यांनी केली. त्यांच्याशी केलेली ही बातचीत...**

**प्रश्न- सर, आपल्यासारख्या व्यक्तिमत्त्वाचे संस्कारधन जाणून घेण्याची सर्वांचीच इच्छा असते. तेव्हा त्याबद्दल आपण तपशिलाने सांगाल काय?**

**उत्तर-** माझ्यावर माझ्या आई-वडिलांचे संस्कार झालेले आहेत. आज आपण ज्याला अष्टपैलू असे विशेषण वापरतो, तशी आपली अपत्ये घडावीत असे फार जाणीवपूर्वक प्रयत्न माझ्या वडिलांनी केले. त्या काळात त्यांनी हे प्रयत्न करावेत याचे मला किंवा खरे म्हणजे अनेकांना अप्रूप वाटेल. तेव्हाच्या पद्धतीप्रमाणे त्यांचा पाठांतरावर भर होता. ते धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यामुळे अनेक स्तोत्र, आरत्या आम्हाला मुखपाठ होत्या. त्या तेव्हा रोज म्हटल्या जात. मुलाने सत्प्रवृत्त असावे, नेहमीच खरे बोलावे, भरपूर वाचन करावे याची त्यांनी काळजी घेतली. पण, आज विशेष उल्लेख हा केला पाहिजे की, मुलाने खेळावे, बागडावे, सहलीला जावे याबाबतही ते सजग होते. त्यामुळे त्या काळात त्यांनी बॅडमिंटनचा सेट आणून दिला. सायकल घेऊन दिली, या बाबी मुद्दाम नमूद कराव्या लागतील. संगीताचे त्यांना अंग होते आणि ही कला आपल्या मुलाच्या ठायी रुजावी म्हणून त्यांनी फार जाणीवपूर्वक प्रयत्न केले. आज मागे वळून पाहिले म्हणजे, केवळ अभ्यास नव्हे, तर खेळ, संगीत अशा गुणांचे संस्कार त्यांनी केले, याची फार कृतज्ञतेने जाणीव होते. संस्काराची ही शिदोरी माझ्या आयुष्यात नेहमीच मला फार उपयोगाची पडली आहे.

**प्रश्न- सर, आपले नाव औरंगाबाद येथील शासकीय विद्या निकेतनशी जोडले गेले आहे. विद्या निकेतनचे अनेक माजी विद्यार्थी आपला फार कृतज्ञतेने उल्लेख करतात. या शाळेसंदर्भात आपण काय सांगाल?**

**उत्तर-** शासकीय विद्या निकेतन ही निवासी शाळा आहे. तेव्हा या स्वरूपाची शाळा हा एक नवा प्रयोग होता. शाळेत दोनशे मुले होती. ती सर्व माझी मुले आहेत असाच माझा दृष्टिकोन होता. त्यामुळे त्या काळात मला कुणी तुम्हाला मुले किती असे विचारले तर मी दोनशे तीन असे उत्तर देत असे! या शाळेत येणारी मुले ग्रामीण भागातील आहेत. ते त्यांच्या आई-वडिलांना सोडून आलेली आहेत. त्या आई-वडिलांनी मोठ्या विश्वासाने त्यांना आपल्या स्वाधीन केले आहे. याची जाणीव ठेवा, असे मी माझ्या सहकाऱ्यांना सांगत असे. त्यांनी ही जाणीव नेहमीच ठेवली. त्यामुळे शाळा म्हणजे एक कुटुंब असेच तेव्हा त्या शाळेला स्वरूप आले होते. मला हेही नमूद केले पाहिजे की, तेव्हा शाळेत प्रत्येक वर्गात ३० विद्यार्थी होते. त्यामुळे प्रत्येकाशी संपर्क, संवाद शक्य होता. त्यांच्या पालकांशीही संपर्क साधणे आणि त्यात सातत्य ठेवणे सहज शक्य होत असे.




स्वयंभू गुरुकुल

**प्रश्न- या शाळेतील काही उपक्रमांविषयी आपण आज काय सांगाल?**

**उत्तर-** मी सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे या शाळेतील मुले त्यांचे घर सोडून आलेली असत. मात्र, त्यांना त्यांच्या घराची म्हणजे आई-वडिलांची आठवण येऊ नये असा प्रयत्न केला गेला. शाळेची सुरुवात प्रार्थनेने होत असे. प्रार्थनेतून संस्काराचे बिजारोपण होते. त्यामुळे प्रार्थनेच्या वेळी वातावरण निर्मितीवर विशेष लक्ष दिले. एका सभागृहात प्रार्थना होत असे. त्या सभागृहातील भिंतीवर विविध धर्मातील प्रार्थना लिहिलेल्या होत्या. अनेक सुविचार लिहिलेले होते. प्रार्थनेचा पाया संगीतावर उभा असावा असे मला मनापासून वाटे. त्यासाठी श्री. उत्तमराव अग्निहोत्री यांची मदत घेतली. मी या शाळेत येण्यापूर्वी बीडला शिक्षणाधिकारी होतो. तेव्हा एकदा माजलगावला जाण्याचा योग आला. तेथे माझा अग्निहोत्रींशी परिचय झाला. त्यांना औरंगाबादेत येण्याची विनंती केली आणि पुढे शाळेत त्यांची रीतसर नेमणूकही झाली. त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना ओम्‌कार शिकवला. तेव्हा सिल्लोड तालुक्यातील गणपत आरके हा विद्यार्थी शाळेचा कप्तान होता. तो सुरुवातीला तंबोऱ्याच्या तालावर ओम्‌काराचा उच्चार करीत असे आणि पाठोपाठ सारे जण ओम्‌कार म्हणत. त्यामुळे अवघे वातावरण भारून जाई. प्रार्थनेत साने गुरुजींची अनेक गाणी होती. त्यांनी लिहिलेल्या 'आई माझा गुरू, आई कल्पतरू, सौख्याचा सागर आई माझी', या ओळी म्हणताना अनेकांच्या डोळ्यांना धारा



# कृतार्थ जीवन

महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीच्या काळात राज्याची उभारणी होताना विविध क्षेत्रातील अनेक धुरीणांचा हातभार लागला. त्यांच्यामध्ये शिक्षण क्षेत्रात पवित्र आणि संवेदनशील कार्याने मोठे योगदान देणारे अद्वितीय असे व्यक्तिमत्त्व म्हणून गुरुवर्य विद्याधर विष्णू चिपळूणकर यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या परीसस्पर्शाने बदल घडविण्याचे काम त्यांनी मोठ्या तन्मयतेने केले.

सन १९४८ मध्ये माध्यमिक शिक्षक म्हणून चिपळूणकर सरांचा विद्याज्ञान यज्ञ सुरू झाला. १९६० मध्ये 'शिक्षण प्रशासन सेवा वर्ग १'च्या माध्यमातून राज्य शासनाच्या सेवेत प्रवेश केला. १९६० ते १९६३ त्यांनी प्रथम कोल्हापूर येथील शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नंतर मुंबई येथील शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्राचार्यपद भूषविले.

औरंगाबाद येथील विद्या निकेतन ही शाळा त्यांच्या विशेष प्रयत्नांमधून नावारूपाला आली. या कालावधीत शिक्षण क्षेत्रातील अनेक अभिनव प्रयोग त्यांनी राबवले. त्या काळातील त्यांच्या या कार्याची समाजाच्या सर्व थरातून वाहवा केली गेली. औरंगाबादच्या सांस्कृतिक क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या गीताभवनची स्थापनाही त्यांनीच केली होती. त्यांनी शाळेत राबवलेले असंख्य प्रयोग शासनाने 'शासन निर्णया'च्या माध्यमातून राज्यातील सर्व शाळांसाठी लागू केले.

औरंगाबाद, कोल्हापूर, मुंबई येथील त्यांच्या सेवेतील उत्कृष्ट कार्याची दखल घेताना शासनाने १९७२ मध्ये त्यांना पहिल्यांदा राज्याच्या 'शिक्षण संचालक' या अत्यंत जबाबदारीच्या पदावर बसवले. १९७६ मध्ये दुसऱ्यांदा शिक्षण संचालकपदाची जबाबदारी स्वीकारताना त्यांनी १९८६ पर्यंत राज्याच्या शैक्षणिक धोरणामध्ये अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन या क्षेत्रासाठी मोलाचे योगदान दिले.

१९७४-७६ अशी दोन वर्षे राज्याचा शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करणाऱ्या राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. याचबरोबर पुणे येथील राज्य शिक्षण शास्त्रसंस्था, औरंगाबाद येथील राज्य प्रौढ शिक्षण संस्था यांचे संचालक म्हणून त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण काम केले.

राज्याच्या शिक्षण क्षेत्रात आपल्या उत्तुंग कार्यशैलीची छाप सोडणाऱ्या चिपळूणकर सरांना भारत सरकारने केंद्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेचे सल्लागार म्हणून नवी दिल्ली येथे नियुक्त करून बहुमान केला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संशोधन कार्यशाळेमध्येही भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना मिळाली होती.

संवेदनशीलतेने विद्यार्थ्यांचे जीवन सर्वार्थाने फुलवणाऱ्या चिपळूणकर सरांच्या स्वप्नवेड्या कार्याची ओळख त्यांच्यावर रवी गोडबोले यांनी केलेल्या काव्याने होते.

*'पाषाण होते विखुरलेले डोंगरी रानीवनी,*
*स्वप्नवेडा एक त्याने आणले ते वेचुनी!*
*आकार नव्हता रूप नव्हते दगड वेडेवाकडे,*
*लोक हसले तुच्छतेने खूळ कुठले काढले!*
*स्वप्नवेडा शांत होता दृष्टी त्याची आगळी,*
*दगडामध्ये प्रत्येक त्याने मूर्ती होती पाहिली!*
*साकार करणे मूर्ती त्याच्या जीवनाचा ध्यास होता,*
*प्रेम त्याची शक्ती अन् विश्वास त्याचा श्वास होता!*
*स्पर्श त्याचा लाभला पार्थिवता संपून गेली,*
*संस्कार लेणी लेवून चैतन्यमूर्ती उमलली!*
*आज जन्माची कहाणी तीच मूर्ती सांगते,*
*स्वप्नवेड्या माणसाची शब्दपूजा बांधते!*

'विद्यार्थी' हे शिक्षकांचे दैवत आहे असे मानणाऱ्या चिपळूणकर सरांचे विद्यार्थी आज अनेक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. विद्या निकेतनमधील त्यांच्या स्वप्नवत कालखंडाची नोंद 'स्पप्नपंख' या कादंबरीच्या माध्यमातून डॉ. राजेंद्र मलोसे यांनी शब्दबद्ध केली आहे. चिपळूणकर सरांच्या कार्यकर्तृत्वाची दखल त्यांच्या जीवन कार्यावर आधारित 'विद्याश्री' या गौरवग्रंथात घेतली गेली आहे. त्याचबरोबर त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील मूलगामी विचारांवर भाष्य करणाऱ्या व्याख्यानांवरील 'उत्कृष्टाचा ध्यास' हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. शिक्षण क्षेत्रासाठी त्यांचे मार्गदर्शक लेख 'आव्हान - प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचे' आणि 'कणा शिक्षणाचा' या दोन पुस्तक रूपात प्रकाशित झाले आहे. माणूस घडविणारे संस्कारांचे विचारधन सरांनी 'गीतेतील जीवन संस्कार' या उद्बोधक पुस्तिकेमध्ये मांडले आहेत.

चिपळूणकर सरांवर मुंबईच्या विल्सन महाविद्यालयातील गुरुवर्य प्रा. ह. दा. वेलणकर यांचे संस्कार झाले होते. पण, जीवन प्रवाहात कुसुमाग्रज, वि. स. खांडेकर, मधुकरराव चौधरी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अशा असंख्य विद्वान विचारवंतांचा स्नेह त्यांना लाभला होता. त्यांच्या शैक्षणिक विचारधारेला पुढे नेण्यासाठी त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षात 'गुरुवर्य व्ही. व्ही. चिपळूणकर शिक्षण प्रबोधिनी'ची स्थापना करण्यात आली आहे.

---

लागत. प्रार्थनेचा हा उपक्रम तेव्हा फार वाखाणला गेला. त्यावेळी औरंगाबादेत आकाशवाणी केंद्र नव्हते. पुण्याच्या आकाशवाणीने या प्रार्थनेचे ध्वनिमुद्रण केले आणि ते पुढे प्रसारितही केले. प्रार्थनेला येताना मुलांनी रांगेत यावे, सभागृहाबाहेर चपला ओळीने मांडून ठेवाव्यात वगैरे छोट्या छोट्या बाबी सांगितल्या जात. 'आधी पायांना शिस्त लावा. म्हणजे मग डोक्याला शिस्त लागेल' असे मी तेव्हा म्हणत असे.

**प्रश्न– या शाळेतील उल्लेखनीय उपक्रमांविषयी आज आपली काय आठवण आहे?**

**उत्तर–** तशा आठवणी बऱ्याच आहेत. पण, आज मुद्दाम सांगाव्यात अशा दोन–तीन बाबी जरा विस्ताराने सांगितल्या पाहिजेत. या मुलांना प्रेम द्या; कारण, ती प्रेमाची भुकेली आहेत, असे मी सांगत असे. आईच्या आठवणीने मुले व्याकुळ झाली म्हणजे मी त्यांना डोळे मिटून घ्या आणि मला सांगा आई काय करीत आहे, असा प्रश्न विचारी आणि मग मुले उत्तर देत. तेव्हा मी त्यांना म्हणत असे की, डोळे मिटल्यानंतर तुम्हाला तुमची आई दिसते याचा अर्थ आई इथेच आहे आणि ती सगळीकडे असते हे तुम्ही लक्षात घ्या. मुलांवर हा मातृशक्तीचा संस्कार मला फार मोलाचा वाटतो. प्रार्थनेच्या वेळी साने गुरुजींच्या काव्यातूनही हाच संस्कार होत असे.








**प्रश्न– आपण आजच्या विद्यार्थ्यांना काय सांगाल?**

**उत्तर–** मी काहीतरी करून दाखवेन आणि जे करेन ते उत्कृष्टच करेन, असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांनी रुजवून घ्यावा. आपल्या दोन हातांच्या दहा बोटांत काहीतरी जादू आहे. त्या बोटांनी जगाच्या लक्षात राहील, अशी चांगली किमया मी करून दाखवेनच असा मंत्र विद्यार्थ्यांनी जपला पाहिजे. आपले कुटुंब, आपला देश आणि हे जग यांच्याप्रती आपले काही कर्तव्य आहे, आणि ते अर्थपूर्णरीत्या बजावण्यासाठी मी शिक्षण घेत आहे, अशी मुलांची धारणा हवी.

मुलांच्या अभ्यासाइतके त्यांच्या खेळण्या बागडण्याला महत्त्व आहे असे आम्ही मानत असू. त्यामुळे त्यांच्यावर बंधने नव्हती. प्रत्येक विद्यार्थ्याने दैनंदिनी लिहिली पाहिजे यावर कटाक्ष होता. आज आपल्या हातून काय चूक झाली हे मुलांनीच स्वत:च्या मनाला विचारावे असे सांगितले जाई आणि मग मुलेही त्यांच्या चुकांची कबुली देत असत. काय शिकवले गेले यापेक्षा मुलांना काय शिकता आले आणि किती शिकता आले याचा विचार करण्याचा आमचा परिपाठ होता. मुलांमध्ये अभिव्यक्तीचे सामर्थ्य यावे म्हणून त्यांच्याकडून सुविचार ऐकण्याचा उपक्रम सुरू केला. इतरांनी लिहिलेले नव्हे, तर स्वत:ला सुचलेले सुविचार सांगा असे त्यांना सांगितलेले असे. फोटोग्राफरकडील कॅमेऱ्याला एकच लेन्स असते; पण, माणसाला विविध इंद्रियांच्या रूपाने अनेक लेन्स लाभलेल्या असतात आणि त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे असे मुलांना सांगितले जाई. त्यामुळे त्यांची ग्रहणशक्ती वाढण्यासाठी त्याचा उपयोग होत असे.

**प्रश्न– या शाळेतील आपल्या आठवणीत असणारे काही प्रसंग सांगाल काय?**

**उत्तर–** तसे अनेक प्रसंग आजही माझ्या डोळ्यांसमोर येतात. एक-दोनच प्रसंग सांगणे म्हटले तर अवघड आहे. मला आठवते, तेव्हा राज्याचे शिक्षणमंत्री पद भूषविणारे मधुकररावजी चौधरी शाळेला भेट देण्यासाठी आले होते. त्यांना प्रार्थनेचा आमचा उपक्रम फार आवडला. ते भारावून गेले. प्रार्थना झाल्यानंतर त्यांनी तेथेच मुलांशी गप्पागोष्टीही केल्या. पुढे जेव्हा केव्हा त्यांची भेट होई तेव्हा ते शाळेची आणि मुलांची फार जिव्हाळ्याने चौकशी करीत असत.





शाळेच्या माध्यमातून देशप्रेमाचे संस्कार व्हावेत, समाजाविषयीची आस्था आणि जाणीव रुजावी याचा प्रयत्न होता आणि हे प्रयत्न मुलांपर्यंत चांगले पोहोचत आहेत याचा अनुभव एका प्रसंगातून आला. औरंगाबादच्या शासकीय महाविद्यालयातील मराठीचे नामवंत प्राध्यापक वसंतराव कुंभोजकर यांच्याकडे एकदा विदेशातील एक बाई औरंगाबादेतील विविध प्रयोग पाहण्यासाठी आल्या होत्या. कुंभोजकर त्यांना आमच्या शाळेत घेऊन आले. सगळी शाळा पाहिल्यानंतर बाईंनी मुलांशी संवाद साधला. शेवटी त्यांनी मुलांचे फार मनापासून कौतुक केले आणि तुमच्यापैकी चार-सहा जणांना मी माझ्या देशात चांगले शिक्षण देण्यासाठी घेऊन जाते. तुम्हाला एक पैसाही खर्च करावा लागणार नाही असे सांगत कोणाची तयारी आहे, असा प्रश्न केला. त्यांच्या प्रश्नानंतर सभागृहात शांतता पसरली. मुले काय उत्तर देतात याकडे आमचे लक्ष लागले होते. पण, कुणीच काही बोलेना. बाईंच्या विनंतीवरून कुंभोजकरांनी मुलांना बाईंची भूमिका समजावून सांगितली आणि परत कुणाची तयारी आहे असा प्रश्न केला. त्यावर मात्र आमच्या शाळेचा कर्णधार असलेला गणपत आरके उभा राहिला आणि त्याने सांगितले की, आम्हाला आमची शाळा प्रिय आहे. या शाळेच्या माध्यमातून समाज आणि सरकार आमच्यावर खर्च करीत आहे. आम्हाला येथे जे शिक्षण मिळते तशा शिक्षणाची देशात अनेकांना गरज आहे. त्यांचा विसर आम्हाला पडणार नाही. ती या शाळेची शिकवणही नाही. तेव्हा आमच्यापैकी कुणीही तुमच्या सोबत येऊ इच्छित नाही. त्याचे उत्तर संपले आणि मुलांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्या बाईंना त्याचे उत्तर समजावून सांगण्यात आले. तेव्हा त्यांचे डोळे पाणावले.

**(पान २१ वर)**

**प्रश्न– सर, आपण ज्या शाळेविषयी सांगता आहात, ती शाळा सरकारी आहे. सरकारी संस्थांमधून फार काही नवे करता येत नाही. नियमांची वगैरे चौकट असते असे बाहेर मानले जाते. आपला काय अनुभव आहे?**

**उत्तर– हा समज रूढ आहे. पण, तो चुकीचा आहे. सरकारचे नियम, कायदे, चौकट या बाबी असतातच; पण, त्यांचे बंधन शाळेतील प्रशासकीय तसेच आर्थिक बाबींसाठी आहे. तसे ते असणे आवश्यकही आहे. पण, मुलांना शिकवताना, शिकवण्यासाठी किंवा चांगल्या संस्कारासाठी प्रयत्न करताना हे नियम आड येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मुले निर्भय व्हावीत, ती बुद्धिप्रामाण्यवादी व्हावीत, त्यांच्याशी जिव्हाळ्याने वागावे, त्यांच्यातील गुणांना आकार द्यावा यासाठी प्रयत्न करण्यात कुणाची आडकाठी असणार आहे. आमच्याही शाळेतील मुले आपसात भांडत होती, एकमेकांच्या खोड्या काढत होती. पण, त्यांनी स्वत:चे मूल्यांकन करावे असे मी आणि माझे सहकारी आग्रहपूर्वक सांगत असू. त्याचा चांगला परिणाम दिसत असे. असे करण्यासाठी कोणताही नियम असण्याची गरज नव्हती.**






# आमची शाळा आमचा अभिमान

**सोमनाथ पाटील**

बलाढ्य सम्राट नेपोलियनचा वॉटर्लूच्या लढाईत निर्णायक पराभव करणारा ड्युक ऑफ वेलिंग्टन त्या विजयाबद्दल म्हणाला होता, 'ही लढाई जिंकण्याची सुरुवात माझ्या ईटनच्या पब्लिक स्कूलच्या मैदानावर झाली होती.' आपल्या शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आधारे आयुष्यातील लढाया जिंकण्याची क्षमता आपल्याला मिळाली असे म्हणण्याचे भाग्य फार थोड्या जणांच्या वाट्याला येते. कारण, ते शाळेतील शिक्षणाच्या दर्जावर आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या परिश्रमांवर अवलंबून असते. सुदैवाने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी असे गौरवोद्‌गार आपल्या शाळेबद्दल काढू शकतात. हे विद्यार्थी आज जीवनाच्या व लोकव्यवहाराच्या विविध क्षेत्रात आपले स्थान सिद्ध करीत आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या शाळा सरकारी आहेत. महाराष्ट्र शासनाच्या निवासी शिक्षण योजनेतील एक महत्त्वाचा प्रयोग मानल्या गेलेल्या 'शासकीय विद्या निकेतन किंवा गव्हर्नमेंट पब्लिक स्कूल' या उपक्रमाबद्दल मी हे सांगतो आहे.

शासकीय निवासी शाळा ही आज नवलाई राहिलेली नाही. तथापि पंचेचाळीस वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील बुद्धिमान मुलांना विशेष शाळात शिक्षणाची संधी देण्यासाठी शासकीय विद्या निकेतने स्थापण्याची जी योजना आखली ती सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण ठरली. तत्कालीन शिक्षण मंत्री मा. मधुकरराव चौधरी यांच्या दूरदृष्टीतून ही योजना राज्याच्या तेव्हाच्या चार महसूल विभागासाठी प्रत्येकी एक विद्या निकेतन अशा प्रकारे आखण्यात आली. १९६६ च्या शैक्षणिक वर्षात कोयनानगर (सातारा) व औरंगाबाद आणि चिखलदरा (अमरावती) येथे तीन विद्या निकेतने सुरू झाली तर चौथे १९६७ पासून नाशिक येथे सुरू करण्यात आले. या विद्या निकेतनात प्रवेशासाठी तेव्हा एक विशेष स्पर्धा परीक्षा घेतली जाई. ती तत्कालीन मिडलस्कूल स्कॉलरशिप, ओपन मेरिट स्कॉलरशिप यासारख्या अवघड परीक्षांइतकीच कठीण असे. मुळात अशा परीक्षांची तयारी करून घेऊ शकणारे शिक्षक कमी व त्यामुळे विद्यार्थी या परीक्षांना घाबरत. तथापि १९६५-६६ साली राज्यभर याबाबत जागृती निर्माण होऊन या परीक्षेला मोठा प्रतिसाद मिळण्यास सुरुवात झाली. विद्या निकेतनचे 'पब्लिक स्कूल' हे नाव आणि तेथे विद्यार्थ्यांची वाट बघणाऱ्या सुविधा व शिक्षकवृंद हे फार मोठे आकर्षण ठरले.

या विद्या निकेतनांकडे समाजातील सर्व घटकांचे लक्ष होते. असे काय होते या विद्या निकेतनांमध्ये? या प्रश्नांची माझ्या व माझ्या सहाध्यायी मित्रांच्या अनुभवाप्रमाणे काही उत्तरे येथे नोंदवून सुरुवात करतो.

विद्या निकेतने या सरकारी निवासी शाळा असल्या तरी त्या काहीशा 'एलिट' (अभिजात) होत्या. तेथील निवासाची सुविधा, उत्तम दर्जाची भोजनालये व शास्त्रशुद्ध दर्जेदार आहार, अवघ्या तीस हुशार विद्यार्थ्यांचे वर्ग, नामांकित प्राचार्य, (इतर शाळांना मुख्याध्यापक असत) ध्येयनिष्ठ शिक्षक (ज्यांना इतरांपेक्षा थोडा अधिक पगार मिळे पण बारा तास काम करावे लागे), कोणत्याही इंग्रजी निवासी शाळेच्या तोडीच्या प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे, क्रीडा साहित्य, सक्तीचा व्यायाम आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे परंतु दैनंदिन व्यवहारात सहजगत्या समाविष्ट असणारे उपक्रम, अभ्यासक्रमास पूरक (एक्स्ट्रा-करिकुलर) उपक्रम, छंदोपासना वर्ग आणि रात्री सक्तीचे वाचन व अभ्यास. अधूनमधून सहली, अनेक नामवंतांच्या भेटी, वर्गात एकापाठोपाठ एक असे न बसता एकमेकांशी व शिक्षकांशी संवाद होत राहील अशा प्रकारची गटवार आसन व्यवस्था, खुले ग्रंथालय, कोणालाही हेवा वाटावा असेच हे वातावरण होते. या विद्या निकेतनात येईपर्यंत अनेकांनी परीक्षाकेंद्र वगळता इतरत्र बेंचही पाहिलेला नव्हता, क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त पुस्तके ठाऊक नव्हती. पायात चपला किंवा बुट घालण्याचा प्रसंग अनेकांनी प्रथम तेथे अनुभवला, घरी ज्वारी-बाजरीच्या भाकरीची सवय असणाऱ्यांनी रोज चपाती व भात या आहाराशी जुळवून घेतले. महत्त्वाचे म्हणजे सर्व बाबींचे काटेकोर नियोजन असे. त्यामुळे ही विद्या निकेतने म्हणजे विद्यार्थी घडविण्याच्या शाळा ठरल्या. प्रत्येक विद्यार्थी एक शिल्प ठरले.

इतर शाळांसारख्याच माध्यमिक शिक्षण मंडळाने नेमलेला अभ्यासक्रम पूर्ण करत, तीच पाठ्यपुस्तके, त्याच प्रश्नपत्रिका वगैरे वापरून आमचे क्रमिक शिक्षण सुरू होतेच. पण, त्या पलीकडे जे आम्हाला मिळत होते ते इतरांना स्वप्नवत वाटेल. शंभर टक्के सरकारी व्यवस्थापनात असूनही आमच्या शाळा त्यावेळच्या कोणत्याही नामांकित व प्रचंड शुल्क आकारणाऱ्या कोणत्याही निवासी शाळेइतके आम्हाला देत असत. आयुष्यात जे काही समोर आले त्याला जिद्दीने व आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे संस्कार आम्हाला विद्या निकेतनात मिळाले. इतर शाळांमध्ये खेळ व शारीरिक शिक्षण, चित्रकला व हस्तकला यांना पुस्तकी अभ्यासक्रमापुढे दुय्यम व गौण स्थान असते. आमच्या शाळेत सारे काही एकाच पातळीवर होते.

संगीत, हस्तकला, चित्रकला यांचे विशेष शिक्षण घेण्याची संधी, अनेक वस्तू बनविणे व त्यासाठी सर्व प्रकारची औजारे वापरून सुतार कामापासून घड्याळ दुरुस्तीचे शिक्षण देणारे खटपटघर (डु इट युवरसेल्फ हाउस), शाळेचे स्वत:चे मुखपत्र- विद्यार्थ्यांनी लिहिलेला, जुळवलेला (हॅण्ड कंपोज) मजकूर आणि विद्यार्थ्यांनीच शाळेतल्या हेडलवर केलेली छपाई, यासह पत्रकारितेचे धडे, रंगभूमीसाठी मोठा कपडेपट, शहरातील लष्करी शाळेलाही हेवा वाटावा




असा कुशल वाद्यवृंद, शिवाय हार्मोनियम, व्हायोलिन शिकण्याची संधी यातले निम्मे तरी प्रत्येक विद्यार्थी करीत असे. छायाचित्रे काढणे व प्रिंट करणेसुद्धा तेथे शिकायला मिळत असे. अधूनमधून शैक्षणिक व मनोरंजनपर चित्रपट दाखवण्यासाठी प्रोजेक्टर आमचा व तो चालवणारे ऑपरेटर्ससुद्धा आम्हीच असू. दर तीन महिन्यांनी होणाऱ्या परीक्षांमध्ये या सर्व विषयांचा समावेश असे शिवाय ॲथलेटिक्स, जिम्नॅस्टिक्स व देशी खेळ यातील गतीही प्रगतिपुस्तकात नोंदवली जाई. विद्यार्थ्यांना क्रमिक विषयांखेरीज इतर विषयांचे गुणांकन 'अ' ते 'क' किंवा तशाच प्रकारे श्रेणी देऊन केले जाई. सर्व परीक्षात एक तोंडी परीक्षेचा घटक असे व त्यासाठी 'बॉईज टाऊन' किंवा इतर नामांकित शाळांतील शिक्षक येत. त्यांच्याशी इंग्रजी बोलण्याचा सराव आम्ही करत असू. ब्रिटिश कौन्सिलच्या 'लिंग्वाफोन'च्या रेकॉर्डस आम्ही इंग्रजीच्या अभ्यासाकरिता वापरत असू. काही दिवस ब्रिटनच्या व्हालंटरी सर्व्हिस ओव्हरसीज या कार्यक्रमातले एक इंग्रज शिक्षकही आमच्या शाळेत अधूनमधून येत. क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलने, सहली यांचे जास्तीत जास्त व्यवस्थापन विद्यार्थी करीत असत. चोवीस तास एकमेकांच्या सहवासात राहिल्याने आम्हा विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळाच 'बंधुभाव' नांदत असे व आज चाळीस वर्षांनंतरही तो टिकून आहे.

विद्या निकेतनामध्ये विद्यार्थ्यांना जे वातावरण व संस्कार यांचा लाभ होतो त्याचा परिणाम म्हणून त्याची बोर्डाच्या परीक्षेतली टक्केवारी नेत्रदीपक हवी अशी अपेक्षाही शिक्षकांनी बाळगली नव्हती. 'जे काही कराल ते आत्मविश्वासपूर्वक करा व स्वत:च्या हिमतीवर पुढे जा' ही खरी शिकवण होती. विद्या निकेतनच्या अनेक विद्यार्थ्यांनी शालान्त परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवून सुवर्णपदके व शिष्यवृत्त्या मिळवल्या. मात्र, उच्च शिक्षणासाठी गेल्यानंतर विद्या निकेतनसारखे वातावरण नसल्याने, गुणवत्ता असूनही काही जणांना सुरुवातीला भांबावल्यासारखे झाले. पण, ती अवस्था संपताच विद्या निकेतनाने दिलेल्या आत्मविश्वासाच्या शिदोरीच्या जोरावर पुन्हा शिक्षणाची नौका दिमाखात पैलतीरी आम्ही नेली.

ही विद्या निकेतने स्थापन करताना एक उद्देश 'उच्च शासकीय अधिकार पदांसाठी होणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी तयार करणे हाही होता.' या परीक्षा मात्र पदवीनंतर खुल्या होतात.

समाजात व जगात विद्या निकेतनाच्या शिदोरीच्या आधारे पुढे जात असताना आम्ही माजी विद्यार्थी आमच्या शाळेला व आम्हाला घडवणाऱ्या शिक्षकांना विसरलो नाही. विद्या निकेतनांचे रौप्य महोत्सव त्यांच्यासोबत आमच्या माजी विद्यार्थी संघटनांनी साजरे केले. आमचे नाशिकचे विद्या निकेतन गेली काही वर्षे धुळे येथे आहे. तर कोयनानगरचे पुसेगांव येथे स्थलांतरित झाले आहे. इतर दोन होती तेथेच असून केवळ आदिवासी मुलांसाठी केळापूर (जिल्हा यवतमाळ) येथे पाचवे विद्या निकेतन आहे. १९९२ साली विद्या निकेतनाचे जनक मा. मधुकरराव चौधरी तेव्हा विधानसभा अध्यक्ष असताना त्यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक-धुळे विद्या निकेतनाचा रौप्य महोत्सव धुमधडाक्यात साजरा झाला. आपण लावलेल्या

**शाळा म्हणजे चार तास वर्गात बसून शिक्षकांचे शिकवणे ऐकणे हा समज विद्या निकेतनांनी बदलला. इथे सोयी-सुविधा व उपक्रम भरपूर होते; पण, भपका नव्हता. विद्या निकेतनांना सुरुवातीच्या काळात सॅम महाबळेश्वरवाला, प्राचार्य भ. बा. सिंगम व प्राचार्य वि. वि. चिपळूणकर यांच्यासारखे अनुभवी, प्रगल्भ व प्रयोगशील, नावीन्याची ओढ असणारे (इनोव्हेटिव्ह) प्राचार्य लाभले. त्यांनी या आगळ्या वेगळ्या संकल्पनेला एक नवा आशय मिळवून दिला. त्यामुळे या शाळांची शिक्षण जगतात चर्चा झाली. रूढ मार्गाने न जाता वेगळ्या वाटेने ही प्राचार्य मंडळी गेली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांतील अर्थपूर्ण नाते विचारात घेऊन शिक्षकाला निव्वळ अध्यापकाच्या भूमिकेत नव्हे, तर खऱ्याखुऱ्या शिल्पकाराच्या भूमिकेत नेण्याचा त्यांचा प्रयत्न असे.**

रोपट्याची वाढ पाहून मा. चौधरी साहेबांना खूप समाधान वाटले.

मात्र, रौप्य महोत्सव साजरा करण्याच्या निमित्ताने व त्यानंतर वेळोवेळी शाळेला भेट देताना आम्ही माजी विद्यार्थ्यांना काही खटकले व खुपले ते आम्ही शासनाला बोलून दाखविले, ते म्हणजे पहिली दहा-पंधरा वर्षे विद्या निकेतनात जपले जाणारे वेगळेपण नंतरच्या काळात लोपलेले दिसत होते. शिक्षकवर्ग पुरेसा नेमलेला नाही, पूर्णवेळ प्राचार्य किंवा वसतिगृह अधीक्षक नाहीत, त्याहून वाईट म्हणजे शालान्त मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत विद्या निकेतनचे विद्यार्थी नापास होऊ लागले आहेत. हा आम्हाला मोठा धक्का होता, परंतु, विद्या निकेतनांची पूर्वीच्या मानाने होणारी उपेक्षा व आबाळ पाहता असे घडणे क्रमप्राप्त होते हेही लक्षात आले. आमची आयुष्ये घडविणाऱ्या विद्या निकेतनाची सद्य:स्थिती पाहवेना म्हणून माजी विद्यार्थी संघटनेने काही उपकारक हस्तक्षेप करण्याचे ठरविले. धुळे व नाशिक शहरात राहणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी विद्या निकेतनाशी संपर्क ठेवून शैक्षणिक सुधारणांपासून ते शैक्षणिक व इतर साहित्याच्या पुरवठ्यासाठी माजी विद्यार्थी संघटनेतर्फे मोठ्या प्रमाणावर शाळेस निधी पुरवला. संगणक, कपडे, क्रीडा साहित्य, पुस्तके यासारख्या वस्तूंचा स्वखर्चाने पुरवठा केला. हा खर्च वर्षभरात काही लाखांच्या घरात आहे व तो आम्ही करीत आहोत. सुदैवाने ही विद्या निकेतने सुरू झाली तेव्हाच्या सुवर्णकाळात कार्यरत असलेले शिक्षक मार्गदर्शनासाठी उपलब्ध आहेत. याचा लाभ विद्या निकेतनांनी घेतला पाहिजे. हा विषय शासनाच्या अखत्यारीतला आहे म्हणून आम्ही शिक्षणमंत्र्यांशी या विषयावर काही वेळा चर्चा केली आहे. त्यांचा या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन रचनात्मक व सहानुभूतीचा आहे; पण, समस्या सुटण्यास सुरुवात नाही. पाच विद्या निकेतनांपैकी काहींची यशाची परंपरा कायम आहे तर काहींना अधोगतीचा फटका बसतो आहे, सर्व विद्या निकेतनांमध्ये यशाची परंपरा पुन:स्थापित व्हावी, तसेच या शाळांतून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शनाची व्यवस्था स्थायी स्वरूपात निर्माण व्हावी यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. विद्या निकेतने हा महाराष्ट्राच्या शिक्षण संस्थेचा मानबिंदू आहेत. आज जरी त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्व संपून त्या प्रकारच्या व दर्जाच्या खाजगी शाळा प्रत्येक जिल्ह्याच्या गावी उभ्या राहिल्या असल्या तरी




**विद्या निकेतनांचे वेगळेपण**

*'महाराष्ट्रात ही विद्या निकेतने सुरू करण्यामागे एक उदात्त हेतू होता, एक स्वप्न होतं – ग्रामीण भागातील नवांकुरांचा शोध घ्यावा, काही निश्चित कसोट्या लावून त्यांच्यातून निवड करावी व गरिबी आणि मागासलेपण यांचा अडसर त्यांच्या विकासात येऊ नये म्हणून बालवयात अशा प्रतिभावान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी काही विशेष व्यवस्था करावी या उद्देशाने महाराष्ट्रात ही चार विद्या निकेतने सुरू करण्यात आली. युवकांचा शारीरिक, बौद्धिक, आत्मिक विकास करीत असतानाच त्यांच्यामधून समाजाशी बांधिलकी असणारे संस्कारसंपन्न नागरिक देशाला मिळावेत आणि आपल्या विकसित व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर त्यांनी जीवनाच्या विविध आघाड्यांवर कर्तृत्व गाजवावे, नेतृत्व द्यावे आणि त्याद्वारे राष्ट्रजीवन संपन्न करावे, ही ध्येये होती या विद्या निकेतनांचा प्रारंभ करण्यामागे.'*

**– मधुकरराव चौधरी**

ग्रामीण भागातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांचे विद्या निकेतन हे आशास्थान आहे. याच विद्या निकेतनच्या मॉडेलवर केंद्र शासनाने काही वर्षांपूर्वी नवोदय विद्यालये सुरू केली होती. तसेच विद्या निकेतनांचे यश पाहून काही जिल्हा परिषदा व साखर कारखान्यांनीही पब्लिक स्कूल काढण्याचा उपक्रम केला. आता तर इंटरनॅशनल स्कूलच्या जमान्यात पोहोचलो आहोत. समाजाची ही प्रगती वाखाणण्याजोगी आहे. मात्र, या शाळांमध्ये धनिक किंवा बऱ्यापैकी ऐपतदार घरातीलच मुले जाऊ शकतात. ध्येयवादी शिक्षकांचा संवर्ग निर्माण केला गेला तर ग्रामीण भागातील हुशार व होतकरू मुलांसाठी आजही शासकीय विद्या निकेतने हाच एक उत्तम पर्याय उपलब्ध आहे, तेच त्यांचे आशास्थान आहे. त्यांच्या पिछेहाटीस कारणीभूत त्रुटी शासन दूर करील ही अपेक्षा आहे.

**संपर्क :९२७०३२२३२०**




## आम्ही विद्यानिकेतनीय

विद्या निकेतनातून शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन, पदवीधर होऊन अनेक विद्यार्थी आज राज्य व केंद्र शासनात उच्च पदांवर आहेत. राष्ट्रपतींचे सचिव रवींद्र जाधव, सचिव संवर्गातील अनिल काळे, आर. एन. जोशी, प्रमोद नलावडे हे आयएएस अधिकारी, तुकाराम कासार, कृष्णराव शेलार यासारखे महाराष्ट्र शासनाच्या सेवा संवर्गात उच्चपदी असणारे अधिकारी, वि. वि. होशिंग, गुलाबराव माळी, सुधाकर बोरसे, विवेक घाणेकर यांच्यासारखे अभियंते, वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. सतीश कुलकर्णी (औरंगाबाद), डॉ. राजेंद्र मलोसे, (चांदवड) डॉ. विनोद नलावडे, (बुलढाणा), साहित्यात रमेश इंगळे-उत्रादकर व मंगेश बनसोड, मकरंद भारंबे यांच्यासारखे कवी, 'राभा'सारखा प्रतिभावंत चित्रकार, डॉ. वसंत कटारियासारखा धन्वंतरी, अमेरिकेतला मोहन पवारसारखा आयआयटीयन हे सारे त्यात आहेत. काही जण कॉर्पोरेट सेक्टरमध्ये गेले. त्यात अरुण पाटील यांनी जीवन विमा क्षेत्रात देश-विदेशात नाव कमावले आहे. ब्रिलियंट क्लासेसचे बळवंत काळभोर हे विद्यार्थ्यांना आय.आय.टी. प्रवेशासाठी अतिशय उत्तम मार्गदर्शन करतात. चाटे कोचिंग क्लासेसचे मच्छिंद्र चाटेही विद्या निकेतनचेच आहेत. अनेक वास्तुविशारद व सामाजिक बांधिलकीने घरबांधणी करणारे बिल्डर्स आणि उद्योजकही आमच्यातून निर्माण झाले. आपल्या मतदारसंघात सर्वाधिक योजना राबविणारे माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, माजी विधान परिषद सदस्य (पदवीधर) संजय केळकर आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे प्रमुख संचालक विनय सहस्रबुद्धे याच विद्या निकेतनातून शिकले आहेत. नवीन पिढीतले इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रात खूप माजी विद्यार्थी आहेत. युरोप-अमेरिकेत, ऑस्ट्रेलियात अनेक जण गेले आहेत. मराठी पत्रकारितेत मी स्वत: तसेच यमाजी मालकर व दत्ता पाटील यांनी नाव मिळविले आहे.

**सुविधा व शिष्यवृत्ती**

निवासी शाळा : प्रवेश प्रतिवर्षी ५ वीत ४० विद्यार्थी - स्पर्धात्मक प्रवेश परीक्षेतून, वसतिगृहे, भोजनालय, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडांगणे इ. दहावीपर्यंत शाळेत निवासी शिक्षण, दहावीनंतर पदवीपर्यंत ठरावीक गुणवत्ता राखण्याच्या अटीवर शिष्यवृत्ती, नामवंत शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांकडून 'गिव्ह बँक - कृतज्ञता व परतफेड' कार्यक्रमांतर्गत गेल्या दोन वर्षांत पंचवीस लाखांची साहित्यरूपाने मदत.

आमच्या शाळेचे एक मुद्दाम लिहून घेतलेले विद्या निकेतन गीत आहे. रोज प्रार्थनेच्या वेळी ते आम्ही म्हणत असू, आजही म्हटले जाते-

**कृष्ण सुदामा को था जैसा**
**सांदीपनी आश्रम प्यारा!**
**शासकीय विद्या निकेतन है हम सबको प्यारा!**
**हाथ सर आरोग्य हृदय ईश्वरकी हम को देन है!**
**सदुपयोग इनका करके, इनमे निपुणता पानी है!**

या गीतात शिक्षणशास्त्रातील हेड, हॅण्ड, हेल्थ व हार्ट ही 'फोर एच' गुंफलेली आहेत.

**शासकीय विद्या निकेतने : दृष्टिक्षेप**

प्रारंभ १९६६-१९६७, एकूण शाळा ५ (पाच), १. शासकीय विद्या निकेतन, धुळे (नाशिक विभाग), २. शासकीय विद्या निकेतन, औरंगाबाद (मराठवाडा विभाग), ३. शासकीय विद्या निकेतन, चिखलदरा (विदर्भ विभाग), ४. शासकीय विद्या निकेतन, पुसेगांव (सातारा) (पुणे विभाग), ५. शासकीय विद्या निकेतन, केळापूर, जि. यवतमाळ (आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळा)




# महाराष्ट्र : शिक्षणाची प्रयोगशाळा

कोणत्याही राष्ट्राची खरी संपत्ती ही भूगर्भात नसून ती लोकांच्या ज्ञान व कौशल्यात दडलेली असते. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व जाणणारे राष्ट्रच प्रगतीपथावर वाटचाल करते. मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा शिक्षणावर अवलंबून आहे. त्यातही प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षणाचे महत्त्व तर अनन्यसाधारण असेच आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा पाया शाळेतच रचला जातो. शाळेतून मिळालेले संस्कार आणि मूल्यांच्या आधारावरच पुढील शिक्षणातील यशापयश अवलंबून असते. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन केंद्र व राज्य शासनामार्फत शिक्षणविषयक अनेक उपक्रम राबविले जातात. आता तर शिक्षण हा मूलभूत हक्क ठरला आहे. 'बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' अन्वये मुलांना आठ वर्षे मूलभूत दर्जेदार शिक्षणाचा हक्क मिळाला आहे. सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे. त्याला शाळेत पाठविणे हे पालकाचे कर्तव्य आहे. तसे न झाल्यास कायद्यानुसार शिक्षेची तरतूदही करण्यात आली आहे.

सर्वसमावेशक वाढ होण्यासाठी शिक्षण हा एक प्रमुख घटक असून, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. शिक्षण सेवा देण्यात तंत्रज्ञानाचा वापर आणि शैक्षणिक क्षेत्रातील तंत्रज्ञान हस्तक्षेपास प्रोत्साहन यामुळे दर्जेदार शिक्षणसेवासह गरिबांना, विशेषत: समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या संधीही सहज उपलब्ध होतील. दर्जेदार मूलभूत शिक्षणामुळे सामाजिक आणि प्रादेशिक असमतोल कमी होऊन त्याद्वारे संतुलित वाढ व विकास साध्य होण्यास मदत होत आहे.

## किरण केंद्रे

राज्याच्या स्थापनेपासूनच महाराष्ट्र हे शिक्षण क्षेत्रात आघाडीवर असणारे राज्य आहे. दर्जेदार आणि गुणात्मक शिक्षणाबरोबरच शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आजवर अनेक महत्त्वाची पावले उचलण्यात आली. १९८६ मध्ये तत्कालीन मनुष्यबळ विकास मंत्री आणि माजी पंतप्रधान नरसिंहराव यांनी 'संपूर्ण देश महाराष्ट्राकडे शिक्षणाची प्रयोगशाळा म्हणून पाहत आहे', असे उद्गार काढले होते. महाराष्ट्राने देशाला शालेय शिक्षणाच्या क्षेत्रात आपल्या कार्यातून नवनवीन दिशा दाखवण्याचे काम केले आहे. महाराष्ट्रात प्रारंभ झालेल्या शिक्षणविषयक अनेक अभिनव उपक्रमांचा स्वीकार देशपातळीवर केला गेला आहे.

### शालेय शिक्षण

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण या कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या घरापासून १.५ कि.मी.च्या अंतरात शिक्षण विषयक सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदांना अनुदान वितरित करण्यात येते.

### सर्व शिक्षा अभियान

सर्व शिक्षा अभियानाने सुरुवात (२००१-०२) झाल्यापासून ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मूलभूत शिक्षण प्राप्त करून देऊन मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. समाधानकारक दर्जाचे मूलभूत शिक्षण केंद्रबिंदू मानून सामाजिक आणि लिंगभेदावर आधारित सर्व विषमता कमी करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

शारीरिक अथवा मानसिक विकलांग मुलांना सर्वसाधारण परिस्थितीत सर्वसाधारण मुलांसोबत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे व त्यांना सामाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी आणि त्यांच्या भावनिक उन्नतीसाठी राज्यात 'विकलांग समावेशक शिक्षण' कार्यक्रमामध्ये विशेष गरज असलेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना ब्रेल पुस्तक, चष्मा, श्रवणयंत्र आदी उपकरणे, वाचा प्रशिक्षक, इत्यादी पुनर्वसन व शैक्षणिक आधार सुविधा पुरविणे यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत २०११-१२ मध्ये फेब्रुवारी २०१२ पर्यंत ३.८६ लाख मुलांनी लाभ घेतला.

### शुल्क सवलती

शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या सहभागाला उत्तेजन देण्यासाठी आणि पालकांवरील आर्थिक भार हलका करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात सवलती देत आहे.

## मध्यान्ह भोजन योजना



केंद्र शासनाने वर्ष १९९५ मध्ये 'मध्यान्ह भोजन योजना' सुरू केली. वर्ष २००८-०९ मध्ये 'राष्ट्रीय मध्यान्ह भोजन योजना' या नावाखाली उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता या योजनेचा विस्तार करण्यात आला. या योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

- शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा, शासन अनुदानित, वस्तीशाळा, पर्यायी व नावीण्यपूर्ण शैक्षणिक केंद्रे, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे, आश्रमशाळा आणि अंध व अपंग मुलांकरिता चालविल्या जाणाऱ्या अनुदानित शाळा यांमधील विद्यार्थ्यांची पोषणस्थिती सुधारणे.
- गरीब व प्रतिकूल परिस्थितीतील मुलांना शाळेत नियमितपणे येण्यास आणि वर्गातील शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात उत्तेजन देणे.
- उन्हाळ्याच्या सुट्टीत दुष्काळग्रस्त भागातील प्राथमिक स्तरांवरील मुलांना पोषक आहार पुरविणे.





## मुलींच्या शिक्षणात अग्रेसर

मुलींचे शिक्षण ही शासनाच्या दृष्टीने प्राथम्याची बाब आहे. पटावरील मुलींच्या संख्येमध्ये विशेषत: ग्रामीण भागातील आणि प्रतिकूल परिस्थितीतील गटांमध्ये स्त्री-पुरुष असमानता दिसून येते. ही असमानता अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या बाबतीत विशेषत: उच्च प्राथमिक स्तरावर अधिक तीव्र आहे. ही असमानता दूर व्हावी म्हणून मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी वरदान ठरला आहे. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या काही योजना खालीलप्रमाणे आहेत :

■ **मुलींच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम :** मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने हा कार्यक्रम सुरू केला आहे. ग्रामीण स्त्री साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असलेले व स्त्री-पुरुष असमानतेचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असलेले शैक्षणिकदृष्ट्या मागास गट, जिल्ह्यातील ज्या भागात किमान पाच टक्के लोकसंख्या अनुसूचित जाती /अनुसूचित जमातीची आहे आणि अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीत स्त्री साक्षरतेचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी आहे असे गट तसेच काही निवडक शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये 'मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम' या अंतर्गत अतिरिक्त साधनांचा पुरवठा केला जातो. शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/ इतर मागासवर्ग अल्पसंख्याक आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील उच्च प्राथमिक स्तरावरील मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण, जीवनोपयोगी कौशल्य विकास, बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण इत्यादी नावीन्यपूर्ण कार्यक्रमांद्वारे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधींमध्ये वाढ करण्यावर भर दिला जात आहे.

■ **कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय :** ही योजना २००४ मध्ये शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/ इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक कुटुंबातील शाळाबाह्य मुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी निश्चित करण्याच्या हेतूने उच्च प्राथमिक स्तरावरील वस्तिशाळा स्थापन करण्यासाठी सुरू करण्यात आली. राज्यातील १० जिल्ह्यांत प्रत्येकी १०० मुली इतकी प्रवेशक्षमता असलेली ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये कार्यरत आहेत.

■ **उपस्थिती भत्ता योजना :** प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून राज्य शासनाने मुलींना 'उपस्थिती भत्ता' देण्याची योजना जानेवारी, १९९२ मध्ये सुरू केली. या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्षात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त दिवस शाळेत उपस्थित असणाऱ्या १ ली ते ४ थीपर्यंतच्या मुलींच्या पालकांना एक रुपया प्रतिदिवस आणि जास्तीत जास्त रु. २२०/- इतका उपस्थिती भत्ता दिला जातो. या योजनेमध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती आणि जमाती, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलींचा समावेश असतो.

■ **अहिल्याबाई होळकर योजना :** विद्यार्थिनींना मोफत प्रवास सवलत देण्यासाठी १९९६-९७ पासून राज्यात 'अहिल्याबाई होळकर योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील इ. ५ वी ते १० वीपर्यंतच्या मुलींना त्यांच्या गावात शाळा उपलब्ध नसल्यास शाळेत उपस्थित राहण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात येते.

## महाराष्ट्र छात्र सेना

**राज्य शासनाने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्व, सहकार, शिस्त, नेतृत्व, आत्मविश्वास, शौर्य आणि देशप्रेम या गुणांचा विकास करण्यासाठी 'महाराष्ट्र छात्र सेना' ही योजना सुरू केली. सर्व शाळांमधील इयत्ता ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी वैकल्पिक स्वरूपात ही योजना राबविली जाते. वर्ष २०१०-११ मध्ये या योजनेमध्ये २४ लाख विद्यार्थ्यांचा समावेश होता.**






# उच्च व तंत्र शिक्षण

राज्यात चार कृषी विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ आणि १३ अन्य सर्वसाधारण विद्यापीठे असून त्यामध्ये केवळ महिलांसाठी असणारे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, अनौपचारिक शिक्षणासाठी असलेले यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधन, विकास व प्रसार करण्यासाठीचे कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ, नागपूर यांचा समावेश आहे. यात्यतिरिक्त, राज्यात २० अभिमत विद्यापीठे आहेत.




## शिक्षण विकास निर्देशांक

शिक्षण विकास निर्देशांक हा राज्याच्या विशिष्ट निर्देशकांबरोबरच मूलभूत शिक्षणाचे नवीन पैलू दर्शवितो. भारतातील मूलभूत शिक्षण आणि सार्वत्रिक मूलभूत शिक्षणाच्या दिशेने प्रगती (फ्लॅश सांख्यिकी २००९-२०१०) अहवालानुसार महाराष्ट्र प्राथमिक स्तराकरिता १४व्या क्रमांकावर तर उच्च प्राथमिक आणि संयुक्त स्तराकरिता १३व्या क्रमांकावर असून शिक्षण विकास निर्देशांक अनुक्रमे ०.५८, ०.७५ आणि ०.६६ आहे.

...........................

## सैनिकी शाळा

राज्यात ३३ जिल्ह्यांमध्ये ४२ सैनिकी शाळा असून त्यांपैकी पाच शाळा फक्त मुलींसाठी, ३३ शाळा फक्त मुलांसाठी, चार सह शिक्षणासाठी आहेत. दोन शाळा विनाअनुदानित असून, या सर्व ४२ शाळांमधील पटावरील विद्यार्थी संख्या १५,०३२ आहे.




## क्रीडा शिक्षण

खेळांना प्रात्साहन देण्यासाठी व क्रीडापटुंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने १९९५ मध्ये पुणे येथे 'शिव छत्रपती क्रीडापीठाची' स्थापना केली. या क्रीडापीठाकडून ८ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता क्रीडा नैपुण्य चाचण्या घेतल्या जातात आणि १७ विविध खेळाडूंमधील विद्यार्थ्यांना सुमारे ८ ते १० वर्षे विशेष प्रशिक्षण दिले जाते. राज्यात ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. आतापर्यंत या प्रबोधिनीच्या १७ विद्यार्थ्यांनी 'शिव छत्रपती राज्य क्रीडा सन्मान' प्राप्त केला आहे आणि ४६ खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. शासन दरमहा प्रति प्रशिक्षणार्थी रु. ६,००० खर्च करते. वर्ष २०११-१२ मध्ये निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या ५९८ इतकी होती.

### क्रीडा प्रबोधिनीचं यश

| वर्ष | एकूण परीक्षार्थी | आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके | | | राष्ट्रीय स्तरावरील पदके | | | राज्य स्तरावरील पदके | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | सुवर्ण | रजत | कांस्य | सुवर्ण | रजत | कांस्य |
| २००८-०९ | ५०० | २ | ० | ० | ४६ | ५३ | २ | १६३ | ८९ | १२१ |
| २००९-१० | ५९० | ५ | २ | १ | ४६ | ३८ | ४० | २२९ | १२८ | ९१ |
| २०१०-११ | ५८६ | ३ | २ | ० | ६७ | ७० | ४६ | १७० | १११ | ९० |

(संदर्भ: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी) संपर्क : ७३०३४२८५५५





# आमचं शिक्षण-आमचा हक्क

महाराष्ट्राने गेल्या पन्नास वर्षांत विविध क्षेत्रांत मोठी झेप घेतली आहे. शिक्षणाचे क्षेत्रही त्याला अपवाद नाही. अगदी दुर्गम भागापर्यंत शिक्षणाची गंगोत्री नेण्यात यश आले आहे. देशभरात १ एप्रिल २०१० पासून बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम अंमलात आला आहे. केंद्र सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात उचललेल्या या क्रांतिकारी पावलाचे महाराष्ट्र शासनाने स्वागत केले असून, या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्याने आवश्यक पावले उचलली आहेत. प्राथमिक शिक्षण घेणे हा देशातल्या प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे. बालकांच्या गुणात्मक शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्राचा विकास घडविणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

या अधिनियमामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुला-मुलींसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण हा त्यांचा मूलभूत अधिकार ठरला आहे. थोडक्यात, प्रत्येक बालकाला आठवीपर्यंतचे शिक्षण विनामूल्य, वर्गभेद किंवा लिंगभेद न मानता देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे. यामुळे देशात एक समर्थ, शिक्षित आणि सक्षम तरुणाई निर्माण होण्यास निश्चित मदत होणार आहे. सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण व सक्तीचे शिक्षण देणे आणि त्यांना भारताचे सुजाण नागरिक बनण्यासाठी ज्ञान, कौशल्य व मूल्य यांनी सिद्ध करणे या अधिनियमात अभिप्रेत आहे.

केंद्र शासनाने पारित केलेला हा अधिनियम राज्यात लागू झाल्यामुळे त्यातील सर्व तरतुदींचे पालन होणे आवश्यक असल्याने पालकांमध्येही त्याबाबत कुतूहल होते. हा अधिनियम लागू झाल्यानंतरही अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे काय? हा पालकांसमोरील प्रश्न होता. त्यासंदर्भात विचारणाही होत होती. त्याविषयी स्पष्ट माहिती शैक्षणिक संस्था, शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक आणि सर्व संबंधितांना व्हावी म्हणून राज्य शासनाने परिपत्रक काढले आहे. त्यानुसार शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास मागे ठेवता येणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही. तसेच कलम ३० नुसार कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची समाधानकारक प्रगती नसलेल्या विषयांतील प्रगती अपेक्षित पातळीपर्यंत आणण्यासाठी संबंधित शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक राहील. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांची प्रगती होईल आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासही मदत होईल. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमधील परीक्षेची भीती दूर होईल आणि आनंददायी शिक्षणामुळे मुलांचे गळतीचे प्रमाण कमी होऊ शकेल.

नव्या व्यवस्थेत विद्यार्थ्यांतील बहुआयामी प्रतिभेचा विकास साधणे यावर भर राहणार आहे.




संस्कारक्षम वयातच नाउमेद झालेली पिढी देशाचे भवितव्य कशी घडवू शकेल? म्हणून अनुत्तीर्ण झालेला विद्यार्थी नाउमेद होऊ नये. कदाचित तो एखाद्या कलेत पारंगत असू शकतो. त्याच्यात मोठा व्यावसायिक होण्याची क्षमता असू शकते. ती आजच ओळखता येणार नाही. म्हणूनच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनाही पुढील वर्गात प्रवेश देऊन त्यांना अपेक्षित पातळीवर आणण्याची जबाबदारी शिक्षक व शाळांची राहणार आहे. त्यासाठी हा कायदा निश्चितच प्रेरक ठरेल.

राज्यात या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ठोस पावले उचलण्यास सुरुवात झाली आहे. या कायद्याच्या दृष्टीने सर्व मुलांना शाळेमध्ये सामावून घेणे, शाळेतील मुलांची गळती रोखणे

**या अधिनियमानुसार प्रत्येक तीस विद्यार्थ्यांमागे एक प्रशिक्षित शिक्षक आवश्यक राहील. त्यासाठी पाच वर्षांची मुदत आहे. तसेच पायाभूत सुविधाही उपलब्ध करून द्याव्या लागतील. त्यात पुरेसे वर्ग, प्रसाधनगृहे, अपंगांना सहज प्रवेश, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आदींचा समावेश आहे. शाळा व्यवस्थापन समितीत पालकांना स्थान देणे आवश्यक आहे. शाळेत न जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य त्या वर्गात दाखल करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे. यातून केंद्र शासनाने शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.**

आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे या तीन बाबी विशेष महत्त्वाच्या आहेत. त्यांच्या पूर्ततेसाठी शाळांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करणे, नवीन अभ्यासक्रम विकसित करणे, सर्वंकष व सातत्यपूर्ण मूल्यमापन पद्धतीत सुधारणा करणे आदींवर भर देण्यात आला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेला विकसित लोकचळवळीचे स्वरूप देण्याची गरज आहे. त्यात शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्राम शिक्षण समिती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महापालिकेतील लोकप्रतिनिधी, आधिकारी आदींना समावून घेतले पाहिजे.

**– अर्चना शंभरकर, संपर्क : ९३२४९७३९४७**

## ऋषिपरंपरेतील प्राचार्य...



**पान १३ वरून**

**प्रश्न– या शाळेत आणि पुढे राज्याच्या शैक्षणिक प्रशासनात आपण जे काम केले त्यावरून आपण एकूण शिक्षणाबद्दल आणि पद्धतीबद्दल काय सांगाल?**

**उत्तर–** शिक्षण हे मूल्याधिष्ठित असले पाहिजे आणि ते तसे असावे हे लक्षात घेऊनच आपल्याकडे पाठ्यपुस्तकांची रचना केलेली आहे. मातृप्रेम, देशप्रेम, विश्वबंधुत्व, स्वावलंबन, निर्भयता, मनाचा आणि दृष्टीचा विकास अशा बाबी शिक्षणातून संक्रमीत होतात. आपण मुलांच्या बोटातील जादू जागी केली पाहिजे. कोणतेही काम वाईट नसते. मात्र, जे काम आपल्या हाती येते ते उत्कृष्टच करण्याचा संस्कार होणे गरजेचे आहे. अहंकार असता कामा नये. शुचिता हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे आणि ते जपले पाहिजे याची जाणीव शिक्षणातून झाली पाहिजे. प्रेम, जिव्हाळा आणि संपर्क या निदान शालेय शिक्षणात फार महत्त्वाच्या बाबी आहेत. मी नेहमी म्हणत असतो की, आपण समोर बघून नव्हे, तर खाली आणि अधून-मधून चोहीकडे बघत चालले पाहिजे. जो समोर बघूनच चालतो तो खड्ड्यात पडतो. शिक्षणाचे नाते समाजाशी आहे. आपण विशेषत: पालकांनी गुणवत्तेची संकल्पना नीट समजावून घेतली पाहिजे. परीक्षेतील गुण म्हणजे विद्यार्थ्याची गुणवत्ता हे समीकरण सगळ्यांनीच स्वीकारल्यामुळे काही प्रश्न निर्माण झाले आहेत. शैक्षणिक प्रशासन शिक्षकाभिमुख असणे आणि शिक्षक विद्यार्थीभिमुख असणे गरजेचे आहे. समाजाने शिक्षकाची काळजी घेतली पाहिजे. गर्भवती स्त्री तिच्या गर्भाची काळजी घेत असते. आपले काम गर्भवतीची काळजी घेणे हे आहे. शिक्षणातून ममता आणि समता, स्वावलंबन आणि शुचिता या मूल्यांचा संस्कार होणे गरजेचे आहे. मी एकटा नाही. माझ्याबरोबर समाजातील सारे आहेत. त्यांच्याशी माझे नाते आहे. आम्ही सर्व समान आहोत. हे शिक्षणातून रुजले पाहिजे. माणूस घडविणारे शिक्षण हवे. आज समाजाला अशा शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाने जीवनाचा अर्थ शोधावयाचा असतो.

**प्रश्न– सरकारने शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा केला आहे. त्याबाबत आपले काय मत आहे?**

**उत्तर–** शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे, या भूमिकेशी सुसंगत असा हा कायदा आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हा या कायद्याचा केंद्रबिंदू असला पाहिजे. प्रश्न कायद्यातील तरतुदींचा नाही. या तरतुदींच्या अंमलबजावणीचा विचार आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी सर्वत्र होणे गरजेचे आहे. मुळात असे कायदे तयार करताना त्याचा तज्ज्ञांच्या पातळीवर विचार झालेलाच असतो. त्यामुळे त्यातील तरतुदी तत्त्वत: चुकीच्या नसतात. अंमलबजावणी नेटाने होणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

**प्रश्न– आपण निवृत्तीनंतर औरंगाबादेत स्थायिक झालात आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करता आहात. या कामाकडे आपण कसे वळलात?**

**उत्तर–** तसा मी मूळचा मुंबईचा. नोकरीच्या निमित्ताने अनेक ठिकाणी फिरलो. पुण्यात राहात होतो; पण, औरंगाबादकरांनी त्यांच्या माझ्यावरील प्रेमापोटी मला इथे खेचून आणले आहे. जवळपास २५ वर्षे मी येथे आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनेकडे मी तसा वळालो नाही. ते कामच माझ्याकडे आले. तेथेही काही नवे उपक्रम राबविण्याचा मी प्रयत्न केला. संघटनेतील सगळ्यांनीच कामाची तयारी ठेवावी आणि कोणा एकाकडे सतत नेतृत्व सोपविले जाऊ नये असा आग्रह धरला आहे.

**शब्दांकन– राधाकृष्ण मुळी (९४२२६४८९२५),**
**यशवंत भंडारे (९८६०६१२३२८)**



# आयुष्याच्या सी.ई.टी.चं शिक्षण


**डॉ. सागर देशपांडे**

आपल्या देशात तसंच राज्यात शिक्षण क्षेत्राचा विचार केल्यास त्यात इतर क्षेत्रांप्रमाणंच अनेक समस्या आहेत. त्या सोडवण्यासाठी सरकारबरोबरच समाजाचेही प्रयत्न आवश्यक आहेत. भारताची निम्मी लोकसंख्या आता 'तरुण' असणार आहे. जगातील अन्य देशांना हे भाग्य लाभणार नाही. अगदी चीनलाही. गरज आहे ती अशा तरुणाईला देशविकासाच्या, देशाचे प्रश्न सोडवण्याच्या कामात सहभागी करून घेत-घेत स्वावलंबनानं जगायला शिकवणारं शिक्षण देण्याची. ही कोट्यवधी तरुण मुलं-मुली हेच आपल्या देशाचं बलस्थान आहे हे लक्षात घेऊन सरकार आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी व संस्थांनी अहोरात्र कार्यरत व्हायला हवं. तरुणांची ही फौज जर सुशिक्षित, सुसंस्कारित आणि स्वावलंबी झाली तर आपोआपच भारताला महासत्तेचा मार्ग गवसणार आहे. त्यासाठी आधी प्रश्न समजून घेऊया आणि त्यावरील उपाययोजना एकत्रित येऊन राबवूया.

भारतात ६ ते १४ वयोगटात असलेल्या कोट्यवधी मुला-मुलींपैकी सुमारे ४ कोटी मुलं शाळाबाह्य असल्याचं सांगण्यात येतं. निम्म्या मुलांना धड वाचताही येत नाही. त्यामुळं पुढं गळतीचं प्रमाण वाढतं आणि जेमतेम काही लाख मुलंच पदवीपर्यंतचं शिक्षण घेऊ शकतात. प्राथमिक - माध्यमिक शिक्षणावर हजारो कोटी रुपये खर्च होतात. सर्व शिक्षा अभियानासारख्या योजना आपलं सरकार राबवतं. प्रत्यक्षात दहावीपर्यंत किती जण पोचतात? एवढा आटापिटा करून महाराष्ट्रासारख्या पुढारलेल्या राज्यातील लक्षावधी मुलं-मुली अशी सापडली की जी शाळेत जातात; पण, त्यांना लिहिता - वाचता येत नाही. शिक्षणमंत्र्यांनीच काही महिन्यांपूर्वी ही कबुली दिली आहे. हा दोष कुणाचा? हा दोष केवळ सरकारचा म्हणता येणार नाही. समाज घटक म्हणून आपण सर्वच जण विशेषतः शिक्षक, पालक, शिक्षण संस्थाचालकही काही अंशी याला जबाबदार आहेत. हे दोष दुरुस्त करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे. केवळ सरकारवर ही जबाबदारी ढकलता येणार नाही.

खरंतर शाळा म्हणजे मुलांच्या अंगणातलं झाड असलं पाहिजेत. पण आजचं वास्तव काय आहे?

महाराष्ट्रातील चित्र काय आहे? एक शिक्षकी शाळा, पटपडताळणीनंतर उद्‌भवलेली परिस्थिती, शिक्षक, प्रशिक्षण याबाबत सरकार आपल्या परिनं प्रयत्न करत आहे. मात्र, हे प्रयत्न व्यापक व्हायला हवेत. त्यात सर्वांना सामावून घेतलं जायला हवं. शिक्षकांनी-प्राध्यापकांनीही आत्मपरीक्षण करायला हवं. आपण दिवसातले किमान सात तास मुलांच्या सहवासात असताना त्यांना निदान लिहिता - वाचता तरी यायला नको का? याचा गंभीरपूर्वक विचार केव्हा होणार?




शंभर कोटींच्या या देशात शेकडो जाती - पोटजाती, अनेक भाषा लिहिता येणाऱ्या आणि केवळ बोलता येणाऱ्या अशा शेकडो लोकभाषा असताना एकाच चौकटीतले शिक्षण देणारी व्यवस्था अंमलात आणणं कितीही ठरवलं तरी अवघड आहे. म्हणूनच प्राचीन काळातील गुरुकुलांपासून ते अत्याधुनिक अभिमत आणि खाजगी विद्यापीठांपर्यंतचा प्रवास आणि 'आचार्यां'पासून ते 'शिक्षणसेवक' पदापर्यंतचा दुसऱ्या बाजूचा प्रवासही लक्षात घ्यावा लागेल.

"Education is the chief defense of nation" असं प्रसिद्ध शैक्षणिक विचारवंत ब्रुके यांनी म्हटलं होतं. प्रत्यक्षात आज आपण शिक्षणाला एवढं महत्त्व देतो का? याचाही सर्व समाजघटकांनी विचार करायला हवा.

### पूर्वशालेय शिक्षणापासूनचा प्रवास

खरंतर बालवाडीच्या स्तरावरील म्हणजे पूर्वशालेय शिक्षण आणि प्राथमिक शिक्षण हा टप्पा मुला-मुलींच्या दृष्टीनं अधिक महत्त्वाचा. त्यांच्या शैक्षणिक आयुष्याच्या इमारतीचा आणि एकूणच व्यक्तिमत्त्वाच्या 'जडणघडणी'चा हा महत्त्वपूर्ण काळ. या स्तरावरचं शिक्षण अधिक कसदार कसं होईल याकडं लक्ष दिलं पाहिजे. कारण, या वयातील




आवडी-निवडी, क्षमता यांच्या आधारेच त्या मुलाचा भावी शैक्षणिक प्रवास सुरू होणार असतो.

या शिक्षणाची सद्य:स्थिती पाहता एकीकडं बालवाडीसाठी आपापल्या मुला-मुलींवर दर महिना सरासरी ४ ते ५ हजार रुपये खर्च करणारी मंडळी आहेत, त्या आपल्या समाजात मुलांच्या शिक्षणासाठी महिन्याला ५० ते ६० रुपये खर्च करणंही अशक्य असलेले लोक अधिक आहेत.

खरंतर कोणत्याही काळातली शिक्षणपद्धती ही त्या त्या देशाची - प्रांताची आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक, सामाजिक स्थिती - परंपरा आणि त्या काळाची गरज लक्षात घेऊन ठरवणं गरजेचं असतं. क्रमा-क्रमानं ती पद्धत आवश्यक त्या बदलांसह विकसित होत गेली पाहिजे. मात्र, आजही काही वेळा ब्रिटिशकालीन शिक्षणपद्धतीचाच पदर धरून आपण चाललो आहोत की काय असं वाटतं. त्यामुळं हाती काय आणि किती लागलं याचाही विचार व्हायला हवा.

## सलग विचार व्हायला हवा

मुला-मुलींच्या वाढत्या वयासाठी विशेषत: १० ते १३ वयोगटासाठी योग्य - पोषक आहार, सकस शिक्षण, आरोग्य सेवा, क्रीडा शिक्षण याकडं लक्ष द्यायला हवं. त्यासाठी संलग्न स्वरूपाचा एकत्रित कार्यक्रम आखायला हवा. अलीकडच्या काही वर्षांपूर्वी कोल्हापूर जिल्ह्यात 'राजर्षी शाह सर्वांगीण शिक्षण कार्यक्रम' राबवण्यात आला. शिक्षणापासून आरोग्यापर्यंत एकत्रितपणे या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली आणि ८० टक्के शाळांमधून शिक्षक आणि संबंधित अधिकारी व अन्य घटकांनी मेहनत घेतली असल्याचं निरीक्षण या संस्थेनं नोंदवलं आहे. असे कार्यक्रम अधिकारी बदलले की बंद पडता कामा नयेत. ते सलगपणे राबवले जावेत आणि शक्य त्या सर्व ठिकाणी स्थानिक परिस्थितीनुसार बदल करून अशा उपक्रमांचंही सार्वत्रिकीकरण व्हायला हवं.

सार्वत्रिक स्तरावर आपण अजूनही केवळ १०+२+३ या पॅटर्नवरच रखडलो आहोत असं दिसतंय. परीक्षेत अयशस्वी होणारा, नापास होणारा विद्यार्थी हा जीवनाच्या इतरही क्षेत्रांत अयशस्वी होतो याच गैरसमजाची दहशत विद्यार्थ्यांपासून ते शिक्षक-पालकांपर्यंत सर्वांच्या मनात असते. त्यामुळे काही सक्तीचे विषय आणि वार्षिक परीक्षेतील / बोर्डाच्या परीक्षेतील टक्केवारी याचंच उद्दिष्ट शिक्षक -विद्यार्थ्यांसमोर असतं.



त्यासाठी प्रसंगी सामूहिक कॉपीचे प्रकारही वाढू लागले आहेत. परीक्षांच्या निकालानंतर विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रकार घडू लागलेत. शिक्षण हे विद्यार्थीकेंद्रित असण्याऐवजी परीक्षाकेंद्रित बनलंय.

## उच्च शिक्षणाचं चित्र

देशातील - राज्यातील उच्च शिक्षणाचं चित्र तर याहून आणखी वेगळं आहे. देशाला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा १८ विद्यापीठं होती. आज ६०० हन अधिक विद्यापीठं भारतात आहेत. तरीही जागतिक स्तरावरील पहिल्या ५० विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही ही वस्तुस्थिती आहे. दुसरीकडं जगातील तिसऱ्या क्रमांकाचं मनुष्यबळ आपल्याकडं असल्याचा दावा आपण करतो. मात्र, आता महासत्ता बनण्याच्या स्पर्धेत अग्रेसर असलेल्या चीननं देखील जागतिकीकरणाचा लाभ उठवत 'दर्जेदार शिक्षण तुम्हाला परवडणाऱ्या किमतीत' असं सूत्र डोळ्यांसमोर ठेवलं आहे. त्यासाठी अलीकडेच तिथल्या विद्यापीठांचे प्रतिनिधीही भारतात येऊन गेले. या बदलत्या परिस्थितीला आपल्याकडील शिक्षण व्यवस्था, शिक्षक, विद्यार्थी, पालक कसे सामोरे जाणार, हा सध्याचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

## वंचितांचं शिक्षण


जी मुलं समाजात शिक्षणापासून वंचित राहिली आहेत, ज्यांना शिक्षणाची संधीच उपलब्ध होऊ शकत नाही, आई-वडिलांप्रमाणे काहीतरी मोलमजुरी करून उदरनिर्वाह चालवायचा अन्यथा गुन्हेगारीकडं वळायचं हीच ज्यांची जीवनशैली बनलेली असते, त्यांचाही शिक्षणाच्या दृष्टीनं विचार व्हायला हवा.

## शिक्षक - पालकांचं काय ?

आजवर आपण मुलांना घडवतो असं म्हणणाऱ्या पालकांनी आणि शिक्षकांनी आता हेही लक्षात घ्यायला हवं की, मुलंही आपल्याला घडवत असतात. त्यांच्या निमित्तानं आपल्या स्वत:लाही घडवायची संधी मिळते, ती आपण दवडता कामा नये.

## शिक्षकांचं स्वयंमूल्यमापन हवं

वरील सर्व विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असं म्हणता येईल की, शिक्षकांनी काय केलं पाहिजे हे सांगणाऱ्या यंत्रणा आता खूप आहेत. शिक्षक काय करतात हे तपासण्याचीही यंत्रणा शिक्षण खात्यामध्ये आहे. पण, शिक्षकांनीच जर स्वत:ला काही प्रश्न विचारले, स्वत:च त्यांची उत्तरं शोधली आणि निरपेक्षपणे स्वत:चंच मूल्यमापन



# जडण-घडण करिअरची



**शालेय, महाविद्यालयीन पातळीवर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देतानाच आता तंत्रशिक्षणाकडंही अधिक लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा आनंद घेत घेत स्वतःच्या पायावर उभं राहावं यासाठी मदत करणारं शिक्षण देण्याची आज सर्वाधिक गरज आहे. विविध पातळ्यांवर त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेतच. ते सर्वदूर व्हायला हवेत. तसेच विविध विषयांमधील उपलब्ध करिअर्सची माहिती देखील मुलांपर्यंत ८ वी नंतरच्या पातळीवर पोहोचायला हवी. त्या त्या मुला-मुलींचा कल लक्षात घेऊन पालक-शिक्षक-शिक्षण संस्थांनी करिअरबाबत मुलांना सजग करायला हवं. नोकऱ्यांबरोबरच रोजगाराच्या अन्य दालनांचाही पर्याय त्यांना सुचवायला हवा. मुला-मुलींची आवड, त्यांचा कल, त्यांची क्षमता लक्षात घेऊन सुयोग्य करीअर निवडण्यासाठी आता शिक्षण संस्था, पालक, शिक्षकांची भूमिका खूप मोलाची आहे. जागतिकीकरणानंतरच्या सध्याच्या वातावरणात वैश्विक स्पर्धेला खंबीरपणे सामोरं जात स्वतःचं आयुष्य घडवणारी मुलं-मुली आपल्याला शिक्षणाच्या माध्यमातून घडवायची आहेत.**

करण्याचा प्रयत्न केला तर, त्यातून पुढे जाण्याची दिशा त्यांना नक्कीच सापडू शकेल.

(१) मी शिक्षकी पेशा का निवडला?

(२) शिक्षक म्हणून माझ्या अंगी कोणत्या क्षमता आहेत?

(३) मी ज्या संस्थेत, परिसरात कार्यरत आहे त्या संस्थेची / परिसराची शक्तिस्थानं, तेथील अडचणी आणि मर्यादा काय आहेत हे ओळखणं.

(४) या अडचणींचा / मर्यादांचा मी पुरेसा विचार करून काही उपाययोजना शोधल्या का?

(५) शिक्षक या नात्यानं विद्यार्थ्यांच्या, संस्थेच्या, समाजाच्या माझ्याकडून काय अपेक्षा आहेत? त्या मी कितपत पूर्ण करू शकतो?

(६) अभ्यासक्रम, त्याची रचना, परीक्षा आणि शैक्षणिक क्षेत्रात येऊ घातलेले बदल याचा पुरेसा अभ्यास मी केलाय का?

(७) माझे माझ्या क्षेत्रातील ज्ञान अद्ययावत आहे काय? नसल्यास त्यासाठी काय केले पाहिजे?

(८) शिक्षक म्हणून काम करताना त्याला पूरक असे वाचन, प्रयोग आणि प्रकल्प कोणते आहेत? त्यासाठी मी काय परिश्रम घेतले आहेत?

(९) मी करीत असलेल्या कामामुळे या देशाच्या विकासाला नेमका काय आणि किती उपयोग होतो?

### शिक्षक घडवू

समाजातील अनेक घटकांची, व्यवसायांची उपयुक्तता मान्य करूनसुद्धा आपल्या प्राचीन संस्कृतीपासून 'शिक्षका'ला/गुरूला जे स्थान मिळालं आहे ते आजही खूप वरचं आहे. प्रतिष्ठेचं आहे. संपूर्ण समाज घडवण्यामध्ये शिक्षकाची प्रक्रिया फार मोलाची आहे. सुदैवाने आज शिक्षक-प्राध्यापकांचे वेतन चांगले आहे, त्यांना स्थिरता आहे, पुरेशा सुट्ट्या वगैरे सुविधा आहेत. उद्याचा ग्लोबल भारत घडवणारे, चैतन्याने भरलेले हजारो लाखो जीव आपल्या हाताने घडवण्याची संधी मिळाली आहे, मुळात याच्यासारखे भाग्य कोणते? हे लक्षात घेऊन आपले काम उत्तमपणे आणि प्रभावीरीतीने करत-करत संपूर्ण देशासाठी, राज्यासाठी नवीन मुला-मुलींमधून शिक्षक-प्राध्यापक घडवण्याचे एक सार्वत्रिक मिशन सरसकट आपण सर्वांनी हाती घ्यायला हवं.

आज विद्यार्थ्यांमध्ये एवढी स्पर्धा आहे, मग ती शिक्षकांमध्ये नको का? अशी स्पर्धा आवश्यक असल्यास ती केवळ पुरस्कार आणि वेतनवाढीसाठी असता कामा नये, तर ती स्वतःच्या, विद्यार्थ्यांच्या, संस्थेच्या, परिसराच्या सर्वांगीण विकासाला पूरक ठरणारी असायला हवी.

**संपर्क : ९८५०८८५६३६**




# आम्ही वैज्ञानिक घडवतो

## शुभदा चौकर

अनेक लहान मुलांच्या मनात अंगभूत कुतूहल असते. का, कसे, अशा प्रश्नांची सरबत्ती मुले करीत असतात. यातील बहुतांश प्रश्नांना शास्त्रीय उत्तरे असतात. पण, ती देण्याची क्षमता, वेळ आणि उत्साह अनेकदा ना पालकांकडे असतो, ना शिक्षकाकडे. मग, मुलांचे प्रश्न तसेच विरून जातात. मुलांचे कुतूहल शमवण्याचे निमित्त म्हणजे डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा! शालेय मुलांच्या जिज्ञासेला वाव मिळावा, कुतूहल शमवण्याची सवय त्यांना लागावी, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, यासाठी मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे इयत्ता सहावी आणि नववीसाठी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा आयोजित केली जाते. ही स्पर्धा मराठी आणि इंग्रजी या दोन्हीपैकी कोणत्याही माध्यमातून देता येते. गेली ३२ वर्षे ही स्पर्धा सुरू आहे. दरवर्षी महाराष्ट्रभरातील हजारो मुले (सुमारे ४०,०००) या स्पर्धेला बसतात.

या स्पर्धेच्या निमित्ताने मुलांनी घर आणि परिसरातील विज्ञान समजून घ्यावे, मूलभूत संकल्पना स्पष्ट करून घ्याव्यात, असे अपेक्षित असते. या स्पर्धेतील प्रश्न रोचक असतात. उदाहरणार्थ- दातदुखीसाठी लवंग का वापरतात? जायपत्री हा झाडाचा कोणता भाग आहे? घड्याळाच्या सेकंद काट्याचा वेग किती असतो? जेल पेनच्या शाईत कोणता घटक महत्त्वाचा असतो? टीव्हीच्या रिमोट कंट्रोलमध्ये कोणत्या लहरींचा वापर केला जातो? इत्यादी..

ही एकमेव शालेय स्पर्धा असावी जी चार टप्प्यांत घेतली जाते- आधी लेखी, मग प्रात्यक्षिक, नंतर प्रकल्प करणे आणि त्यानंतर मुलाखत. पहिला लेखी परीक्षेचा टप्पा होतो सप्टेंबर महिन्यात. त्यातून ७.५ टक्के विद्यार्थ्यांना पुढच्या प्रयोग स्पर्धेसाठी निवडले जाते. प्रयोग स्पर्धा जानेवारीत होते. या फेरीच्या तयारीसाठी घरच्या घरी प्रयोग करून बघण्याचा सराव करावा लागतो, जे मुले खूप आवडीने करतात. हा सराव म्हणजे घरच्या प्रयोगशाळेत लुडबुड करण्याचा परवानाच! यातून १० टक्के मुले निवडली जातात. त्यांना एक विषय दिला जातो. त्या व्यापक विषयातील एक छोटा विषय निवडून त्या विषयावर कृती संशोधन प्रकल्प करायचा. यातून मुलांना संशोधनाची पद्धत कळते. प्रकल्प पूर्ण झाल्यावर काहीतरी संशोधन स्वत: केल्याचे समाधान मोठे असते.

महाराष्ट्रातील मुलांची खरी कल्पकता आणि संशोधनवृत्ती बघायची तर या स्पर्धेतील मुलांचे कृती संशोधन प्रकल्प बघावेत. यंदा रत्नागिरीच्या चैतन्य श्रीरंग वैद्य या नववीतील मुलाने मोटारीच्या लीड ॲसिड Battery मधील वाया जाणाऱ्या घटकांचा पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरण कसे करता येईल, त्याचा प्रयोग केला आहे. Battery मधील शिसे वितळवून त्याचे पुन्हा पत्रे बनवता येतील. Battery मधील मुख्य घटक म्हणजे सल्फ्युरिक ॲसिड. हे आम्ल विरल करून शाळा व महाविद्यालयात Table Reagent म्हणून वापरता येऊ शकते. तसेच या आम्लाचा उपयोग करून calcium sulphate, soidium sulphate, copper sulphate, uric acid तयार करण्याचा पूरक व्यवसाय उभारता येईल- असे चैतन्यने सूचवले आहे. सहावीतील कौशल गवाणकर याने घरच्या घरी नारळाचा काथ्या, उसाची चिपाडे यांच्यावर प्रक्रिया करून त्यावर अळिंबीची यशस्वी लागवड केली. एका मुलाने पनीर, चक्का बनवताना जे पाणी वाया जाते त्यापासून यव्हें ड्रिंक बनवले. कितीतरी मुले असे भन्नाट प्रकल्प करतात.




या स्पर्धेतील निवडक यशस्वी मुलांना सुवर्णपदके, रौप्यपदके आणि प्रमाणपत्र, तसेच रोख बक्षीस देऊन गौरवले जाते. या बक्षीस समारंभाला ज्येष्ठ वैज्ञानिक हजेरी लावतात. सर्व यशस्वी मुलांचे एक शिबीर डॉ. होमी भाभा विज्ञान केंद्रात आयोजित केले जाते.

या स्पर्धेची तयारी कशी करावी, स्वत:चा अभ्यास स्वत: कसा करावा, याचे मार्गदर्शन करणारे अधिकृत पुस्तक मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाने लिहिले आहे. त्यात गेल्या काही वर्षांतील प्रश्नपत्रिका सोडवून दाखवल्या आहेत. शिवाय सरावासाठी प्रश्न आहेत. लेखी चाचणी, प्रयोग फेरी, कृती संशोधन प्रकल्पाचे यंदाचे विषय, मुलाखत कशी द्यावी, अशी परिपूर्ण माहिती या पुस्तकात आहे. ही मराठी, इंग्रजी पुस्तके 'मेनका प्रकाशन'ने प्रसिद्ध केली आहेत.

गेल्या ३१ वर्षांत या स्पर्धेच्या मांडवाखालून गेलेल्या कितीतरी मराठी मुलांनी पुढे आव्हानात्मक करीअर करून जीवनात यश मिळवले आहे. अशा काही यशस्वी मुलांवरील एक छोटा लेखही या पुस्तकांत आहे. तो आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांनी व पालकांनी जरूर वाचावा.

**संपर्क :९८२०९२५२६९**

**संपर्क :** www.msta.in किंवा www.menakaprakashan.com या वेबसाईटला भेट द्या. स्पर्धेची माहिती मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या मुंबई, मालाड येथील कार्यालयात मिळू शकते. तेथील संपर्क क्र. ०२२-२८८०६९९५. मंडळाचे अधिकृत प्रतिनिधी राज्यभर ठिकठिकाणी आहेत. स्पर्धेसाठी नोंदणी २० जुलैपर्यंत करता येते. पुस्तकासाठी ०२०-२४३३६९६० किंवा ९८२३६९६९६० या क्रमांकावर संपर्क साधता येईल. ही पुस्तके थेट www.menakaprakashan.com किंवा  www.flipkart.com या वेबसाईटवरूनही घेता येतील.

# मानदंडाची प्रतिष्ठा




महाराष्ट्रावर जेव्हा जेव्हा नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती कोसळते, तेव्हा सर्वांत आधी या आपत्तीशी सामना करण्यासाठी मंत्रालय सज्ज होतं. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव जिथे कुठे असतील त्या ठिकाणाहून तडक मंत्रालय गाठतात आणि अल्पावधीतच आपत्ती निवारण्याच्या कार्याचं संनियंत्रण सुरू होतं. वेगवेगळ्या स्तरांवरील यंत्रणांना सजग केलं जातं. आपत्तीनंतर दिलासा देण्याची यशस्वी कामगिरी मंत्रालयातून पार पाडली जाते. भूकंप, बॉम्बस्फोट, दुष्काळ, महाप्रलय, लोकल रेल्वे अपघात अशा अनेक संकटांचा सामना मंत्रालय नामक दगडी आणि निष्प्राण दिसणारी पण सतत उत्साहाने कार्यरत असणारी वास्तू करीत असते. अशा संकटांनी ही वास्तू कधी खचली नाही, निराश झाली नाही. आशेचा किरण इथूनच मिळू शकतो, हा जनसामान्यांचा विश्वास गेली ५० वर्षे या वास्तूने कायम ठेवला.

पण, २१ जून गुरुवारचा दिवस या वास्तूसाठी वेगळी दाहकता घेऊन आला. सकाळी नेहमीच्या प्रसन्न, उत्साही व सकारात्मक स्वरूपात या वास्तूची काया कार्यप्रवण झाली. सारं काही सुरळीत सुरू असताना, चौथ्या मजल्यावर ठिणगी पडली. शॉर्ट सर्किट झालं. ठिणगी उडली. आग पसरत गेली. काही कळण्याच्या आत ही आग कागदं, कपाटं, संगणक, खुर्च्या, टेबल्स, फाईल्स इतर साहित्य यांना गिळत गेली. पुढच्या दोन तासांत मंत्रालयाचे ४, ५ व ६ हे पूर्ण मजले आणि ७ वा अर्धा मजला यांची काया काळवंडली.

राज्यावरील प्रत्येक संकट निवारण्याची जबाबदारी तत्काळ शिरावर घेणारे मंत्रालय पन्नास वर्षात पहिल्यांदा स्वत:च अभूतपूर्व अशा संकटात सापडले. पण महाराष्ट्रावरच्या प्रत्येक अरिष्टाशी सामना करणाऱ्या मंत्रालयाने जखमी आणि दग्ध अवस्थेत स्वत:ला सावरण्यासाठी कंबर कसली.

मंत्रालयाची रचना व बांधणी अत्यंत सुनियोजित

आणि विचारपूर्वक करण्यात आल्यानेच अग्नितांडव सुरू असताना या मजल्यावर असणाऱ्या असंख्य दालनातील शेकडो कर्मचारी आणि वेगवेगळ्या बैठकांमध्ये असणारे अधिकारी/कर्मचारी वेगाने सुखरूप बाहेर पडू शकले.

दुर्दैवाने काही अधिकारी/कर्मचारी, नागरिक यांना त्वरित हालचाल न करता आल्याने हे अधिकारी/कर्मचारी संयम राखून, धैर्याने दालनातील खिडक्यांना लावलेल्या पाईपवरून सज्जावर आणि नंतर फायर ब्रिगेडच्या लिफ्टने खाली उतरले. मात्र काळपुरुषाने डाव साधून ५ जणांना स्वाहा केल्याचे त्यांना बघावे लागले. डोळ्यांदेखत झालेल्या आपला जीवलग, सखा सहकारी व नातलगांच्या मृत्यूने सर्वांसोबत मंत्रालयाचा वास्तुपुरुषही रडला असेल.

पण, या वास्तूला आक्रोश करत बसण्याचा अधिकार नाही. सेनापतीला धैर्याने रणांगण गाजवायचे असते. भळभळत्या जखमांसह 'मंत्रालय' स्वत:च्याच आपत्ती निवारणात कार्यमग्न झाले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव इतर मंत्रीमहोदय, वरिष्ठ/कनिष्ठ अधिकारी, लहानमोठा कर्मचारी सारे भेद गळून पडले. सारे कामाला लागले. किल्लारी भूकंपाच्या वेळेलासुद्धा असेच सारेजण 'मी अमुक मी तमुक' असे विसरून झपाटल्यागत कामाला लागले आणि तीन दिवसांत आपद्‌ग्रस्त नागरिकांना मूलभूत सोई-सुविधा देण्यात यशस्वी झाले होते. तेच स्पिरीट, तोच उत्साह, तीच संवेदनशील भूमिका मंत्रालयावरील



संकटसमयी दिसून आली.

पुढील तीन दिवस म्हणजेच शुक्रवार, शनिवार आणि रविवार अथकपणे वेगवेगळ्या स्तरांवर मंत्रालयाला झालेल्या जखमा मिटवण्याचे कार्य सुरू होते. शेकडो टन राख, ओला कचरा, जळलेले साहित्य बाहेर काढण्याचे अजस्र कार्य तीन दिवसांत झाले. १३५ ट्रक्स भरेल एवढे हे साहित्य होते. इतर अनेक विभागांच्या कर्मचाऱ्यांसोबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे ४ मुख्य अभियंते, ८ अधीक्षक अभियंते, १० कार्यकारी अभियंते, ४० उपअभियंते



१२५ सहअभियंते आणि १३०० मजुरांनी रात्रीचा दिवस करून आणि आपले सर्व कौशल्य पणाला लावत जळलेल्या कचऱ्याचा ढीग मंत्रालयाच्या बाहेर काढण्यात यश मिळवले. ड्रेनेज लाईन व्यवस्थित करण्यात आली. पाणी पुरवठा, वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला. जळलेल्या भागाची रंगरंगोटी केली गेली.

### मुख्यमंत्र्यांचा निर्धार

सोमवारी पूर्ववत काम सुरू करण्याच्या मुख्यमंत्र्यांचा निर्धार होता. त्याप्रमाणे सोमवार, दिनांक २६ जूनपासून मंत्रालयाचे तीन मजले पुन्हा गजबजले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, इतर मंत्री, मुख्य सचिव यांनी कामाला सुरुवात केली.

मंत्रालय हा महाराष्ट्राचा मानबिंदू असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले, ते खरेच आहे. मंत्रालय म्हणजे केवळ दगड, माती, सिमेंटची वास्तू नव्हे. मंत्रालय हा महाराष्ट्राचा वैभवशाली वारसा होय. महाराष्ट्राला गेल्या पन्नास वर्षात समृद्धी, संपन्नता, विकास, स्थैर्य यात देशस्तरावर प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी घेण्यात आलेले निर्णय, धोरणे, योजना या वास्तूतूनच तयार झाल्या आहेत. प्रशासकीय आणि राजकीय व्यक्तींच्या कर्तृत्वाला फुलवण्याचे, दिशा देण्याचे, निष्ठापूर्वक काम करण्याचे, कोणतेही आव्हान पेलण्याचे सामर्थ्य या वास्तूनेच दिले आहे. गोरगरिबांना, शेतकऱ्यांना, सामान्य जनतेला, महिलांना, वंचित घटकांना सक्षम करण्याच्या विविध ऐतिहासिक घटनांचा मुख्य आधार मंत्रालय राहिले आहे. या आगीत २ ते ३ लाख फाईल्समधील असंख्य कागदे, २ ते ३ हजार संगणक, कपाटे, लाकडांनी आणि प्लायवूडने तयार केलेले पार्टिशन्स, लाकडी खुर्च्या, सोफे, टेबल्स हे जळाले.

मंत्रालयाचे एकूण क्षेत्रफळ ५ लाख १७ हजार चौरस फूट यामध्ये मुख्य इमारत आणि विस्तारित इमारतीचा समावेश होतो. या क्षेत्रफळापैकी मुख्य इमारतीच्या १ लाख ३८ हजार आणि विस्तारित इमारतीच्या १६ हजार ५०० चौरस फुटांच्या क्षेत्रात अग्नितांडव झाले. साधारणत: ३० टक्के क्षेत्राचे नुकसान झाले. पण मूळ वास्तू ही दणकट आणि कोणत्याही संकटांना झेलण्यास सक्षम असल्यानेच मूळ बांधणीचे विशेष नुकसान झाले नाही.

**फाइलींची पुनर्निर्मिती :** ■ या अग्निप्रलयात जळालेल्या फाइलींची पुनर्निर्मिती करता येणे शक्य असल्याचे तंत्रज्ञांनी स्पष्ट केले आहे. या आगीत जळालेल्या संगणकाच्या हार्ड डिस्कवरील डाटा (म्हणजेच विविध प्रकारची माहिती) डाटा मॅग्नेटिक फेरस मायक्रोस्कोप या आधुनिक तंत्राचा वापर करून पुन्हा मिळवता येऊ शकतो. ■ जळालेल्या फाईलींची माहिती ही 'डाक्युमेंट जर्नी मॉनिटरींग



सिस्टिम' (डीजेएमस) प्रणालीमुळे मिळू शकते. या प्रणालीत फाइलींचा विभाग, फाइल पाठवल्याचा दिनांक, कुणाकडे पाठवली याची नोंद, फाइलचा विषय अशा बाबींची नोंद केली असते. ■ बऱ्याच फाइली या वित्त विभागाकडे पाठवण्यात येतात. साधारणत: ९० टक्के फाइलिंचा डाटा वित्त विभागाकडे मिळू शकेल, असे वित्त विभागाचे प्रधान सचिव सुधीर कुमार श्रीवास्तव यांनी सांगितले आहे. ■ एका अंदाजानुसार मंत्रालयात ३० लाखांच्या आसपास फाइल्स असून त्यापैकी दोन लाख २५ हजार फाइलींचे स्कॅनिंग झाले असून ३ कोटी २५ लाख कागद स्कॅन झाले आहेत. ■ बऱ्याच फाइलींचे मूळ कागदपत्रे तालुका, जिल्हा विभाग पातळीपर्यंत सुरक्षित राहू शकतात. ■ जळालेल्या सर्वच फाइल्स या महत्त्वाच्याच असतील असे नाही. मंत्रालयीन कार्यपद्धतीनुसार एखादे निवेदन किंवा पत्र यांची फाइल पुढील कार्यवाहीसाठी तयार केली जाते. ■ काही फाइली या अंतिम टप्प्यापर्यंत पोहचून कागदपत्रांवरील शेऱ्यांनुसार कार्यवाही पूर्ण झालेली असते. ■ मंत्रालयात दररोज प्रत्येक विभागामध्ये असंख्य पत्रे, निवेदने, वृत्तपत्रे, मासिके येत असतात. जळालेल्या कागदपत्रांमध्ये त्यांचाही समावेश आहे. वरील बाबींवरून लक्षात येईल की, काही महत्त्वाच्या फाइल्स अग्नितांडवात भस्म झाल्या असल्या तरी बिनमहत्त्वाच्या फाइल्स आणि कागदपत्रांची संख्या खूप अधिक असू शकते. त्यामुळे मंत्रालय स्तरावरील आपल्या कामांचे काय होणार याबाबत नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. ■ प्रत्येक जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयात 'विशेष सेल'ची निर्मिती करण्यात आली आहे. या ठिकाणी नागरिक स्वत:च्या एखाद्या प्रकरणाशी संबंधित अर्ज, कागदपत्रे, पोचपावती, निवेदने/जोडपत्रे देऊ शकतात. अशा प्रकारे कागदपत्रे पुन्हा एकत्र करून मंत्रालयातील फाइलींच्या पुनर्निर्मितीसाठी त्याचा उपयोग केला जाणार आहे. ■ राज्यातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांची मंत्रालयात प्रलंबित असलेली प्रकरणे पुन्हा १५ दिवसांत मंत्रालयात पाठवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अशा प्रलंबित प्रकरणांची कागदपत्रे मंत्रालयात पाठवली जातील. साधारणत: १ महिन्याच्या कालावधीत जळालेल्या फाइल्सची पुनर्बांधणी वा पुनर्निर्मिती करण्यात येणार आहे. ■ नष्ट झालेल्या अभिलेखांच्या (कागदपत्रे) पुनर्निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ■ मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील १५ हजार कागदपत्रे सुरक्षित असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. यामध्ये आमदार, खासदार, इतर महत्त्वाच्या व्यक्तींना लिहिलेली पत्रे, निवेदने, मुख्यमंत्री कार्यालयाने केलेली कार्यवाही अशी कागदपत्रे आहेत. इंदू मिल, कांदा प्रश्न, कापूस प्रश्न अशा मुद्यांवर मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांना लिहिलेली पत्रे, मंत्री मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त, आमदार, खासदारांच्या बैठकांचे इतिवृत्त, कृती अहवाल यासारखीही कागदपत्रे आहेत. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानातील कार्यालयात असणाऱ्या फाइल्स, सह्याद्री अतिथीगृहातील कार्यालयात असलेल्या फाइल्स सुरक्षित आहेत. अशा प्रकारे विविध पातळींवर फाइली सुरक्षित असल्याचे स्पष्ट होते.

**– टीम लोकराज्य**

# गुरुवार ते सोमवार



**गुरुवार, दिनांक २१ जूनला दुपारी २.४० च्या आग लागल्यानंतर सोमवार, दिनांक २५ जूनच्या सकाळपर्यंतचे १०८ ते ११० तास हे राज्याच्या प्रशासनासाठी अत्यंत काळजीचे, चिंतेचे जसे होते त्याचबरोबर एकदिलाने संकटाशी झुंजण्याचे, उत्कृष्ट नियोजनाचे, संवेदनशीलतेने झालेल्या परिस्थितीशी झुंजण्याचे आणि संकटावर मात करून महाराष्ट्राचा मानबिंदू असलेल्या मंत्रालयात कामकाज सुरू करण्याचे, शिवधनुष्य पेलण्याच्या समाधानाचे होते. या ११० तासांचा घटनाक्रम असा होता...**

- गुरुवार दि. २१ रोजी दुपारी २.४० च्या सुमारास चौथ्या मजल्यावर आग
- ही आग पाचव्या, सहाव्या आणि सातव्या मजल्यापर्यंत पसरली.
- उपमुख्यमंत्री व इतर मंत्री त्यांच्या दालनातून मंत्रालयाच्या आवारात
- मुख्यमंत्री मंत्रालय परिसरात आले. सर्व यंत्रणांना सूचना
- इतर अधिकारी, कर्मचारी तसेच मंत्रालयात आलेले नागरिक मंत्रालयाच्या बाहेर
- अग्निशमन दलामार्फत कार्यवाही सुरु
- उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात अडकलेल्या व इतरत्र अडकलेल्या व्यक्तींची सुटका
- जखमींना तातडीने विविध रुग्णालयात हलवण्यात आले.
- नवीन प्रशासकीय इमारतीत विशेष नियंत्रण व आपत्ती कक्षाची स्थापना
- या आपत्ती निवारण कक्षाची सूत्रे मुख्य सचिवांनी ताब्यात घेतली.
- संध्याकाळी ६ च्या सुमारास पत्रकार परिषद घेण्यात येऊन घटनेविषयी माध्यमांना माहिती देण्यात आली.
- आगीवर नियंत्रणाचे काम युद्धस्तरावर वेगाने सुरू, मुख्य सचिव, इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आपत्ती निवारण कक्षातच वास्तव्य
- शुक्रवारी सकाळी सव्वासहा वाजता मुख्य सचिवांनी संनियंत्रणासाठी बैठक घेतली. पुढील कार्यवाहीचे नियोजन केले.
- साडेसहानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडून मंत्रालयाची पाहणी, अधिकाऱ्यांसोबत बैठक
- काही मृतदेह मिळाले.
- शुक्रवारी आगीत जळालेला कचरा काढून विल्हेवाट लावण्याचे कार्य गतिमानतेने सुरु झाले.
- शनिवार-रविवारी कचरा विल्हेवाट, पाण्याचा निचरा, विद्युत पुरवठा पूर्ववत करणे आदी बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले.
- सोमवार पासून मंत्रालय पूर्ववत सुरु करण्याचा निर्धार मुख्यमंत्र्यांनी केला.
- या निर्धाराला वास्तव रुप देण्यासाठी चौथा ते सातव्या मजल्यावरील विविध १९ विभागांसाठी मंत्रालयाच्या आसपास व इतरत्र पर्यायी जागा शोधण्यात येऊन त्या ताब्यात घेण्यात आल्या.
- सोमवारी सकाळी साडेदहा वाजता मुख्यमंत्र्यांनी सर्व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, नव्या जोमाने संकटावर मात करुन मंत्रालयाचे कामकाज पूर्ववत सुरु करण्याचे आवाहन केले.
- विधान भवनात मुख्यमंत्र्यांचे कार्यालय सुरु करण्यात आले.
- मंत्रालयातील पहिल्या माळ्यावर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची कार्यालये सुरु करण्यात आली.
- मंत्रालयातील दुरुस्तीच्या कामकाजात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून नागरिकांना मंत्रालयात येण्यास तात्पुरती बंदी घालण्यात आली. मात्र त्यांची निवेदने स्वीकारण्यासाठी मंत्रालयाच्या परिसरात असणाऱ्या जनता जनार्दन कक्षात विविध विभागाची कागदपत्रे स्वीकारण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली.
- या आगीत मृत्युमुखी पडलेल्या ५ व्यक्तींच्या नातेवाईकांना प्रत्येकी २५ लाख रुपयांचे आर्थिक साह्य देण्याचा निर्णय घेण्यात आला.
- मंत्रालयाच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे आदेश देण्यात आले.
- मंत्रालय व राज्यातील इतर महत्त्वाच्या शासकीय इमारतींच्या फायर ऑडिटचे आदेश देण्यात येऊन अग्निशमन यंत्रणा सक्षम आणि प्रभावी करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- सोमवारी मंत्रालयाच्या मुख्य इमारतीतील तीनही मजल्यांवरचे आणि विस्तारित इमारतीतील सर्व मजल्यांवरचे काम आणि इतर ठिकाणी हलविलेल्या विभागांचे काम पुन्हा सळसळत्या उत्साहाने, जोमाने, सुरु झाले. 'स्पिरीट ऑफ मंत्रालय' कौतुकास्पद असल्याची जाणीव पुन्हा एकदा सर्व जगाला झाली.

- टीम लोकराज्य

# अग्निपरीक्षा...














MUMBAI FIRE BRIGADE
BRONTO SKYLIFT F42 HDT 2000
MH-01
H1800





















२१ जून रोजी मंत्रालयाला लागलेल्या आगीत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सहायक संचालक श्री. हेमंत खैरे हे जखमी झाले. त्यांना तातडीने जे. जे. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात हलविण्यात आले. प्रारंभी गंभीर असलेली त्यांची प्रकृती आता वेगाने सुधारत आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य राज्यमंत्री, मुख्य सचिव आदी मान्यवरांनी रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

जे. जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने यांच्या नेतृत्वाखाली डॉ. प्रिया पाटील, डॉ. मुस्तफा, डॉ. तेजस, डॉ. स्वालेहा, श्री. एच. एच. जाधव यांची टीम श्री. खैरे यांच्यावर उपचार करीत आहे.

# वीर दौडले सात

२१ जून रोजी दुपारी २.४० च्या सुमारास मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावर लागलेली आग हळूहळू वरच्या मजल्यावर पसरत होती. मंत्रालय मुख्य इमारतीच्या वर अगदी मधोमध तिरंगा झेंडा डौलाने फडकत असतो. आगीच्या ज्वाळा तिरंग्याला वेढणार तर नाहीत ना अशी शंका येऊ लागली. पण, या संकटकाळी सात वीर धावून आले. आगीच्या ज्वाळांची पर्वा न करता हे सात जण झेंड्याजवळच पाय रोवून उभे राहिले. त्यावेळचे चित्र अंगावर शहारे आणणारे होते. धुराचे लोट सर्वत्र भरून राहिले होते. अनेकदा झेंड्याजवळ उभे असलेले कर्मचारी दिसतही नव्हते. पुढे आग आणखीनच वाढत गेली. आगीचे लोट तिरंग्याच्या दिशेने जात होते. अखेर तिरंगा उतरविण्याचे आदेश मिळाले आणि सन्मानाने तिरंगा झेंडा उतरविला गेला. पण, हे सात जण इमारतीवरच राहिले. त्यांच्या जीवाची सर्वांना काळजी वाटू लागली. पण, अग्निशमन दल या धाडसी लोकांच्या मदतीला धावून आले. शिडी लावून त्यांना सुखरूपपणे खाली उतरविण्यात आले. राजेंद्र कानडे, पंडित केंदळे, सुरेंद्र जाधव, गणेश मुंज, दीपक अडसुळ, सुरेश बारिया आणि विशाल राणे हेच ते सात निडर कर्मचारी होत. त्यांच्या कर्तव्यदक्ष वृत्तीला आणि तिरंग्यावरील प्रेमाला सलाम!

++




# श्रद्धांजली



तुकाराम मोरे



मोहन मोरे



उमेश पोतेकर



महेश गुगळे



शिवाजी कोरडे




# शिका आणि सक्षम व्हा!

**समाजातील विविध घटकांना शिक्षणाच्या संधी मिळाव्यात यासाठी राज्याच्या सामाजिक न्याय विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांवर एक संक्षिप्त दृष्टिक्षेप..**

## मुला- मुलींसाठी शासकीय वसतिगृहे

मागासवर्गीय मुला-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. सध्या महाराष्ट्रात विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर २७१ मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे कार्यान्वित असून, वसतिगृहांमध्ये २१८०० विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत.

निवास व भोजन, अंथरूण-पांघरूण, शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश, क्रमिक पाठ्यपुस्तके, वह्या, स्टेशनरी इत्यादी; वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ड्रॉईंग बोर्ड, बॉयलर सूट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्राईंग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इत्यादी; वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी निर्वाहभत्ता देण्यात येतो.

गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो, विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांचे, वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे, इयत्ता ८ वी व त्यापुढे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येईल, अर्ज करावयाची मुदत शालेय विद्यार्थ्यांसाठी १५ मेपूर्वी; महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ३० जूनपर्यंत किंवा निकाल लागल्यापासून १५ दिवसांच्या आत.

निर्वाह भत्ता: विभागीय पातळीवर - दरमहा २०० रुपये, जिल्हा पातळीवर- दरमहा ७५ रुपये, तालुका पातळीवर - दरमहा ५० रुपये.

संदर्भ-(शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग- क्रमांक : बी.सी.एच.- १८२/ ९०३८५/ (३८)/ बी.सी.डब्ल्यू.-४ दि. १६ मे १९८४)

### मागासवर्गीय मुला- मुलींकरिता शासकीय वसतिगृहे

बहुतांश विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या प्रवेशापासून वंचित राहावे लागते ही अडचण विचारात घेऊन १००० क्षमतेची विभागीय स्तरावर, प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ७ वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय सन २००७ मध्ये घेण्यात आला. याशिवाय १०० क्षमतेची राज्यातील प्रत्येक तालुका स्तरावर म्हणजे ३५३ वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, त्यापैकी प्रथम टप्प्यात १०० शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय.

**- संदर्भ: (शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग- क्रमांक : बी.सी.एच.- २००७/ प्र. क्र.३०/ मावक-४ दि. १० फेब्रुवारी २००७ व शासन निर्णय क्रमांक : बी.सी.एच.- २००५ /प्र.क्र.५५४/मावक-४ दि.२८ जून २००७)**

### १०० शासकीय निवासी शाळा

प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यापैकी प्रथम टप्प्यात १०० तालुक्यांत इमारत बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे.




* निवासी शाळेमध्ये इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींना प्रवेश दिला जाईल.

* निवासी शाळेत मोफत भोजन, निवास व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

संदर्भ-(शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग- क्रमांक : बी.सी.एच.-२००२ / प्र.क्र. २६८/ मावक-४. दि. ४ जुलै २००३.)

### व्यावसायिक पाठ्यक्रम- निर्वाह भत्ता

वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमांतील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेंतर्गत वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना २३५ ते ७४० रुपये निर्वाह भत्ता दिला जातो. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयाच्या वसतिगृहात, शासकीय वसतिगृहात व इतर वसतिगृहात राहतात अशा विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीच्या व्यतिरिक्त या योजनेंतर्गत निर्वाह भत्ता देण्यात येतो.



**व्यावसायिक पाठ्यक्रम–विद्यावेतन**

चार ते पाच वर्षांचे अभ्यासक्रम वैद्यकीय/ अभियांत्रिकी/ पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र इत्यादी– ७४० रुपये– १० महिने; दोन ते तीन वर्षांचे अभ्यासक्रम अभियांत्रिकी पदविका, एम.बी.ए., एम.एस.डब्ल्यू. इत्यादी– ६०० रुपये– १० महिने; दोन वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम बी.एड., डी.एड. इत्यादी– ५०० रुपये–१० महिने.

बाहेर राहणाऱ्या परंतु वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र असणाऱ्या अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना विद्यावेतन.

चार ते पाच वर्षांचे अभ्यासक्रम वैद्यकीय/ अभियांत्रिकी/ पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र इत्यादी– १००० रुपये– १० महिने; दोन ते तीन वर्षांचे अभ्यासक्रम अभियांत्रिकी पदविका, एम.बी.ए, एम.एस.डब्ल्यू. इत्यादी– ७०० रुपये– १० महिने; दोन वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम बी.एड, डी.एड. इत्यादी– ५०० रुपये– १० महिने.

संदर्भ– (शासन निर्णय क्रमांक : सामाजिक न्याय विभाग, बीसीएच–१०८१/२९२८०/४५० दि. १७ नोव्हेंबर १९८३)

**भारत सरकार शिष्यवृत्ती**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/ उच्च शिक्षण घेता यावे, विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे.

## शिक्षण व परीक्षा शुल्क

शालान्त परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर विहीत केलेले शुल्क देण्यात येते.

संपर्क : संबंधित जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य. संदर्भ- (शासन निर्णय क्रमांक : ईबीसी-१९६८/८३५६७/ ए, दि.२४ डिसेंबर १९७०)

विद्यार्थी हा अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असावे, विद्यार्थी शालान्त परी–क्षोत्तर व त्या पुढील शिक्षण घेत असलेला असावा, विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विद्यार्थ्यास निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्क, दरमहा १४० रुपये ते ३३० रुपये या दराने निर्वाह भत्ता, वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा २३५ रुपये ते ७४० रुपये निर्वाह भत्ता.

**संपर्क :** संबंधित जिल्ह्याचे, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य.

संदर्भ– (शासन निर्णय क्रमांक : ईबीसी–१०९५/ प्र.क्र.६३/ मावक–२ दि. १० नोव्हेंबर १९९६ शासननिर्णय क्रमांक : ईबीसी–२००४/प्र.क्र.३०/मावक–२ दि. ०५ जानेवारी २००५.)

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती**

अनुसूचित जातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. यासाठी इयत्ता १० वीमध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला–मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे.

इयत्ता, शिष्यवृत्ती दर, कालावधी, रुपये पुढील प्रमाणे :

इयत्ता ११वी – ३०० रुपये दरमहा – १० महिने – ३००० रुपये, १२ वी – ३०० रुपये दरमहा – १० महिने.

संपर्क : संबंधित जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य.

संदर्भ– (शासन निर्णय क्रमांक : ईबीसी–२००३/ प्र.क्र–११५/मावक–२ दि. ११ जून २००३ )

**पुस्तकपेढी योजना**

वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय, सी.ए., एम.बी.ए. व विधी अभ्यासक्रमाची पुस्तके महाग असल्याने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना पुस्तके घेण्यामध्ये आर्थिक अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून सन १९७८–७९ पासून ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय, सी.ए., एम.बी.ए. व विधी अभ्यासक्रमात शिकत असणारा असावा, भारत सरकार शिष्यवृत्तीधारक असावा.

या अभ्यासक्रमांसाठी २ विद्यार्थ्यांमागे १ संच या प्रमाणे महाविद्यालयांना खालील प्रमाणे अनुदान देण्यात येते.

वैद्यकीय व अभियांत्रिकी ७,५०० रुपये, कृषी ४,५०० रुपये, पशुवैद्यकीय ५,००० रुपये, तंत्रनिकेतन २,४०० रुपये, सी.ए., एम.बी.ए. आणि

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वीमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने अनुक्रमे सन १९९६ व २००३ पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे.

उत्पन्न व गुणांची अट नाही, अर्ज करण्याची आवश्यकता नाही, वर्षातून तीन वेळा म्हणजे २६ जून, २२ सप्टेंबर आणि ३ जानेवारी या तारखांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

शिष्यवृत्तीचे स्वरूप- इयत्ता ५ वी ते ७ वी - ६० रुपये दरमहा- १० महिन्यांसाठी, इयत्ता ८ वी ते १० वी - १०० रुपये दरमहा - १० महिने

संपर्क: संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

संदर्भ- (शासन निर्णय: ईबीसी १०९४/ ३२०३८/ प्र.क्र. ९० मावक-२ दि. १२ जानेवारी १९९६. शासन निर्णय : सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा वि. स. विभाग ईबीसी-२००३/ प्र.क्र.११६/ मावक-२. दि. २३ मे २००३. शासन निर्णय : सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग- क्रमांक : इमाव-२००३/ प्र.क्र.-२०१/ मावक-३ दि. २५ जुलै २००३.)




# परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती



अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी म्हणून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे, अशा ५० विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा, विद्यार्थ्याचे वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे, विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे, पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ५० टक्के गुण व प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण असावा. त्याने परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा, परदेशातील विद्यापीठ हे मान्यताप्राप्त विद्यापीठ असावे.

विद्यापीठाने प्रमाणित केलेला शिक्षणाचा खर्च व इतर खर्च मंजूर करण्यात येतो, विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी यू.एस. डॉलर १४,००० तर यू.के.साठी पौंड ९,००० इतका अदा करण्यात येतो, विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी यू.एस.ए. व इतर देशांसाठी यू.एस.डी. १३७५ तर यू.के.साठी पौंड १,००० इतके देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे, विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो. संपर्क : जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात येतात, संचालक, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे १.

विधी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे १ संच ५,००० रुपये.

संपर्क : संबंधित जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य.

### सैनिक शाळेसाठी

विद्यार्थी ५ वी ते १० वीपर्यंतच्या वर्गात शिकत असलेला असावा, विद्यार्थी मागासवर्गीय अथवा अनुसूचित जाती या प्रवर्गातील असावा, पालकाचे वार्षिक उत्पन्न ६५२९० रुपयांपेक्षा जास्त नसावे.

नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांची शिक्षण फी, परीक्षा फी, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, पॉकेट मनी इत्यादींवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतीपूर्ती करण्यात येते. इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रति विद्यार्थी प्रतिवर्षी १५,००० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते.

संपर्क : संबंधित जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, संबंधित सैनिक शाळेचे प्राचार्य.

### पब्लिक स्कूल

सफाईकाम करणाऱ्या / अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या व्यक्तींच्या मुलांसाठी पुणे येथे सन १९८५ व नागपूर येथे १९९६ पासून पब्लिक स्कूल सुरू करण्यात आलेली आहेत. इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंत शिक्षण दिले जाते, पब्लिक स्कूलमध्ये सध्या ३७५ विद्यार्थी लाभ घेत आहेत.

संपर्क : संबंधित पब्लिक स्कूलचे प्राचार्य.

### मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिक्षण घेता यावे. यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

जातीची अट नाही, अनुसूचित जातीव्यतिरिक्त इतर लाभधारकांचे पालक अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याचे, सरपंच अथवा नगरसेवकांचे प्रमाणपत्र आवश्यक, उत्पन्नाची अट नाही.

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना- इयत्ता ३ री ते १० वीपर्यंत विद्यार्थ्यांना दरमहा ७०० रुपये (१० महिन्यांकरिता) आणि १००० रुपये तदर्थ वार्षिक अनुदान.

वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी- इयत्ता १ ली ते १० वीपर्यंत दरमहा ११० रुपये (१० महिन्यांकरिता) आणि ७५० रुपये तदर्थ वार्षिक अनुदान.

संपर्क : संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, संबंधित शाळेचे मुख्याध्यापक.

### देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती


एकविसाव्या शतकामध्ये यशस्वी होण्यास अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध व्हावे व त्यांची स्पर्धात्मक युगामध्ये जडणघडण व्हावी याकरिता देशातील उत्तमोत्तम शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थी अनुसूचित जाती/ नवबौद्ध व महाराष्ट्राचा रहिवासी असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांचे सर्व मार्गांनी वार्षिक उत्पन्न रु ४.५० लाखापर्यंत असावे, या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संस्थेत प्रवेशित असावा. संस्थेचे आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क, क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी रु. १०,०००.

संपर्क : संबंधित जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य.

(योजनांच्या माहितीचा स्रोत- सामाजिक न्याय विभागाची वाटचाल पुस्तिका.)

**(संकलन- अजय जाधव)**

**संपर्क : ९७०२९७३९४६**



# आमचं शिक्षण आमचं सामर्थ्य

मुक्ता पवार

आदिवासी समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये हीच राज्य शासनाची भूमिका आहे. आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी सामाजिक, आर्थिक, त्याचप्रमाणे शैक्षणिक योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.

सन १९७२-७३ पासून निवासी आश्रमशाळा समूह योजना राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार अनुसूचित जमाती क्षेत्रात ५००० ते ७००० लोकसंख्येच्या क्षेत्रात एक आश्रमशाळा तर अतिदुर्गम भागात पाड्यापाड्यांमध्ये आदिवासींची लोकवस्ती ही विखुरलेली असल्याने अशा ठिकाणी ३००० ते ५००० लोकसंख्या असलेल्या क्षेत्रात एक आश्रमशाळा हा निकष ठरविण्यात आला आहे.

आजामितीला शासकीय आश्रमशाळांमधून एकूण २,१०,२४४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये १,१०,९२२ मुले आणि ९९,३२२ मुलींचा समावेश आहे. आश्रमशाळेतील प्रत्येक वर्गात ४० निवासी व १० अनिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळांपैकी १४४ शासकीय आश्रमशाळांची केंद्र आश्रमशाळा म्हणून निवड करण्यात आली आहे.

ज्या शासकीय आश्रमशाळा इ. १० वीपर्यंत आहेत त्या शाळांपैकी एकूण १२६ ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत.

सर्व आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच भोजन, निवास, अंथरूण, पांघरूण, गणवेश, वह्या, पुस्तके, शालेय साहित्य आणि अन्य वस्तू व सुविधा मोफत पुरविण्यात येतात. अनिवासी विद्यार्थ्यांनाही निवास व्यवस्था सोडून सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य, गणवेश, एका वेळेचे जेवण देण्यात येते. विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य व वाचनालय, पुस्तके तसेच करमणुकीची साधने (टी.व्ही., व्ही.सी.आर.) देण्यात येतात.

राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात केंद्र शासनाने ९ निवासी शाळा राज्याला देण्याचे ठरविले आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ठाणे जिल्ह्यात कांबळगांव, नाशिक जिल्ह्यात पेठ रोड, अमरावती येथे चिखलदरा आणि नागपूर येथे खैरीपरसोडा या चार प्रादेशिक कार्य क्षेत्रात प्रत्येकी एक प्रमाणे ४ एकलव्य रेसिडेन्शियल पब्लिक स्कूल सुरू आहेत. केंद्र शासनाच्या धोरणानुसार सदर एकलव्य रेसिडेन्शियल पब्लिक स्कूलमध्ये (सी.बी.एस.ई. पॅटर्न) इयत्ता ६ वी ते १२ वीचे वर्ग सुरू आहेत.

या एकलव्य रेसिडेन्शियल पब्लिक स्कूलमध्ये आश्रमशाळेत राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. यासाठी फेब्रुवारी - मार्चमध्ये स्पर्धा परीक्षा त्या त्या जिल्ह्यातील आदिवासी प्रकल्प क्षेत्रात घेण्यात येते. शासकीय, अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा इत्यादी शाळांमधून इयत्ता ५ वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, अंथरूण, पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात.



**शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचे महत्त्व लक्षात घेऊन ५५२ शासकीय आश्रमशाळांपैकी २६ आश्रमशाळांचे कन्या शाळेत रूपांतर करण्यात आले आहे. या सर्व आश्रमशाळा माध्यमिक स्वरूपाच्या आहेत. पब्लिक स्कूलच्या धर्तीवर जिल्ह्याच्या ठिकाणी नाशिक विभागात दोन; ठाणे, अमरावती, नागपूर येथे प्रत्येकी एक इंग्रजी माध्यमाची शासकीय आश्रमशाळा सुरू करण्यात आली आहे.**

## सेवा व्यवस्थापन...

**अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना जागतिक स्पर्धेत आत्मविश्वासाने वावरता यावे यासाठी आदिवासी विकास विभागातर्फे गेल्या वर्षीपासून हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम राबविण्यात येतो. या अभ्यासक्रमात अतिथ्यशीलता, व्यक्तिमत्त्व विकास, संभाषण कौशल्य, इंग्रजी संभाषण यासारख्या अनेक बाबी शिकविल्या जातात. या अभ्यासक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शंभर मुलींपैकी ३७ मुलींना नोकरी मिळाली. या अभ्यासक्रमासाठी दिले जाणारे शैक्षणिक अनुदान आता ८० हजारांवरून दीड लाख रुपये करण्यात आले आहे.**




# विद्यार्थ्यांच्या हितासाठी....

- आदिवासी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ
- आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अपघाती निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना ७५,००० रु. सानुग्रह अनुदान
- विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात दरमहा १०० रु. वाढ
- आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिकचा वापर
- विभागीय, जिल्हा आणि तालुका स्तरावर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांच्या दरात वाढ
- आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता
- शालान्त व उच्च माध्यमिक परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना
- भारत सरकार शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना
- वैद्यकीय शिक्षण व संलग्न शिक्षणाकरिता खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना
- इयत्ता ८ वी ते १२ वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्ती व वाहतूक भत्ता योजना
- सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना




**अनुसूचित जमातीच्या २५०० विद्यार्थ्यांना दरवर्षी जवळच्या शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा दोन लाख रुपये आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांची स्वतंत्र तुकडी न करता त्यांना इतर मुलांसोबत एकत्रित शिक्षण दिले जाते. त्यानुसार गेल्या वर्षी अडीच हजार आदिवासी विद्यार्थ्यांना नामवंत शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देण्यात आला असून, या वर्षीदेखील अडीच हजार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यावर दरवर्षी ५० हजार रु. खर्च करण्यात येतो.**

## सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण



अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील युवकांना सैन्य व पोलीस भरतीची संधी उपलब्ध करून देण्याकरिता ही योजना सुरू करण्यात आली आहे.
योजनेंतर्गत पात्र उमेदवारांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते.
उमेदवार महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जाती/नवबौद्ध घटकातील, १८ ते २५ वर्षे या वयोगटातील असावा, उमेदवाराची उंची, छाती इत्यादी सैन्य व पोलीस भरतीसाठी विहित केलेली शारीरिक पात्रता असावी, इयत्ता १२ वी पास असावा, शारीरिकदृष्ट्या निरोगी असावा, प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिन्यांचा राहील.
संपर्क : संबंधित जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी.
संदर्भ-(शासन निर्णय क्रमांक : ईबीसी-२००५/प्र.क्र.७८/मावक-२/दि. ८ फेब्रुवारी २००६)

संपर्क : ९८१९१९१४२३



# मुख्य प्रवाहात अल्पसंख्याक



**अल्पसंख्याक विकास मंत्री मोहम्मद आरिफ (नसीम) खान यांची मुलाखत**

राज्यामध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी आणि जैन या धार्मिक समुदायांना अल्पसंख्याक म्हणून घोषित करण्यात आले असून अल्पसंख्याकांचे शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी या विभागामार्फत विविध शैक्षणिक योजनांवर भर दिला जात आहे.

मूलभूत सुविधांसाठी अल्पसंख्याक शाळेला २ लाख रुपये पुरविण्याची योजना राबविली जात असून या योजनेत २०११-१२ मध्ये २ हजार १११ शाळांना ४२ कोटी २२ लाख रुपयांचा निधी पुरविण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेली शिष्यवृत्ती योजना यशस्वी ठरली असून आतापर्यंत राज्यातील साधारण १४ लाख १७ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात आला आहे. पहिली ते दहावीच्या सुमारे १२ लाख ५७ हजार ४०५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. ११ वी आणि १२ वीच्या साधारण १ लाख २८ हजार ७६ विद्यार्थ्यांना आतापर्यंत शिष्यवृत्ती देण्यात आली असून पुढील शैक्षणिक वर्षात या वर्गातील साधारण ५० हजार अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच बीए, बीएस्सी, बी. कॉम, मेडिकल इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर, एमबीए, एमसीए, लॉ इत्यादी उच्च शिक्षण घेणाऱ्या साधारण २७ हजार ५०० विद्यार्थ्यांना आतापर्यंत शिष्यवृत्ती देण्यात आली असून पुढील वर्षात नव्या ५ हजार अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.

राज्यातील शासनमान्य प्राथमिक शाळांमधील १ ली ते ४ थी मधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे शाळा गळतीचे प्रमाण कमी करून त्यांची शाळेतील उपस्थिती वाढविण्याच्या उद्देशाने मोफत गणवेश योजना राबविण्यात येत आहे. मागील तीन वर्षात साधारण १३ लाख विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावर ५०.७० कोटी रुपये खर्च झाला.

पाचवी ते सातवीपर्यंतच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण रोखून त्यांना शिक्षण घेण्यास प्रेरित करण्याच्या उद्देशाने या विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता देण्यात येतो. मागील तीन वर्षांत साधारण १५ लाख विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्त्याचे वाटप करण्यात आले. त्यावर साधारण ५३.०५ कोटी रुपये खर्च झाला आहे.

अल्पसंख्याक समाजामधील तरुणांना रोजगारक्षम बनविणे आणि त्यांना नियमित उत्पन्नाचा स्रोत निर्माण व्हावा यासाठी सर्व जिल्ह्यांमधील ४३ आयटीआय आणि जळगाव, नांदेड, सोलापूर, यवतमाळ, मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या ७ ठिकाणच्या पॉलिटेक्निकमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या पाळीमध्ये विशेष वर्ग सुरू करण्यात आले आहेत. यंदाच्या वर्षी या योजनेत आणखी ७ नव्या पॉलिटेक्निकचा समावेश करण्यात आला आहे.

अल्पसंख्याक मुलींसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृहे सुरू करण्याची योजना अल्पसंख्याक विकास विभागाने आखली आहे. या वसतिगृहांमध्ये ७० टक्के अल्पसंख्याक मुलींना तर ३० टक्के इतर प्रवर्गातील मुलींना प्रवेश देण्यात येणार आहे.

अल्पसंख्याकांचे पोलीस दलामध्ये प्रमाण वाढावे यासाठी शासनाने अल्पसंख्याक उमेदवारांकरिता पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षा प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये निवडलेल्या उमेदवारांना दोन महिन्यांचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणादरम्यान उमेदवारास १५०० रुपये दरमहा विद्यावेतन आणि एक हजार रुपये किमतीचे गणवेश ( ट्रॅकसूट, शूज, सॉक्स इ. दिले जाते. या योजनेंतर्गत आतापर्यंत १० हजारपेक्षा जास्त उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

चालू आर्थिक वर्षातही राज्य शासनामार्फत अल्पसंख्याकांसाठी विकासाच्या अनेक योजना राबविल्या जात आहेत. अल्पसंख्याक शाळांना राज्य शासनामार्फत मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून अल्पसंख्याकाच्या शिक्षणविषयक योजनांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही.



## लाभ कसा मिळवाल?

- **हेल्पलाईनशी संपर्क**

अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयामध्ये हेल्पलाईन सुरू करण्यात आली असून त्याचा टोल फ्री क्रमांक १८०० २२ ५७८६ आहे. अल्पसंख्याक विद्यार्थी या क्रमांकावर दूरध्वनी करून विविध शैक्षणिक योजनांविषयी माहिती मिळवू शकतील.

- **मुख्याध्यापकांमार्फत गणवेश वाटप**- इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मोफत गणवेश तर पाचवी ते सातवीपर्यंतच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता देण्यात येतो. या दोन्ही योजनांचा लाभ शाळास्तरावर मुख्याध्यापकांमार्फत

दिला जातो. यासाठी मुलांना इतरत्र कुठेही अर्ज करण्याची गरज नाही.

■ **शिष्यवृत्ती योजना** – कला, वाणिज्य, विज्ञान, वैद्यकीय, तांत्रिक तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. यासाठी ऑनलाईन अर्ज करून नंतर प्राचार्यांमार्फत अर्जाची पडताळणी करून तो शासनाकडे सादर करावा लागतो. ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांची मेरीट लिस्ट तयार करून त्यांना गुणानुक्रमे शिष्यवृत्ती दिली जाते. याबाबत १४ ऑक्टोबर २०११ रोजी जारी करण्यात आलेला व सविस्तर माहिती देणारा शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आहे.

■ **शैक्षणिक कर्ज योजना**– मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ३ लाख रुपयांपर्यंत फक्त ३ टक्के व्याजदराने कर्ज दिले जाते. यासाठी जिल्हास्तरावर महामंडळाची कार्यालये कार्यान्वित करण्यात आली असून तिथे विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा. प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र, जामिनदाराचा दाखला, शैक्षणिक खर्चाचे अंदाजपत्रक आदी अत्यल्प कागदपत्रे सादर करावी लागतात.

■ **अल्पसंख्याक शाळांसाठी २ लाख रुपये** – अल्पसंख्याक शाळांमध्ये पायाभूत सुविधा (पिण्याचे पाणी, शौचालय, संगणक कक्ष इत्यादी) उभारण्यासाठी शासनामार्फत २ लाख रुपयांचा निधी दिला जातो. यासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेत हव्या असलेल्या सुविधेचे अंदाजपत्रक तयार करून त्याची स्थानिक शिक्षण निरीक्षकाकडून पडताळणी करून घ्यावी. नंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत हा प्रस्ताव शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करावा.

**शब्दांकन : इर्शाद बागवान**
**संपर्क : ९७६८३८५७८८**

# सामान्य लोकांची सेवा करायची आहे



१२ वीत विदर्भात पहिली आलेली स्नेहल कोसे

**रवी गीते**

'यश संपादन करण्यासाठी शिकवणी वर्गाचा फायदा होतोच असे नाही. ४ ते ५ तास नियोजनपूर्ण अभ्यास केल्यास अपेक्षित यश मिळविणे कठीण नाही आणि मी तेच केले. त्यामुळे बारावीच्या परीक्षेत विदर्भात प्रथम येण्याचा मान मिळाला. आता मला डॉक्टर होऊन सामान्य माणसाची सेवा करायची आहे,' अशी इच्छा १२वीच्या परीक्षेत विदर्भातून पहिली व राज्यात मुलींमधून तिसरी आलेल्या स्नेहल कोसे या विद्यार्थिनीने व्यक्त केली. ती लोकराज्यच्या विशेषांकासाठी मुलाखत देताना बोलत होती.

स्नेहल कोसे हिच्या घरचे वातावरण शैक्षणिक असले तरी ब्रह्मपुरी (जिल्हा चंद्रपूर)सारख्या ग्रामीण भागात राहून तिने १२ वीच्या परीक्षेत ९८.६० टक्के गुण प्राप्त केले हे महत्त्वाचे आहे. नेवजाबाई हितकारणी महाविद्यालयाची विद्यार्थिनी असलेल्या स्नेहलचे वडील शिक्षक असून आई गृहिणी आहे.

**स्नेहल म्हणाली,** 'महाविद्यालयामध्ये शिकवलेल्या अभ्यासाचे पूर्ण वाचन करीत असे. दररोज ४-५ तास नियमित अभ्यास करून शिकवणीला जात तसे. त्यामुळे या शिखरापर्यंत मी पोहचू शकले. अभ्यासाचे नियोजन अतिशय महत्त्वाचे असून सराव असावाच लागतो.

माझ्या भावाचे नेहमी प्रोत्साहन मिळत होते आणि वेळोवेळी त्याने मला अभ्यासाबाबत मार्गदर्शन केले. काही प्रश्न सोडविण्यात मदत केली आहे. त्याचप्रमाणे वडिलांनी अभ्यासासंबंधी वेळोवेळी मार्गदर्शन केले. आईने घरी फक्त अभ्यासाव्यतिरिक्त कोणतेही काम करायचे नाही असे सांगितले. काही अडचण भासल्यास मला सांग परंतु अभ्यासाकडेच लक्ष दे अशी ती म्हणायची.


यश संपादन करण्यासाठी शिकवणीची काही गरज वाटत नाही. शिकवणीमुळे वेळ वाया जातो. नियमित चार-पाच तास अभ्यास केला तरी या यशापर्यंत पोहचू शकतो असे मला वाटते.

महाविद्यालयातील अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर दररोज एक विषयाच्या युनीटेस्टची सिरिज लावण्यात आली होती. त्यामुळे दररोज प्रश्नाचा सराव होऊन नवीन नवीन प्रश्न समोर येऊन ते सोडवून घेण्यात येत होते. काही प्रश्न अवघड वाटल्यास त्याचवेळी त्याचे निराकरण करून घेण्यात येत होते. त्यामुळे या युनीटेस्टचा फायदा झाला.

बॉयोलॉजी विषय जास्त अवघड वाटत होता. त्याची तयारी करताना जास्तीत जास्त नोटस्‌चे वाचन करण्यात येऊन त्या विषयाकडे विशेष लक्ष देण्यात आले. काही वेळा भावाची मदत घेऊन त्याच्याकडून बायोच्या अभ्यासाकरिता टिप्स घेतल्या. त्याचप्रमाणे प्राध्यापकांची मदत घेण्यात आली. माझ्या यशाचे श्रेय आई, वडील, भाऊ, प्राध्यापक वर्ग व मैत्रिणींना देते.

१२वीत यश संपादन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना एवढेच सांगू इच्छिते की, चार-पाच तास नियमित अभ्यास करावा, शिकवणी लावून वेळ वाया न घालता जास्तीत जास्त अभ्यासाकडे लक्ष द्यावे. जिद्द व मेहनतीच्या बळावर आपण यश संपादन करू शकतो. परंतु टीव्ही व मोबाईलचा वापर कमी करावा. डॉक्टर होऊन सामान्य लोकांची सेवा करावयाची आहे. त्याचप्रमाणे एमबीबीएस झाल्यानंतर रेडीओलॉजीमध्ये एमडी करावयाचे आहे, अशी इच्छा स्नेहलने 'लोकराज्य'कडे व्यक्त केली.

**संपर्क : ९४०३२३९२०७**












# चला सैनिक होऊया...

देशाच्या सेनादलाच्या भूदल, हवाईदल आणि नौदल या तिन्ही शाखा परिपूर्ण आणि सक्षम आहेत. या दलांमधील जवानांना मार्गदर्शन करणाऱ्या, रणनीती ठरविणाऱ्या सेना अधिकाऱ्यांचीही आवश्यकता असते. यासाठी पुण्याजवळील खडकवासला येथे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची (एनडीए) स्थापना करण्यात आली. या प्रबोधिनीतील प्रवेशासाठी परीक्षेची योग्य तयारी व मार्गदर्शन महाराष्ट्रातील तरुणांना मिळावे याकरिता औरंगाबाद येथे राज्य शासनाची देशातील एकमेव सैनिकी सेवापूर्व शिक्षण देणारी संस्था कार्यरत आहे.

**किरण वाघ**

**'एसपीआय'मध्ये प्रवेशासाठी पात्रता व प्रक्रिया**

औरंगाबाद येथे १९७७ पासून ही संस्था कार्यरत आहे. संस्थेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची एनडीए प्रवेश परीक्षेची कसून तयारी केली जाते. महाराष्ट्राचा रहिवासी असलेला अविवाहित विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरतो. इयत्ता १० वीमध्ये ६० टक्के गुण असले पाहिजेत. तसेच इयत्ता ७ वी, ८ वी, ९ वीमध्ये ६० टक्के गुण असले पाहिजेत. १० वीची परीक्षा दिलेला विद्यार्थी यासाठी पात्र आहे. परंतु, १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर ११ वीमध्ये विज्ञान शाखेलाच प्रवेश घ्यावा लागतो.

यासाठीचा प्रवेश अर्ज संस्थेमध्ये मिळतो. तसेच संस्थेच्या www.spiaurangabad.com या वेबसाईटवरही मिळतो. याबाबत विहीत रकमेचा राष्ट्रीयीकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा लागतो. प्राप्त अर्जाच्या आधारे पात्र विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी बोलविले जाते. ही परीक्षा मार्च / एप्रिलमध्ये पुणे, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद केंद्रांवर घेतली जाते. यातून साठ टक्के गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची 'आयक्यू टेस्ट' व तोंडी मुलाखत घेतली जाते.

'विद्यार्थ्यांना महाविद्यालय व संस्थेच्या परीक्षेत किमान साठ टक्के गुणांची सरासरी राखणे आवश्यक आहे. महाविद्यालयात जाण्यापूर्वी व आल्यानंतर संस्थेमध्ये तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची (एनडीए) प्रवेश परीक्षेची विशेष तयारी करून घेतली जाते. यात इंग्रजी संभाषण, वक्तृत्व, क्विझ, समूह चर्चा आदींचा समावेश आहे. पुण्याच्या नामांकित ग्रुपकडून ५/६ दिवसांची कार्यशाळा घेतली जाते. एनडीएची परीक्षा देण्याची किमान दोन वेळा विद्यार्थ्यांना संधी मिळते. येथील विद्यार्थ्यांची एनडीएच्या धर्तीवर पहाटे ५.३० पासून दिनक्रम ठरवून तयारी करून घेतली जाते.

विद्यार्थ्यांना जगभरातील चालू घडामोडींची माहिती देण्यात येते व त्यावर स्वत:चे मत मांडण्यास प्रवृत्त करण्यात येते. याबरोबरच योग अभ्यास तसेच मैदानी खेळांमधील नैपुण्यावरही भर देण्यात येतो. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत (एनडीए) प्रवेशासाठी आर्मीच्या मुलाखती भोपाळ व अलाहाबाद येथे, एअरफोर्सच्या म्हैसूरला तर नेव्हीसाठी कोची येथे घेण्यात येतात. संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष एअरमार्शल (नि.) डॉ. एस. कुलकर्णी, ब्रि. (नि.) बी. एस. करपे यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन लाभते. विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी संस्थेचे संचालक मेजर (नि.) चंद्रसेन कुलथे व अधीक्षक रवींद्र भुरचंडी तसेच संस्थेतील कर्मचाऱ्यांचेही योगदान महत्त्वपूर्ण आहे.

महाराष्ट्रातील एकमेव शासकीय सैनिकी संस्था म्हणून परिचित असलेल्या औरंगाबाद येथील सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेच्या (एसपीआय) विद्यार्थ्यांनी यूपीएससीमार्फत घेतल्या जाणाऱ्या एनडीएच्या परीक्षेत यंदाही भरघोस यश मिळविले आहे. राष्ट्रीय प्रशिक्षण प्रबोधिनीमध्ये (एनडीए) दाखल होण्यासाठी यूपीएससीद्वारे घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेत सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेचे ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेच्या ३४ व्या तुकडीचे ३१ व मागील वर्षाच्या तुकडीचे ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये एअरफोर्स-९, नेव्ही-७, आर्मी-२६ अशा ४२ विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे.

सैनिक सेवापूर्व शिक्षण संस्थेमधून आतापर्यंत ४५९ विद्यार्थी तिन्ही सैन्यदलांमध्ये अधिकारी पदावर कार्यरत असून, संस्थेचा पर्यायाने राज्याचा नावलौकिक वाढवित आहेत.

**संपर्क : ९७०२६५७८००**






# स्पर्धा परीक्षेतील मराठी टक्का!

**डॉ. सुनील धापटे**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर सालाबादप्रमाणे त्यामधील मराठी तरुणांच्या यशाची चर्चा सुरू होते. या परीक्षेत यशस्वी झालेल्या उमेदवारांमधील मराठी तरुणांच्या अल्प प्रमाणाबद्दल काही दिवस पोटतिडकीने मते मांडली जातात, परिसंवाद होतात. चर्चा हवेत विरतात. परिसंवादाचे पोकळ बुडबुडे हळूहळू विरून जातात. खरेतर, स्पर्धा परीक्षा आणि मराठी टक्का यावर साकल्याने विचार होणे गरजेचे आहे.

स्पर्धा परीक्षा आजच्या तरुणाईचा परवलीचा शब्द झाला आहे. सार्वजनिक क्षेत्रामध्ये किंवा शासकीय सेवेमध्ये कनिष्ठ पातळीपासून ते उच्च पातळीपर्यंत थेट पोहोचण्याचा स्पर्धा परीक्षा हा राजमार्ग आहे आणि राजमार्ग म्हटल्यावर या मार्गावर हौशे, नवशे, गवशे सगळेच आले. स्पर्धा परीक्षांमधून आलेले उमेदवार ज्या पदासाठी निवडले गेले आहेत त्या पदासाठी ते लायक/ पात्र आहेत हे पाहिले जाते का? तर सर्वसाधारण उत्तर येईल, नाही. व्यक्तीला एखाद्या पदावर काम करण्यासाठी लागणाऱ्या सक्षमता (Competencies) या स्पर्धा परीक्षांमधून सर्वसाधारणत: तपासल्या जात नाहीत. तर या स्पर्धा परीक्षांमधून उमेदवाराच्या सर्वसाधारण क्षमता (Abilities) तपासल्या जातात. याबरोबरच या परीक्षांच्या माध्यमातून त्या वर्षी असलेल्या उमेदवारांमधील सर्वसाधारण क्षमता तपासणीमध्ये आघाडीवर असलेले उमेदवार निवडले जातात, हे उमेदवार सर्वकालीन उत्कृष्ट असतीलच असे नाही हेही लक्षात घ्यावे लागेल.

या गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे सार्वजनिक किंवा शासकीय सेवेची प्रत आणि कामाचे प्रमाण (Quality and Quantity) शंकास्पद का असतात? याबाबी प्रकर्षाने पुढे येतील. याचाच परिपाक म्हणून सार्वजनिक क्षेत्र व शासकीय सेवांबाबत सामान्य जनतेमध्ये असलेली मते, विश्वास, आदर, प्रतिमा या पैलूंवर प्रकाश पडतो. सार्वजनिक किंवा शासकीय सेवांचा विचार करावयाचा झाला तर ढोबळमानाने त्यांच्यामध्ये साधारणत: तीन प्रकारचे कर्मचारी/ अधिकारी दिसून येतात. १. अत्यंत धडाडीने, कल्पकतेने, विधायक काम करणारे (हौशे) २. सर्वसाधारण नैमित्तीक काम करणारे (नवशे) ३. चुकीचे काम करणारे किंवा सत्तेची धुंदी असणारे, यांना नवे संस्थानिक असेही म्हणतात (गवशे). यामधील पहिल्या व तिसऱ्या वर्गामध्ये असलेल्या कर्मचारी /अधिकाऱ्यांची संख्या खरे पाहता खूपच नगण्य असते. परंतु, त्या यंत्रणेची प्रतिमा दुर्दैवाने या नगण्य लोकांमुळेच ठरते. अर्थात चांगली किंवा वाईट, नगण्यांमध्ये प्रभावी कोण? पहिल्या वर्गातले की तिसऱ्या वर्गातले यावरूनच प्रतिमा ठरते.


दुसरा महत्त्वाचा मुद्दा जो सातत्याने पाहायला मिळतो तो म्हणजे एखाद्या सेवेत नेमणूक झाल्यानंतर थोड्याच कालावधीमध्ये आपण या ठिकाणी योग्य नाही याची कर्मचारी/ अधिकाऱ्याला जाणीव होते. मग, ही माणसं व्यवस्थित कामच करीत नाहीत किंवा सातत्याने अडवणूकच करीत राहतात. (I am not happy, I will not make others happy) कार्यालयातील इतर प्रत्येक जण त्यांच्या बदलीची किंवा सेवानिवृत्त होण्याची वाट पाहतो. हुश्श्य! सुटलो. प्रश्न हाच आहे, कार्यालय सुटले परंतु जनतेने वर्षानुवर्षे यांचा त्रास का सहन करायचा? किंवा असे कर्मचारी /अधिकारी जिथे विचारणाच होत नाही किंवा कोणाचे लक्षच जाणार नाही अशा ठिकाणी विनासायास आयुष्य व्यतीत करण्याचा प्रयत्न करतात. अनेक महामंडळ, स्वायत्त संस्था किंवा विभागातील दुर्लक्षित कार्यालये ही याची काही उदाहरणे आहेत. फलीत जनतेचे नुकसान.

सार्वजनिक किंवा शासकीय सेवा करताना आवड, पुरोगामी विचारसरणी, सामाजिक बांधिलकी, या बाबी आवश्यक आहेत. थोडक्यात, आवड व राज्य घटनेने नागरिकांकडून अपेक्षित केलेली कर्तव्ये या बाबींनी परिपूर्ण असणे ही सार्वजनिक किंवा शासकीय सेवांसाठी मूलभूत आवश्यकता आहे.



महाराष्ट्राच्या दृष्टीने विचार केल्यास महाराष्ट्रात असलेला पुरोगामी विचारसरणीचा, सामाजिक अभिसरणाचा वारसा लक्षात घेता, आवड असलेल्या मराठी तरुणांना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सार्वजनिक किंवा शासकीय सेवांमध्ये प्रवेश मिळविणे ही एक अत्यंत मौल्यवान संधी आहे. असे असताना स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी टक्का कमी दिसतो असे का?

**१. रोजगाराच्या मुबलक संधी –** महाराष्ट्रामध्ये रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध असल्यामुळे अनेक प्रज्ञावंतांचे स्पर्धा परीक्षांकडे दुर्लक्षच होते.



**२. योग्य मार्गदर्शनाचा अभाव –** स्पर्धा परीक्षा हा आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. परंतु, अत्यंत व्यवस्थितपणे व प्रभावीपणे यावर मार्गदर्शन मिळू शकेल अशी ठिकाणेच फार कमी आहेत. दुर्दैवाने स्पर्धा परीक्षा हे अत्यंत चलनी नाणे झालेले असून, याला मोठ्या व्यवसायाचे स्वरूप आले आहे. प्रत्येक जण या वाहत्या गंगेमध्ये हात धुऊन घेतोय.

**३. 'स्व'ची ओळख –** मी स्वत: काय करू शकतो? माझ्या क्षमता, कमतरता, आवड, इच्छा, याची स्पष्ट जाणीवच तरुणांमध्ये नसल्यामुळे यश प्राप्तीमध्ये अडचण येते.

**४. शासकीय कामकाजाबाबत समज –** शासनामध्ये भ्रष्टाचार असतो, राजकीय हस्तक्षेप असतो, मूल्यांशी तडजोड करावी लागते, चांगल्या कामाला किंमत नाही या समजावर ठाम विश्वास असल्यामुळे अनेक तरुण या स्पर्धांमध्ये सहभाग घेत नाहीत.

**५. ध्येयाबाबत संदिग्धता –** आयुष्यामध्ये मला नेमकेपणाने काय पाहिजे? माझी काय स्वप्ने आहेत? याबाबत संदिग्धता यामुळे तरुणांना यश मिळविण्यात अडचण येते.

**दिशाहीन कष्ट- स्पर्धा परीक्षांसाठी नियोजन व दिशा निश्चित न करता ढोर मेहनत केली जाते. यामुळे आत्मविश्वास कमी पडतो. प्रयत्न अपुरे पडतात.**

**६. स्पर्धा परीक्षांबाबत उशिरा माहिती –** बऱ्याचदा तरुणांना स्पर्धा परीक्षांबाबत खूप उशिरा माहिती मिळते. स्पर्धा परीक्षांबाबत स्पष्टपणे माहिती साधारणत: पदवी परीक्षेनंतरचं होते. कदाचित दहावी, बारावीमध्ये विद्यार्थी स्पर्धा परीक्षांबाबत बोलतात; पण, हे केवळ एक अंधुकसे, अस्पष्ट असे चित्र त्यांच्यासमोर असते. त्यामध्ये स्पष्टता नसते.

**स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्याची मराठी तरुणांमध्ये तीव्र इच्छा दिसत नाही. तरुणांना ही स्पर्धा परीक्षा जिंकायचीच आहे अशी तीव्र इच्छा नसते. Passion नसल्यानेच मग यश दूर राहते.**

**७. स्पर्धा परीक्षांबाबत अपुरी माहिती –** तरुणांना स्पर्धा परीक्षांबाबत पूर्ण माहिती नसते. स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळाले तर आपले नेमके काय काम असेल याबाबत तरुणांमध्ये संदिग्धता, गैरसमज असतात, कामाबाबत स्पष्टता नसते. अनेकदा केवळ लोकसेवा आयोगाच्या सर्वसाधारण परीक्षांचीच तरुणांना माहिती असते. याशिवाय विविध खात्यांच्या, विभागांच्या राष्ट्रीय व राज्य स्तरावर असंख्य स्पर्धा परीक्षा आहेत. अनेक क्षेत्र आहेत याची माहितीच तरुणांना नसते. याबरोबरच संपर्काची सर्व साधने असतानाही शहरी तरुणांपेक्षा ग्रामीण तरुणांना स्पर्धा परीक्षांबाबत जास्त माहिती असते असे आढळते.

**न्यूनगंड व भीती- आपल्याला जमणार नाही हा न्यूनगंड आणि परीक्षेचे माध्यम, आवाका याबाबत भीती. यामुळे आत्मविश्वासाने सामोरे जाण्याची मानसिकताच तयार होत नाही.**

**८. अपेक्षांचे ओझे –** समाजामध्ये कोणीतरी उच्च पदावर पोहोचला म्हणून सभोवतालच्या/ जवळच्या व्यक्तींनी व इतरांनी लादलेल्या इच्छापूर्तीसाठी स्पर्धा परीक्षांचा विचार केला जातो. त्यामध्ये तरुणांचे स्वत:चे स्वप्न नसते. बऱ्याचदा इतरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी केलेली ती निरर्थक धडपड असते.

**९. जमले तर पाहू वृत्ती –** जमले तर पाहू, एखादी पोस्ट मिळाली तर पाहू यामुळे स्पर्धा परीक्षा देताना गांभीर्याचा अभाव जाणवतो. जमले तर पाहू. गाजराची पुंगी वाजली तर वाजली ही वृत्ती यामुळे यश मिळण्यात अडचणी येतात.

या सर्व कारणांमुळे स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी टक्का कमी दिसून येतो. शालेय पातळीपासून जागरूकता व Exposure मिळाल्यास, आवड व तीव्र इच्छाशक्ती निर्माण केल्यास व योग्य मार्गदर्शनाची गरज पूर्ण झाल्यास स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी टक्का नक्कीच वाढेल. आमच्या तरुणांमध्ये शक्ती, क्षमता, सक्षमता नक्कीच आहे. दिशा देणे गरजेचे आहे.

**संपर्क :९८२३३३८२२८**

✦✦

# राज्य प्रशासकीय शिक्षणसंस्था

**नागरी सेवा परीक्षांमधील मराठी टक्का वाढविण्याच्या हेतूने शासनाने राज्य प्रशासकीय शिक्षण संस्था स्थापन केली असून, त्यात दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या संस्थेतील प्रवेशासाठी महाराष्ट्रातील रहिवासी ही प्रमुख अट आहे. वयोमर्यादा २१ ते ३० असून, ११ महिने प्रशिक्षण दिले जाते. यासाठी दरवर्षी साधारणत: तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी अर्ज करतात. परंतु, केवळ १०० विद्यार्थी/ विद्यार्थिनींना प्रवेश दिला जातो. या संस्थेत विद्यापीठीय परीक्षा पद्धती व नागरी सेवा परीक्षा पद्धती यातील नेमका फरक ओळखून स्पर्धा परीक्षाभिमुख विद्यार्थी घडविण्यावर भर देण्यात येतो. दर आठवड्याला नागरी परीक्षा सेवा पद्धतीनुसार चाचण्या घेण्यात येतात. तज्ज्ञ प्राध्यापकांकडून उत्तरपत्रिकांची तपासणी केली जाते. त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येते. मॉक इंटरव्ह्यूसाठी सनदी अधिकारी, ज्येष्ठ पत्रकार, वकील यांचे पॅनल नियुक्त केले जाते. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार इंटरनेटच्या सुविधेसह संस्थेच्या ग्रंथालयात सर्व विषयांची नामांकित प्रकाशनांची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विविध प्रकारच्या सेवा, सुविधा व सोयी येथे आहेत. या संस्थेत खुल्या अभ्यासिकेची निर्मिती करण्यात आली आहे तसेच नवे भोजनगृह व सभागृह बांधण्यात आले आहे. संस्थेच्या निसर्गरम्य वातावरणातील अभ्यासिका विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करीत असते. सध्या या संस्थेत २५ विद्यार्थ्यांची तर चर्चगेटजवळील शासकीय महाविद्यालयातील वसतिगृहात ३५ विद्यार्थ्यांची आणि १० विद्यार्थिनींसाठी चर्चगेट येथील तेलंग महिला वसतिगृहात स्वतंत्र निवास व्यवस्था करण्यात आली आहे.** **(संपर्क : ०२२- २२०६१०७१ )**




# बालभारतीचं विश्व

माधव राजगुरू




आयुष्यभर साथसंगत करणारी, उत्तम संस्कारांची शिदोरी देणारी पाठ्यपुस्तके बालभारतीत तयार होतात, एवढीच प्राथमिक स्वरूपाची माहिती अनेकांना आहे; परंतु दरवर्षी १९ कोटी पुस्तकांची छपाई करून त्यांचे वितरण करणारी बालभारती कशी आहे, तिथे पाठ्यपुस्तकांची निर्मिती प्रक्रिया कशी चालते, पुस्तके तयार होऊन विद्यार्थ्यांच्या हातात पडेपर्यंत ती किती टप्प्यांतून जातात, एकूणच पाठ्यपुस्तकांचा हा प्रवास किती खडतर आणि विलक्षण आहे, हे समजून घ्यायला वाचकांना निश्चितच आवडेल. प्रतिवर्षी एकाचवेळी राज्यातील हजारो शाळांमधील लाखो शिक्षक, कोट्यवधी विद्यार्थी आणि तितकेच पालक यांना आपुलकीच्या अतूट धाग्यांनी जोडणारी 'बालभारती' ही खऱ्या अर्थाने 'लोकभारती' आहे.




कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार २७ जानेवारी १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे या संस्थेची स्थापना झाली. याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते २ फेब्रुवारी १९६७ रोजी झाले. मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष या नात्याने तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांचे संस्था उभारणीत आणि मंडळाचे पहिले संचालक उत्तमराव सेवलेकर आणि पहिले नियंत्रक बापूराव नाईक यांचे संस्थेच्या प्रारंभीच्या वाटचालीत मोलाचे योगदान राहिले.

राज्यातील प्राथमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या पहिली ते सातवीच्या (१९८८ पासून आठवीपर्यंतच्या) विद्यार्थ्यांसाठी भाषा व इतर सर्व विषयांची पाठ्यपुस्तके तयार करून वितरित करणे हे मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मराठी बालभारती इयत्ता पहिली हे मंडळाचे पहिले पुस्तक १९६८ साली प्रकाशित झाले. आजपर्यंत बालभारतीच्या पाच माला प्रकाशित झाल्या. १९६८ पासून गेली ४४ वर्षे पाठ्यपुस्तक मंडळ दर्जेदार, संस्कारक्षम आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी पाठ्यपुस्तके अल्प किमतीत उपलब्ध करून देण्याचे कार्य अव्याहतपणे पार पाडत आहे. संस्थेचे नाव महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ असे असले, तरी 'बालभारती' या नावाने प्रकाशित होणारी भाषेची पाठ्यपुस्तके अल्पावधीतच इतकी लोकप्रिय झाली, की मंडळ 'बालभारती' याच नावाने ओळखू लागले. बालभारतीला लोकप्रियता मिळवून देण्यात प्रारंभीच्या पाठ्यपुस्तकांच्या मुखपृष्ठावरील बहीण-भावंडाच्या चित्राचा तितकाच मोठा वाटा आहे. दीनानाथ दलालांनी काढलेल्या चित्रातील बहीण-भावंडं राज्यातल्या खेडोपाड्यातील बालकांना आणि पालकांना आपलीशी वाटली.

**पाठ्यपुस्तक मंडळाची रचना**


पाठ्यपुस्तक मंडळ हे राज्यशासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेली स्वायत्त संस्था आहे. राज्याचे शिक्षणमंत्री हे या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. संस्थेचे सर्व धोरणात्मक निर्णय नियामक मंडळात घेतले जातात. शिक्षणमंत्री हे नियामक मंडळाचे अध्यक्ष आणि राज्याचे सर्व शिक्षण संचालक पदसिद्ध सदस्य असतात. उद्दिष्टानुवर्ती काम करण्यासाठी मंडळामध्ये महत्त्वाचे चार विभाग आहेत. १. विद्याविभाग, २. निर्मिती विभाग, ३. साठा व वितरण विभाग आणि ४. प्रशासन व अर्थ विभाग.

**विद्याविभाग**

पाठ्यपुस्तके तयार करण्याचे मुख्य काम विद्याविभागात चालते. विद्याविभागांतर्गत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू, गुजराती या आठ भाषा आणि इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण असे एकूण १४ विभाग आहेत. प्रत्येक विषयासाठी एकेक विशेष अधिकारी असून हे अधिकारी त्या त्या विषयातील तज्ज्ञ असतात.

**विषय समित्या आणि त्यांचे कार्य**

पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी विषयवार समित्या असून समितीत प्राथमिक स्तरापासून ते विद्यापीठ स्तरापर्यंतचे ५ ते ६ शिक्षक, विषयतज्ज्ञ असतात. यात प्राथमिक शिक्षकांचे प्रमाण अधिक



असते. मंडळातील त्या त्या विषयाचे अधिकारी विषय समित्यांमध्ये सदस्य-सचिव म्हणून काम करतात. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा विविध प्रादेशिक विभागांना समितीत योग्य प्रतिनिधित्व मिळेल अशी काळजी घेतली जाते. महिला व सर्जनशील कवी, लेखक यांचेही योग्य प्रमाण राखले जाते. या सर्व विषय समित्यांना नियामक मंडळाची मान्यता असते. पाठ्यपुस्तकातील संपूर्ण आशयाला संबंधित समित्या जबाबदार असतात. जुन्या अभ्यासक्रमाच्या जागी नवीन अभ्यासक्रम येऊन पाठ्यपुस्तके बदलली जात नाहीत, तोपर्यंत या समित्या कार्यरत असतात.

सर्वांत प्रथम राष्ट्रीय पातळीवर अभ्यासक्रमाचा आराखडा तयार होतो. दिल्ली येथील एन.सी.ई.आर.टी ही संस्था हा अभ्यासक्रम आराखडा तयार करते. हा आराखडा प्रत्येक राज्याकडे पाठवला जातो. आराखड्यातील मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रत्येक राज्याचा वेगळा अभ्यासक्रम तयार केला जातो. राज्याचा अभ्यासक्रम तयार झाला, की त्याला राज्यशासनाची मान्यता घेतली जाते. त्यानंतर पाठ्यपुस्तके तयार करण्याची प्रक्रिया सुरू होते. अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके या दोन भिन्न गोष्टी आहेत. अभ्यासक्रमावर पाठ्यपुस्तके बेतलेली असतात, पण पाठ्यपुस्तके म्हणजे अभ्यासक्रम असे समजणे चुकीचे आहे.

पाठ्यपुस्तक तयार करण्याआधी समितीत अभ्यासक्रमाचे सूक्ष्म वाचन होते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचाही अभ्यास केला जातो. अभ्यासक्रमातील तरतुदी लक्षात घेऊन प्रथम पाठ्यपुस्तकांचा स्थूल आराखडा बनवला जातो. स्थूल आराखडा पहिली ते आठवीचा एकत्रित असतो. त्यानंतर इयत्तावार आराखडे तयार केले जातात.

भाषेची पाठ्यपुस्तके तयार करणे हे सर्वांत कठीण काम असते. मुलांचा वयोगट, त्यांचं भावविश्व, त्यांची आकलन क्षमता, मजकुराची काठिण्यपातळी या सर्व गोष्टी लक्षात घेऊन पाठ्यविषयांची निवड करणे आणि सोप्या भाषेत त्यांचे लेखन करणे हे एक प्रकारचे दिव्यच असते. यासाठी तयार साहित्य फारसे उपयुक्त नसते. पहिली/दुसरीच्या मानाने वरच्या इयत्तांची पाठ्यपुस्तके तयार करणे सोपे असते; कारण बाजारात अनेक विषयांवरची असंख्य पुस्तकं उपलब्ध असतात. त्यातून हवा तो मजकूर पाठ्यपुस्तकात घेण्याची सोय असते. त्यातही एक मोठी अडचण असतेच. ती म्हणजे - निवडलेला उतारा हवा तसा असतोच असे नाही, त्यावर संपादकीय संस्कार महत्त्वाचे असतात. असे संस्कार बऱ्याच लेखकांना मान्य नसतात. बऱ्याचदा याच कारणाने नामवंत लेखकाच्या उत्तम साहित्यापासून मुलांना वंचित राहावे लागते. इतर विषयांची पुस्तके अभ्यासक्रमातील घटकांप्रमाणे लिहिली जातात. ती लिहिताना त्यातील भाषा, मजकुराची काठिण्यपातळी इत्यादी बाबींवर लक्ष द्यावे लागते.

### मसुदा प्रतीचे समीक्षण

पाठ्यपुस्तकाची मसुदा प्रत तयार झाल्यानंतर राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांमधील ६० ते ७० शिक्षकांना बोलावून या पुस्तकाचे तीन दिवस समीक्षण केले जाते. पाठ्यविषय, पाठ्यांश, भाषा, काठिण्यपातळी, चित्रांकन, स्वाध्याय अशा अनेक घटकांविषयी शिक्षकांच्या सूचना लेखी स्वरूपात घेतल्या जातात. समिती स्तरावर या सर्व सूचना/अभिप्राय यांचे वाचन व त्यावर चर्चा होते. मसुदा प्रतीमध्ये आवश्यक त्या सुधारणा केल्या जातात. सुधारित प्रत तयार होताच अंतिम चित्रांकनासाठी समितीत चित्रकारास बोलवून सूचना दिल्या जातात. चित्रांकने आल्यानंतर कोणते चित्र कोणत्या ठिकाणी घ्यायचे, त्यासाठी किती जागा सोडायची या संदर्भातील सूचना समीक्षणोत्तर सुधारित प्रतीत दर्शवल्या जातात. समीक्षणोत्तर सुधारित प्रत तयार झाल्यावर ती मुद्रित शोधन विभागाकडे पाठवली जाते.

### राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने परीक्षण

वर नमूद केल्याप्रमाणे पाठ्यपुस्तकाच्या मसुदा प्रतीचे समीक्षण होत असतानाच त्याचे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने तज्ज्ञांकडून स्वतंत्रपणे परीक्षण केले जाते. जातिवाचक, निंदव्यंजक शब्द वा मजकूर, समूहाच्या भावना दुखावणारी वाक्ये, राष्ट्रपुरुषांचा अवमान होईल असे शब्दप्रयोग, राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारा, चुकीची माहिती असणारा, चुकीचा संदेश देणारा मजकूर इत्यादीची तपासणी करून असा भाग वगळला जातो. पाठ्यपुस्तकांचे प्रकाशनपूर्व इतक्या सूक्ष्म पद्धतीने परीक्षण केले जात असल्यामुळेच राज्यातील पाठ्यपुस्तके अधिक निर्दोष असतात असे म्हटले तरी चालेल.

### मुद्रित शोधन

अनेक परीने काळजी घेऊनसुद्धा मुद्रणात अनेक प्रकारचे दोष राह शकतात. एखादा शब्द, मजकूर गाळला जाणे, मूळ शब्दाऐवजी चुकीचा शब्द येणे. (वाई-बाई), शब्दातील अक्षर गळणे (माधुकरी-माधुरी), नको असताना अनुस्वार पडणे, अनुस्वार गळून पडणे इत्यादी. अनेकदा चुकीचा छापलेला शब्दही बरोबर वाचला जातो. यासाठी मजकुराचे वाचन त्रयस्थ व्यक्तींकडून होणे गरजेचे असते. मंडळात स्वतंत्र मुद्रितशोधन विभाग असून त्या ठिकाणी समीक्षणोत्तर अक्षरजुळणी केलेल्या प्रतीचे तीन ते चार वेळा वाचन होते. मुद्रित शोधन विभाग जागरूक असल्यामुळेच पाठ्यपुस्तके अधिक निर्दोष होण्यास मदत होते.

### अंतिम छपाई

मुद्रित शोधन विभागाकडून दाखवण्यात आलेल्या त्रुटी सुधारून अंतिमत: छपाईयोग्य प्रत तयार झाल्यावर चित्रांकनासह ती प्रत निर्मिती विभागाकडे पाठवली जाते. निर्मिती विभागात या प्रतीवर छपाईपूर्व प्रक्रिया होऊन रंगीत मुद्रिते पुन्हा विद्याविभागाकडे पाठवली जातात. विद्याविभागात रंगीत मुद्रितांचे सूक्ष्म वाचन होते. गरजेनुसार समिती सदस्यांची या कामात मदत घेतली जाते. चित्रे योग्य ठिकाणी आहेत का, मजकूर बरोबर आहे का, छपाईपूर्व प्रक्रिया करताना मजकूर सरकणे, गळणे असे प्रकार झाले आहेत का, यादृष्टीने मुद्रितांचे वाचन केले जाते. काही त्रुटी आढळल्यास त्या सुधारण्याच्या सूचना दिल्या जातात. निर्मिती विभाग सूचनेनुसार सुधारणा करून यंत्रमुद्रित प्रत तयार



**पाठ्यमजकुराचे लेखन करणे, त्यावर चर्चा करणे, अपेक्षेप्रमाणे नसल्यास रद्द करणे, पुन्हा लिहिणे, पुन्हा चर्चा याप्रमाणे असंख्यदा प्रक्रिया होऊन एकदाचा पाठ्यपुस्तकाचा मसुदा तयार होतो. स्वत:चे समाधान होईपर्यंत हे काम पुन:पुन्हा केले जाते. अनेकदा यातील पाठ प्रत्यक्ष वर्गात शिकवून पाहिले जातात. अंतिम मसुदा प्रत तयार झाल्यानंतर त्याची अक्षरजुळणी करून ती प्रत समीक्षणासाठी सिद्ध केली जाते. मसुदा प्रतीबरोबर शक्यतो पुस्तकातील कच्च्या स्वरूपातील रेखाचित्रे चित्रकारांकडून काढून दिली जातात.**




करतो. यंत्रमुद्रिताचेही विद्याविभागात पुन्हा वाचन होते. अनवधानाने राहिलेल्या त्रुटी सुधारून घेतल्या जातात. यंत्रमुद्रित प्रत छपाईयोग्य आहे, अशी खात्री झाल्यावरच छपाईचा आदेश दिला जातो.

छापून पूर्ण झालेली पुस्तके मंडळाच्या भांडारात साठवली जातात. तिथून ती पुस्तक विक्रेते व शिक्षणसंस्था गरजेनुसार घेऊन जातात. राज्यातील प्रमुख नऊ शहरांमध्ये मंडळाची अशी भांडारे आहेत.

### अधिप्रमाणन व गुणवत्ता परीक्षण

नवीन पाठ्यपुस्तक बाजारात आल्यानंतर त्या पुस्तकाचे दरवर्षी पुनर्मुद्रण होते. वर्षभर शिकवल्यानंतर शिक्षक त्यांना आढळलेल्या त्रुटी मंडळाला कळवतात. काही विद्यार्थी व पालक यांच्याकडूनही सूचना येतात. या सूचना लक्षात घेऊन पाठ्यपुस्तकाचे अधिप्रमाणन केले जाते. भाषेतर विषयाची पाठ्यपुस्तके तज्ज्ञांकडे देऊन त्यांच्या गुणवत्तेचे परीक्षण केले जाते. अशा प्रकारे अधिप्रमाणित केलेली पुस्तके पुनर्मुद्रणासाठी निर्मिती विभागाकडे पाठवली जातात. पुस्तक अभ्यासक्रमात असेपर्यंत ही प्रक्रिया दरवर्षी केली जाते.

### अमराठी भाषक मुलांची पुस्तके

राज्यात मराठी, हिंदी, इंग्रजीबरोबरच अमराठी माध्यमांच्या शाळांची संख्या लक्षणीय आहे. उर्दू, कन्नड, सिंधी, गुजराती, तेलुगू इत्यादी मातृभाषा असणारे अनेक अमराठी भाषक महाराष्ट्रात राहतात. त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून शासनाने अमराठी माध्यमांच्या शाळा सुरू करण्यास राज्यात परवानगी दिली आहे. या मुलांसाठी त्यांच्या मातृभाषेतील पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम बालभारतीच करते. इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित इत्यादी विषयांची पुस्तके मराठीतून तयार झाल्यानंतर ती अन्य अमराठी भाषांत अनुवादित केली जातात. हीच पुस्तके या शाळांमध्ये अभ्यासली जातात.

### माध्यमिक/ उच्च माध्यमिक मंडळाची पुस्तके

बालभारतीत आठवीपर्यंतची पाठ्यपुस्तके तयार होतात. नववी, दहावी, अकरावी व बारावी या इयत्तांची पाठ्यपुस्तके राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ तयार करते; मात्र त्या सर्व पाठ्यपुस्तकांची छपाई करून देण्याची जबाबदारी बालभारतीकडेच असते. अशा रीतीने प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील सर्व विषयांची पाठ्यपुस्तके आणि स्वाध्यायपुस्तिका सर्व मिळून ९०० हन अधिक शीर्षके आहेत, तर छपाई होणाऱ्या एकूण पुस्तकांची संख्या सुमारे १९ कोटी इतकी आहे.

### बोलकी बालभारती

इयत्ता पहिली ते चौथीच्या पाठ्यपुस्तकातील गद्य-पद्य पाठांवर आधारित 'बोलकी बालभारती' या नावाने ध्वनिफितीची निर्मिती १९८३-८४ ला केली. त्या त्या पाठाच्या लेखक-कवींच्या आवाजात सर्व पाठ मुद्रित करण्यात आले होते. या उपक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. याचवेळी वर्ग पहिली ते चौथीच्या पुस्तकातील कवितांना संगीतकार राम कदम व यशवंत देव यांनी चाली लावून संगीतबद्ध केलेल्या ध्वनिफितीचेही राज्यभर स्वागत झाले.

गुणवत्ता व दर्जा याबाबतीतसुद्धा मंडळाची पाठ्यपुस्तके मागे नाहीत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मंडळनिर्मित पाठ्यपुस्तकांची गुणवत्ता व दर्जा उत्कृष्ट असल्याबाबतची प्रमाणपत्रे मिळाली आहेत. आजही देश-विदेशातील मंडळे बालभारतीला भेट देण्यासाठी येतात आणि येथील रचना आणि कार्यपद्धती त्यांच्याकडे सुरू करण्याच्या दृष्टीने विचार करतात, यातच बालभारतीचे यश दडलेले आहे.



बदलत्या काळानुसार आता बालभारतीही बदलते आहे. आधुनिक ज्ञान-तंत्रज्ञान यामुळे पारंपरिक पाठ्यपुस्तकांचे स्वरूप बदलण्यासाठी व नवी आव्हाने पेलण्यासाठी बालभारती सज्ज झाली आहे.

**संपर्क : ९४२३५६९०८४**
विशेषाधिकारी-मराठी,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे




## किशोर

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीदिनी (१४ नोव्हेंबर १९७१ रोजी) ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी 'किशोर' हे मासिक मंडळाने सुरू केले. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, अभ्यासक्रमाबाहेरचे ज्ञान मिळावे, त्यांच्या संवेदनशील मनावर उत्तम मूल्यांचे संस्कार व्हावेत ही उद्दिष्टे ठेवून किशोर मासिक चालवले जाते. गेल्या ४० वर्षांत किशोर मासिकाने अनेक पिढ्यांवर वाचनाचे, ज्ञान-विज्ञानाचे व मूल्यांचे संस्कार केले आहेत. अनेक चित्रकार, कवी लेखक यांना मासिकाने घडवले आहे. गेल्या ४० वर्षांतील किशोरमधील उत्तम निवडक साहित्य १४ खंडांत प्रकाशित झाले आहे. कथा, कविता, चरित्र, विज्ञान, ललित, लोककथा या खंडांना वाचकांची विशेष मागणी आहे.

**(संपर्कासाठी : ०२०- २५७१६१०७)**



# सारे शिकूया पुढे जाऊया

**आकाश जगधने**

केंद्र सरकारने २००२ मध्ये ८६ वी घटनादुरुस्ती करून प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटांतील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार, २००९ अधिनियम पारित केला. १ एप्रिल, २०१० पासून बालकांना शिक्षणाचा मूलभूत हक्क प्रदान करण्याचा अधिनियम सर्व राज्यांना (जम्मू-काश्मीर वगळून) लागू केला.




प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान नावाचा कार्यक्रम सुरू केला. वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण, शाळाबाह्य मुलांना शाळांमध्ये दाखल करणे, गळतीचे प्रमाण शून्य टक्क्यांवर आणणे. १ ली ते ८ वीपर्यंतच्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि शिक्षणातील सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक तफावत दूर करणे अशी या अभियानाची सर्वसाधारण रूपरेषा आहे. राज्यात २००७-०८ पासून सर्व शिक्षा अभियान राबविण्यास सुरुवात झाली. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी २०१०-११ या वर्षात रु. १६०० कोटी इतकी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली होती. शासनाने २०१२ मध्ये राज्यातील प्रत्येक शाळेने, पहिलीच्या वर्गाच्या एकूण विद्यार्थी संख्येपैकी २५ टक्क्यापर्यंतच्या जागा नजीकच्या परिसरातील वंचित व दुर्बल घटकांतील बालकांच्या प्रवेशासाठी राखून ठेवाव्यात व त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे असा नियम केला. गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणासाठी शासनाने अनेक उपाययोजना सुरू केल्या. उदाहरणार्थ १ ली ते ८ वीपर्यंतच्या सर्व मुलींना मोफत पाठ्यपुस्तके याबरोबरच अनुसूचित जाती-जमातीच्या सर्व मुलांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविली जात आहेत.

विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी खास तरतूद, शाळा व शिक्षक अनुदान, शैक्षणिक साहित्यासाठी उच्च प्राथमिक शाळांना विशेष अनुदान, वंचित घटकातील मुलांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन, उच्च प्राथमिक शाळेसाठी अध्यायन अध्यापन साधने, शिक्षण हमी योजना केंद्राचे नियमित शाळेत रूपांतर किंवा शासन निकषाप्रमाणे नवीन शाळा सुरू करणे, शाळाबाह्य मुलांसाठी विशेष उपक्रम, व्यवस्थापन अशा विविध सुविधा सर्व शिक्षा अभियानातून देण्यात येत आहेत. राज्याने सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत जे उपक्रम हाती घेतले आहेत त्याची दखल घेत केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालयाने देशातील अन्य राज्यांनी अनुकरण करावे, असे कळविले आहे. हा राज्याचा बहुमान आहे.




राज्यात इंग्रजी आणि गणित विषयाची पातळी खालावलेली आहे, या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यासाठीही शासनाने ब्रिटिश कौन्सिलच्या मदतीने शिक्षकांना प्रशिक्षण देणे सुरू केले आहे. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या इंग्रजी आणि गणित विषयाच्या अध्यायन पातळीत सुधारणा घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वयं अध्यायनास प्रवृत्त करण्यासाठी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. इयत्ता ५ वी ते ७ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी नंदादीप शाळा (१ ली ते ४ थी), पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांची गणिताची आणि इंग्रजीची अध्यायन पातळी सुधारणे, पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी वाचन कोपरा निर्मिती करण्यात आली आहे.

राज्यात १ ली ते ८ वीपर्यंतच्या सुमारे १ लाख ८४ प्राथमिक शाळा आहेत. त्यात १ कोटी ६२ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या सर्व विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या गुणवत्तेत वाढ करून दर्जेदार शिक्षण देण्याचे राज्यापुढे किती मोठे आव्हान आहे, हे लक्षात येईल. दुसरे म्हणजे खाजगी इंग्रजी शाळांची अवस्था खूप चांगली आहे असे म्हणणे धाडसाचे आहे. याच्या उलट राज्यात जिल्हा परिषदांच्या १५० अशा गुणवत्तापूर्ण शाळा आहेत की त्यात प्रवेश मिळावा म्हणून पालकांची धडपड सुरू असते. अशा गुणवत्तापूर्ण शाळांची संख्या वाढविण्याचे खरे आव्हान आपल्या पुढे आहे.

राज्यात सुमारे ५.५ लाख प्राथमिक शिक्षक आहेत. शासनाने २०१०-११ मध्ये सुमारे १ लाख ५४ हजार ३८९ शिक्षकांना कौशल्य व क्षमता वृद्धीसाठी प्रशिक्षण दिले. ५६,९१९ वर्ग खोल्या बांधून पूर्ण केल्या. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण २००२-०३ मध्ये १५ टक्के होते ते २००९-१० मध्ये २.७ टक्के इतके कमी करण्यात यश आले. उच्च प्राथमिक स्तरावर हे प्रमाण २० वरून ७.६ टक्क्यांवर आणण्यात आपण यशस्वी झालो. २०१०-११ या शैक्षणिक वर्षात ६१० संगणक प्रयोगशाळा व ३५१ मॉडेल कॉम्प्युटर ॲप्लिकेशन प्रयोगशाळा स्थापन केल्या गेल्या. १.३९ कोटी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्यात आली. सर्व शिक्षा अभियानाचे हे फलित म्हणावे लागेल.

सर्व शिक्षा अभियानात शारीरिक व मानसिक विकलांग विद्यार्थ्यांसाठी विकलांग समावेशन शिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्यात वैयक्तिक तपासणी, ब्रेल पुस्तक, चष्मा, श्रवणयंत्र आदी उपकरणे, वाचा प्रशिक्षक, इ. पुनर्वसन व शैक्षणिक आधार सुविधा पुरविल्या जातात. सन २०१० पर्यंत ४.१ लाख मुलांना या योजनेचा लाभ झाला आहे.

**संपर्क : ७३८७८०३६६२**







**१९६० ते २०११ या कालावधित महाराष्ट्राच्या अनेक शहरांमध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक असे विविध बदल झाले. अत्याधुनिक पायाभूत सुविधांमुळे शहरांचा चेहरामोहरा बदलला. या बदललेल्या शहरांच्या बाह्य रूपाबरोबरच अंतर्मनाचा मागोवा घेणारे सदर या अंकापासून सुरू करीत आहोत.**

# ओ ऽऽऽ नागपूर

**प्रवीण बर्दापूरकर**


नागपूर विद्यापीठ


डॉ. मुंजे चौक


राजाराम – सीताराम वाचनालय


एम्प्रेस मिलमधील कामगारांच्या मुलांची शाळा


नाग नदी व पिवळी नदीचा संगम

नागपूरला सर्वप्रथम आलो ते १९७१ साली, स्वच्छता निरीक्षकाची परीक्षा देण्यासाठी. परीक्षा द्यायचीच नसल्याने खूप भटकलो. तोपर्यंत मी पाहिलेले सर्वांत मोठे गाव औरंगाबाद होते; ते होते साधारण सव्वालाख लोकसंख्येचे आणि लेबर कॉलनी ते छावणी असे पसरलेले. नागपूर विस्ताराने त्यापेक्षा चौपटीपेक्षा जास्त होते आणि महत्त्वाचे म्हणजे विधान भवन, उच्च न्यायालय, आमदार निवास, रिझर्व्ह बँक, झीरो माईल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, विश्वेसरय्या रिजनल इंजिनीअरिंग कॉलेज, लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यट ऑफ टेक्नॉलॉजी, अग्निशमन प्रशिक्षण महाविद्यालय, नीरी (राष्ट्रीय पर्यावरण आणि अभियांत्रिकी संशोधन संस्था), नजरेत मावणार नाही अशा विस्तीर्ण परिसरातले कृषी महाविद्यालय, अशा अनेक कधी औरंगाबादला ऐकण्यात नसलेल्या संस्था नागपुरात होत्या आणि त्या संस्थाच्या इमारती मोठ्या ऐटबाजपणे उभ्या होत्या. कस्तुरचंद पार्कवरचे bandstand, त्यावरची कलाकुसर बघून तर वेडावूनच गेलो. इंग्रजांच्या काळात या bandstand वर जनतेच्या मनोरंजनासाठी दररोज सायंकाळी band वादन होत असे. (कल्पक आणि चौफेर व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेले अटलबहादूर सिंह दुसऱ्यांदा महापौर झाल्यावर त्यांनी पुन्हा हे वादन सुरू केले; पण, तोपर्यंत टीव्हीचे आगमन झालेले होते, मनोरंजनाची साधने आणि लोकांची आवड-निवड बदललेली होती त्यामुळे हे वादन बंद पडले ते पडलेच!) नागपूरचे रस्ते प्रशस्त आणि स्वच्छ होते. गर्द झाडी होती; हे शहर हिरवाई लेऊनच उभे असल्याचा मनमोहकपणा त्यात होता आणि तो लुब्ध करणारा होता. यानंतर विश्व युवक केंद्राच्या एका कॅम्पसाठी नागपूरला आलो तेव्हा वाचनाची दिशा नुकतीच सापडलेली होती. मुक्तिबोध, कवी अनिल, ग्रेस, यशवंत मनोहर, वि. भि. कोलते आणि हे सर्व कमी की काय म्हणून महेश एलकुंचवार, भास्कर लक्ष्मण भोळे, आशा बगे हेही नागपूरचे हे कळल्यावर नागपूर आपले वाटू लागले. याच कॅम्पच्या काळात दीक्षाभूमी आणि संघाचे मुख्यालय पाहिले आणि या गावाची वैचारिक सर्वसमावेशकता कळली... भिडली. नागपूर पत्रिका या दैनिकात मी वार्ताहर म्हणून रीतसर रुजू झालो आणि जे नागपूरकर झालो ते झालोच. त्याला आता ३३ वर्षे उलटून गेली. ही ३३ आणि आधीची जाऊन-येऊन असलेली १० अशा तब्बल चारपेक्षा जास्त दशकांचे भावनिक घट्ट नाते माझे या शहराशी आहे.

रिपोर्टिंगच्या काळात मानव मंदिर या संस्थेच्या निमित्ताने गिरीश गांधी आणि अनंत घारड यांच्यामुळे मला नागपूरच्या अंतर्मनाचा वेध घेता आला, त्यामुळे तर नागपूर या शहराची नस-न्-नस मला ठाऊक झाली. भंडारा रोड नाका ते वाडी नाका आणि वर्धा रोड नाका ते कामठी रोड नाका असे या शहरात गल्ली-न्-गल्ली, बोळ-न्-बोळ या काळात फिरायला मिळाले आणि नागपूरची माणसे जवळून बघता आली, अनुभवता आली. नागपूरची वृत्ती तसेच



संस्कृती कळली. मी जन्मलेल्या आणि वाढलेल्या भागाचा इतिहास राज्यकर्त्यांच्या क्रूरतेचा होता, लढायांचा होता, त्याला धार्मिक तसेच जातीयतेची काळीकुट्ट किनार होती आणि बहुसंख्य लोकांच्या पाचवीला अभावग्रस्तता पूजलेली होती. आमच्या पिढीच्या वर्तमानावरही त्या सर्वांचे गडद सावट होते. नागपूर मात्र तसे नव्हते. नागपूरला जातीय आणि धार्मिक तणावांचा इतिहास नव्हता. जातीय कट-कपट ही नागपूरची वृत्ती नाही... तसा इतिहास नाही, संस्कृतीही नाही. तेव्हा जसे नागपूर शहर निष्कपट होते तस्सेच आजही आहे. एकाच वेळी टेकडीवरचे गणपती मंदिर, ताजुद्दीनबाबांचा दर्गा आणि दीक्षाभूमी (अशात त्यात कामठी रोडवरच्या वीरसेन टेम्पलची भर पडली आहे) या शहराची श्रद्धास्थाने म्हणून सांगितली जातात. या शहरात सर्व जाती-धर्माचे, वेगवेगळ्या प्रांतातले लोक त्यांची भाषा घेऊन गुण्या गोविंदाने नांदत होते आणि आजही नांदत आहेत.

नागपूर शहराचे आणखी एक वैशिष्ट्य त्याच काळात कळले, ते रिझर्व्ह बँकेच्या एका प्रसिद्धिपत्रकामुळे. नागपूर शहराच्या बँकेमार्फत होणाऱ्या व्यवहाराकरिता क्लिअरिंग एजंट म्हणून ही बँक काम करते आणि दर महिन्याची नागपूर शहराची उलढाल किती याची माहिती प्रसिद्धीस देते. १९८१ साली नागपूर शहराची मासिक नोंदणीकृत उलाढाल (चेक-ड्राफ्ट क्लिअरन्स) सुमारे १४०० कोटी रुपये होती. एक रुपया बँकेमार्फत खर्च झाला तर त्याचवेळी बाजारात चार रुपये रोखीने खर्च झालेले असतात हेही तेव्हा कळले. त्याचा अर्थ तेव्हा नागपूरची आर्थिक उलाढाल दरमहा सुमारे ६ हजार कोटी रुपयांची होती. मार्च २००३ मध्ये नागपूरची नोंदणीकृत उलाढाल चार हजार कोटी रुपयांवर पोहोचली म्हणजे एकूण उलाढाल सुमारे २५ हजार कोटी रुपयांची. आता त्यात किमान चौपट वाढ झाली असावी असा अंदाज आहे! यावरून नागपूर मार्केटच्या सुबत्तेचा अंदाज यावा. सिमेंट, स्टील, लाकूड, कापूस, मिरची यांची देशातील मोठी बाजारपेठ नागपूर आहे. सर्वांत मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूरला आहे. मोठ्या औद्योगिक विकासात जरी मागे पडले तरी नागपूर मार्केटचे महत्त्व अधोरेखित करणारी ही बाब आहे. ग्रेट नाग रोड, बगडगंज, एमआयडीसी हिंगणा, अशा वेगवेगळ्या भागात छोट्या-मध्यम कुटीर उद्योगाचे जाळे पसरलेले होते. सेंट्रल अव्हेन्यूच्या दोन्ही बाजूला अनेक भागांत हातमागाच्या उद्योगाला बहर आलेला होता. या भागांत दिवस-रात्र मागाचे आवाज ऐकू येत असत. आधी यांत्रिकीकरण आणि नंतर जागतिक उदारीकरणाचा फटका बसल्याने यापैकी बहुतेक उद्योग बंद पडले आहेत. यापैकी अनेक उद्योजकांनी काळाची पावले ओळखून नवे उद्योग सुरू केले आहेत. छिन्नी-हातोड्याच्या जागी की-बोर्ड आले आहेत. नागपूर शहर एका रेल्वेलाइनने विभागले आहे. पुलापलीकडचा आणि पुलाअलीकडचा असा आजही त्याचा उल्लेख होतो. पुलापलीकडचे नागपूर जुने तर अलीकडचे नवे. पलीकडे तेव्हा एम्प्रेस ही कापड तयार करण्याची मोठ्ठी मिल होती. पुलापलीकडच्या नागपूरचा दिवस या मिलच्या भोंग्याने सुरू व्हायचा आणि मावळायचा. हातमाग आणि ही मिल यावर अवलंबून असणाऱ्या कामगारांच्या हितासाठी मोठी चळवळ या भागातून उभी राहिली, देशभर पसरली आणि या कामगार चळवळीचे नेते राष्ट्रीय झाले. रामभाऊ रुईकर, जनरल आवारी, दत्तोपंत ठेंगडी, वसंत साठे, ए. बी. बर्धन अशी काही त्यातील नावे. आता ती मिल बंद पडली आहे आणि मोठा मॉल तसेच घरे त्या परिसरात आता उभी राहात असतानाच नागपूरच्या या भागाने सिमेंटचे लेणे ल्यायले आहे आणि स्वत:चे रूपच बदलवून टाकले आहे. अलीकडच्या चार दशकांतला नागपूर शहरातला हा खूप मोठा बदल आहे.

**अविश्वसनीय बदल**

सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक अशा विविध पातळ्यांवर नागपूर गेल्या चार दशकांत सहज विश्वास न बसावा इतके बदलले. नागपूर शहराने जणू या काळात कातच टाकली आहे! १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या मैदानावर लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची शपथ घेतली त्या जागेवर सांची येथील स्तुपाप्रमाणे एक मोठा स्तूप उभारला गेला असून, हे स्थान आता संपूर्ण देशाचे श्रद्धास्थान बनले आहे. राज्य सरकारकडून घसघशीत अर्थसाहाय्य आणि लोकवर्गणी या माध्यमातून त्या संपूर्ण परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. 'दीक्षाभूमी' या नावाने हा परिसर ओळखला जातो आणि या वास्तूने शहराच्या देखणेपणात भर टाकली आहे. दसरा हा दिवस हिंदू धर्मीय हिंदू शास्त्राप्रमाणे साजरा करतात, तर धम्म चक्र प्रवर्तनानंतर बौद्ध धर्मीयांनी हाच दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून



**सीताबर्डी ते लोहापूल रस्ता**



**शुक्रवार तलावाचे विहंगम दृश्य**



**व्हिक्टोरीया टेक्निकल इन्स्टिट्यूट**



**कॉटन मार्केट**



**नागपुरातील पहिली रेल्वेगाडी**




साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. याच दिवशी नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी महोत्सव होतो. संघाच्या मिरवणुकीला बौद्ध धम्मीय वाट करून देतात तर दीक्षाभूमीवर आलेल्या लाखो बौद्ध भाविकांना नागरी सुविधा देण्यात नागपुरातले सर्व धर्मीय पुढाकार घेतात. विजयादशमी आणि प्रवर्तन दिन या दोन्ही कार्यक्रमांना प्रचंड गर्दी होते; पण, या शहराचे सौख्य आजवर कधीही बिघडले नाही, बिघडणारही नाही.

**बावनकशी पिढी**


कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे, अ. ना. देशपांडे, पु. य. देशपांडे, शरदचंद्र मुक्तिबोध, पु. भा. भावे, वि. भि. कोलते, ग. त्र्यं. माडखोलकर, वि. वा. मिराशी, वामन कृष्ण चोरघडे अशा एक ना अनेक नागपूरकर साहित्यिकांनी मराठी साहित्य, समीक्षा आणि संशोधन क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा सर्वांत पहिला आवाज ग. त्र्यं. माडखोलकर यांनीच बेळगावच्या साहित्य संमेलनात उठवला आणि त्या मागणीच्या पूर्ततेसाठी मग एक महाचळवळ उभी राहिली. कालगती कधीच थांबत नाही आणि मरण कोणालाच चुकत नाही असे जे म्हटले जाते त्याप्रमाणे बावनकशी साहित्यिकांची ही पिढी काळाच्या पडद्याआड गेली आणि पुढची पिढी उदयाला आली. सुरेश भट आणि ग्रेस यांनी कवितेच्या प्रांतात नवे मापदंड प्रस्थापित केले तर यशवंत मनोहर यांनी नवी वेदना अभिव्यक्त करत मराठी कवितेला बदलणे भाग पाडले. महेश एलकुंचवार यांच्या प्रतिभाशाली नाट्यलेखनाने केवळ मराठीच नाही, तर भारतीय नाट्य क्षेत्रावर मुद्रा उमटवली, त्यांच्या नाट्य लेखनाची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली. एलकुंचवार यांच्या ललित लेखनाने मराठी ललित लेखनाला एक वेगळी घनगर्द आणि डौलदार वाट दाखवली. राम शेवाळकर यांच्या वक्तृत्वाने जागतिक मराठी मन वेडावले आणि भास्कर लक्ष्मण भोळे यांच्या परखड तसेच नवविचाराने राज्याच्या पुरोगामित्वाला दिशा दिली. आशा बगे आणि सुरेश द्वादशीवार यांच्या आभिजात लेखनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या कथा-कादंबऱ्यांनी मराठी साहित्य जगताला मोहिनी घातली. मारुती चितमपल्ली यांनी वनातल्या जीवनाचे एक वेगळे दालन मराठी साहित्य जगतात उघडले. सुधाकर गायधनी, श्रीपाद भालचंद्र जोशी, वसंत वाहोकर, प्रफुल्ल शिलेदार, रवींद्र शोभणे, लोकनाथ यशवंत ही नवीन दमाची मंडळीही त्या साहित्य यात्रेत सहभागी झाली आहेत. डॉ. विनय वाईकर यांनी आईना-ए-गझल हा वेगळा शब्दकोश याच कालखंडात डॉ. जरीना सानी यांच्या सहकार्याने सिद्ध केला. उर्दू शब्दांचा मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तीन भाषांत अर्थ विशद करणारा हा शब्दकोश वैशिष्ट्यपूर्ण न ठरला असता तरच नवल होते. नागपूरच्या साहित्य-कला-संस्कृती क्षेत्रातील एक महत्त्वाचे स्थित्यंतर म्हणजे सांस्कृतिक चळवळीचे केंद्र झाशी राणी चौकातून म्हणजे विदर्भ साहित्य संघाकडून आता शंकर नगर चौकात म्हणजे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानकडे म्हणजेच गिरीश गांधी यांच्याकडे आले आहे. संस्थात्मक चारित्र्याचा आदर्शच चव्हाण प्रतिष्ठान आणि त्यांच्या मानव मंदिर यासारख्या सहयोगी संस्थांनी निर्माण केला आहे. सायंटिफीक सभागृह, साई सभागृह, विनोबा विचार केंद्र अशी पर्यायी स्थाने जमीनदोस्त झालेल्या धनवटे रंगमंदिराला उभी राहिली आहेत.

डॉ. सीमा साखरे आणि डॉ. रूपा कुळकर्णी यांनी स्त्रियांच्या प्रश्नाबाबत याच काळात बजावलेली भूमिका मोलाची आहे. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांना सीमाताई साखरे यांनी वाचा फोडण्याचे काम गेली सलग पन्नास वर्षे केले आहे. त्यांच्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली आहे. मोलकरणीसारख्या दुय्यम समजल्या जाणाऱ्या स्त्रीला आत्मसन्मान आणि स्वआर्थिकबळावर उभे करण्यासाठी रूपाताई कुळकर्णी यांनी चाळीस वर्षांपूर्वी सर्वांत प्रथम आवाज उठवला तेव्हा मोलकरीण स्त्री आहे याची जाणीव समाजाला झाली. वेश्यांची बेवारस मुले आणि दगडांच्या खाणीत काम करणाऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले करण्याचे राम इंगोले यांचे जगावेगळे कामही याच कालखंडात उभे राहिले. मृत्यूच्या वाटेवर आणि बेसहारा असणाऱ्यांच्या सेवेचे व्रत जिमी राणा यांच्या प्रेरणेने उभे राहिलेले 'स्नेहांचल' हे स्वबळावरचे कामही याच काळातले, नंतर त्यात अनेकांनी बिनबोभाट वाटा उचलला. सीमाताई साखरे, रूपाताई कुळकर्णी, राम इंगोले यांच्या कामाने इतर अनेकांना त्या वाटेवर चालण्याची प्रेरणा दिली. उमेश चौबे म्हणजे नागपूरचे प्रहरी असे समीकरणच या काळात निर्माण झाले इतके सामाजिक लढे अन्यायाविरुद्ध उमेश चौबे यांनी या काळात उभारले आहेत.

नागपूरच्या राजकीय स्तरावरही खूप मोठी उलथापालथ या चार-साडेचार दशकांत झाली. शेषराव वानखेडे, भगवंतराव गायकवाड, नरेंद्र तिडके, जांबुवंतराव धोटे, वसंतराव साठे, नासिकराव तिरपुडे, शंकरराव गेडाम, श्री. वा. धाबे, दत्ता मेघे, बनवारीलाल पुरोहित, सुमतीताई सुकळीकर, बाबासाहेब केदार यांची जागा नितीन गडकरी, रणजीत देशमुख, विलास मुत्तेमवार, विजय दर्डा, नितीन राऊत, सतीश चतुर्वेदी, सुलेखा कुंभारे यांनी घेतली. आता तर त्यानंतरच्या पिढीतील देवेंद्र फडणवीस, राजेंद्र मुळक, सुनील केदार, सागर मेघे, अनिल सोले, संदीप जोशी, आशिष रणजीत देशमुख, सलील अनिल देशमुख, प्रकाश गजभिये ही तरुण मंडळी राजकारणाच्या पटावर चमकू लागली आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे नागपूरवरचा काँग्रेसचा एकछत्री प्रभाव या काळात संपुष्टात आला आणि भारतीय जनता पक्षाने ती जागा बळकावली. ए. बी. बर्धन आणि नितीन गडकरी या दोघांनी राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या पक्षातले सर्वोच्च स्थान संपादन केले हेही या शहराचे भारतीय राजकारणातले एक योगदान आहे. मुकुल वासनिक, अविनाश पांडे, अनीस अहमद हेही राजकीय नेते त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवर मुद्रा उमटवण्यात यशस्वी झाले. 'राजकीय राडे' ही नागपूरची संस्कृती महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यापूर्वी नव्हती आणि नंतरही राजकीय वातावरण सौख्याचेच राहिले, राजकीय राडे किंवा हिंसा अपवाद म्हणूनही घडल्या नाहीत. राजकीय मतभेद नक्कीच आहेत; पण, मनभेद नाहीत ही वस्तुस्थिती ठळकपणे नोंदवायलाच हवी.

**राष्ट्रीय शिक्षक केंद्र**

अलीकडच्या पंचवीस-तीस वर्षांत नागपूर शहरात एक महत्त्वाचा बदल शैक्षणिक क्षेत्रात झाला आहे तो खाजगी आणि विनाअनुदानाचे धोरण आल्यावर. एक शैक्षणिक केंद्र म्हणून नागपूरने महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. अभियांत्रिकी, वैद्यक, औषधशास्त्र, वास्तुरचना, व्यवस्थापन, माहिती आणि तंत्रज्ञान अशा विविध शाखातील उच्च दर्जाचे शिक्षण देणाऱ्या संस्था अलीकडच्या २५/३० वर्षांत सुरू झाल्या आहेत. नागपूर शहरात आजमितीला २७ अभियांत्रिकी, १३ वैद्यक तर व्यवस्थापन शास्त्राचे शिक्षण देणारी १७ महाविद्यालये आहेत! यापैकी अनेक शिक्षण संस्थांचा दर्जाच्या बाबतीत राष्ट्रीय पातळीवर दबदबा निर्माण झालेला आहे. हे शिक्षण घेण्यासाठी देशाच्या विविध भागातून अक्षरश: हजारो विद्यार्थी





नागपूरचा उड्डाणपूल





रिझर्व्ह बँक चौक



रिझर्व्ह बँक



फुटाळा तलाव



जामठा स्टेडियम

नागपुरात आले आहेत. नागपूरचा कॉस्मोपोलोटीन चेहेरा अधिक देखणा होण्यात त्यामुळे भरच पडली आहे. नागपूरची आर्थिक वीण बळकट करण्यात या शिक्षण क्षेत्राचा मोठा हातभार लागला आहे आणि नागपूरच्या विस्तारात भर पडली आहे. याच काळात माती आणि कापूस संशोधनाच्या क्षेत्रात मूलभूत काम करणाऱ्या संस्था नागपुरात सुरू झाल्या. रिमोट सेन्सिंग, ॲल्युमिनियम वापर सारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरच्या संशोधन संस्थांनी नागपूरच्या शैक्षणिक दबदब्यात भरच घातली आहे.

नागपूर औद्योगिक विकासात काहीसे मागे पडले हे खरे पण त्याचे कारण राजकीय नेतृत्व त्याबाबत जितके आग्रही असायला हवे तेवढे नव्हते आणि नागपूरचे स्वरूप व्यावसायिक बाजारपेठ असणे हे होते हेही तेवढेच खरे. जमीन, पाणी आणि मनुष्यबळ उपलब्ध असल्याने औद्योगिक विकासाला अनुकूल वातावरण होते तरी विकासाच्या तळमळीपेक्षा काही आततायी राजकीय नेत्यांच्या अनाठायी आंदोलक वृत्तीमुळे उद्योजक नागपुरात येण्यास उत्सुक नसतात ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. याच वातावरणाचा फटका मिहानसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या उभारणीला बसला आहे. डीसीएल तसेच इंडोरामा, नेको, विको यासारखे काही उद्योग ८० च्या दशकात सुरू झाले; पण, बुटीबोरीची पंचतारांकित औद्योगिक वसाहत यासारखे प्रकल्प या वातावरणाचा फटका बसल्याने यापैकी काही उद्योग बंद झाले आणि नागपूरबाबत चुकीचा संदेश गेला.

अनुकूलता असूनही संत्रा किंवा कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू होऊ शकले नाहीत. नागपुरात आय टी पार्क सुरू झाल्यावर प्रारंभी प्रतिसाद कमी होता; पण, आता या क्षेत्रात खाजगी माध्यमातून वेगाने विस्तार सुरू झाला आहे. मिहान आणि कार्गोहब हे नागपूरचे स्वप्न आहे. आताच्या नागपूरच्यालगत हे प्रकल्प आणि त्यासाठी आवश्यक असणारे गृहनिर्माण प्रकल्प उभे राहात आहेत म्हणजे नागपूरचा आणखी मोठ्ठा विस्तार होणार आहे. मिहानमध्ये अनेक नामांकित उद्योगांनी जागा घेतल्या आहेत. महिंद्रा टेक, एचसीएल, विप्रो, डीएलएफ, अंबुजा, कोलंड, विपुल आणि करमचंद रियालिटीज, एल ॲण्ड टी, टाटा इन्फ्रास्ट्रक्चर आणि कन्सल्टन्सी, इस्पात, ताज एअर कॅटरिंग, बोईंग, ड्यूक्स अशा अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्यातनाम असलेल्या उद्योगांनी मिहानमध्ये जमीन घेतली आहे. अलीकडच्या काळात नागपूरचा लौकिक वैद्यक सेवेच्या क्षेत्रातही चांगलाच नावारूपाला आला आहे. वैद्यक उपचाराच्या जवळ-जवळ सर्व शाखातील कौशल्य नागपुरात उपलब्ध झाले आहे आणि तेही तुलनेने कमी खर्चात. भारतात वैद्यक पर्यटनाला भरपूर वाव आहे हे लक्षात घेऊन मिहानमध्ये १७ सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल्ससाठी जागा राखून ठेवण्यात आली आहे. एकंदरीतच मोठी गुंतवणूक येण्याची ही सुरुवात असून, आता गरज आहे ती उद्योजकांना दिलासा देऊन आश्वस्त करण्याची. मिहानचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र यायला हवे. असे घडले तर आंतरराष्ट्रीय नकाशावर नागपूरचे नाव तर येईलच; पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे हजारो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार नागपुरात उपलब्ध होतील. मिहान आणि कार्गोहबमुळे नागपूर सर्वार्थाने ग्लोबल औद्योगिक शहर म्हणून नावारूपाला येईल यात शंकाच नाही.

हॉकी, क्रिकेट, फुटबॉल या क्रीडा प्रकारात नागपूरचे नाव फार नाही तरीही बऱ्यापैकी दबदबा ठेवून होते. प्रख्यात क्रिकेटपटू सी. के. नायडू नागपूरचेच. त्यांचा पुतळाही नागपूरला विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या स्टेडियमच्या परिसरात आहे. नागपूरला रणजी स्पर्धेत स्वतंत्र दर्जा आहे. याआधी प्रशांत वैद्य आंतरराष्ट्रीय स्तरावर छोटीशी इनिंग खेळला. आता उमेश यादव हा चमकत असून, तो मोठी इनिंग खेळण्याच्या तयारीत आहे. क्रिकेटच्या क्षेत्रात देशातील सर्वोच्च असणाऱ्या बीसीसीआयचे अध्यक्षपद नागपूरकर शशांक मनोहर यांनी भूषविले आहे. क्रिकेटमधला एक महत्त्वाचा आणि प्रसिद्धीविना राहिलेला उपक्रम म्हणजे आंतरराष्ट्रीय क्रिकेट अकादमी नागपूरला सुरू झाली आहे. अरुंधती पानतावणे आणि मल्लिका भांडारकर, शार्वील नवघरे, प्रियांका खेडकर ही नावेही विविध खेळात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तळपू लागली आहेत. क्रीडा क्षेत्रातही करीअर करता येऊ शकते अशी मानसिकता अरुंधती पानतावणे, मल्लिका भांडारकर आणि उमेश यादव यांच्यामुळे नागपुरात




रुळली हे महत्त्वाचे. त्याचा प्रत्यय सकाळ आणि संध्याकाळी वेगवेगळ्या क्रीडांगणावर चक्कर टाकली तर येतो.

**लुब्ध करणारे बाह्यरूप**

नागपूरचे बाह्यरूप नेहेमीच लुब्ध करणारे राहिले आहे. नागपूरची गडद हिरवाई, प्रशस्त रस्ते, देखण्या वास्तुरचनेचा आविष्कार असणाऱ्या अनेक इमारती, तलाव, मंदिरे, सदर भागातील जुनी आणि विस्तीर्ण चर्चेस असे नागपूरचे रुपडे. १९७१ मध्ये प्रथम पाहिले त्यापेक्षा हे रूप सध्या आणखी गोजरे झालेले आहे. या शहराचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे नागरीकरणाच्या लाटेतही या शहराचा विस्तार उभा नाही तर आडवा झाला. त्यामुळे नागपूर उंच होण्यापेक्षा हात-पाय पसरत राहिले आणि अवाढव्य विस्तारतच आहे. आज या शहराचा विस्तार सुमारे ३०० चौरस किलोमीटर एवढा विस्तीर्ण आहे. इतर शहरांच्या तुलनेत भूखंड बळकाव आणि अतिक्रमण ही वृत्ती या शहरात कमी आहे; कारण, जागा भरपूर उपलब्ध आहे हेच असावे. ते काही असो, त्यामुळे नागपूरच्या बाह्यरूपाने नागपूरकर असलेले आणि नसलेले अशा सर्वांनाच कायम भुरळ घातली. सीताबर्डी ते महाराजबाग रस्त्यावरील अतिक्रमण पाडण्याची सुरुवात करून तत्कालीन पालक मंत्री रणजीत देशमुख यांनी नव्वदीच्या दशकात या नव्या नागपूरची मुहूर्तमेढ केली, नंतर पालकमंत्री असलेल्या नितीन गडकरी यांनी त्या योजनेला मूर्त रूप देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी वैयक्तिक लक्ष घालून निधी उपलब्ध करून दिला; सनदी अधिकारी चंद्रशेखर यांनी कठोरपणे त्या योजनेची अंमलबजावणी केली. यात महत्त्वाचे म्हणजे नागपूरच्या सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनी मतांचा विचार न करता अंमलबजावणीला साथ दिली हेही आवर्जून नमूद करायला हवे. या नवीन रूपाचे सर्व श्रेय चंद्रशेखर यांना एकट्याला असा समज पसरवला गेला असल्याने हा खुलासा करणे आवश्यक आहे. एकटा अधिकारी स्वबळावर काहीच करू शकत नाही त्यासाठी सरकार आणि लोकप्रतिनिधींच्या व्यापक पाठिंब्याची गरज असते तेव्हाच काम उभे राहते हे विसरता काम नये.

**रंजक रस्ते**

नागपूरच्या रस्त्यांची जन्मकथा मनोरंजक आहे. नागपूरच्या रस्त्यांचे नियोजन करणारा १८४३ मधला एक नकाशा आजही उपलब्ध आहे; पण, या रस्त्यांचे जनक आहेत सर रिचर्ड टेम्पल. नागपूर इंग्रजांच्या ताब्यात गेल्यावर नागपूरचे पहिले आयुक्त म्हणून टेम्पल यांची नियुक्ती झाली. (इंग्रजांच्या ताब्यात जाण्याआधी नागपूरवर भोसले यांचे राज्य होते आणि त्याहीआधी नागपूर ही गोंड राजाची राजधानी होती. गोंड राजा बख्त बुलंद शहा याने १७०२ साली नाग नदीच्या तीरावर नागपूर शहराची स्थापना केली. या गोंड राजाचा पुतळा नुकताच नागपूरच्या विधान भवनासमोर उभारण्यात आला आहे. असे असले तरी नागपूरचा उल्लेख वर्धा जिल्ह्यातील देवळी या गावी सापडलेल्या १० व्या शतकातील एका ताम्रपटावर आढळला आहे.) टेम्पल हे नागपूरचे पहिले नागरी अधिकारी, तोपर्यंत लष्करी अधिकारी इंग्रजांच्या वतीने नागपूरचा कारभार पाहात असत. टेम्पल यांनी १८६२ मध्ये नागपूर शहराच्या रस्त्यासाठी धोरण आखले. तोपर्यंत नागपूरला रीतसर रस्ते नव्हते. त्या काळात इंग्रज अधिकारी सिव्हिल लाइन भागात राहत म्हणून सर्व प्रथम त्या भागात रस्ते बांधण्यात आले. मग, रस्त्यांचे हे जाळे टेम्पल यांनीच विस्तारले. १८६२ साली अमेरिकेत युद्ध पेटले आणि इंग्लंडमधील कापड मिल्सना कापूस मिळणे बंद झाले तेव्हा याच रस्त्यामुळे विदर्भातील कापूस रेल्वेद्वारे इंग्लंडला पोहोचला! विदर्भात डॉलर्समध्ये रोख आली ती त्या काळात आणि नागपूरची सुबत्ता आणखी वाढली, असा हा इतिहास आहे. सिव्हिल लाइन्स भागातील तेलंगखेडी ते झीरो माईल या रस्त्याला टेम्पल यांचे दिलेले नाव आजही कायम आहे.

या शहराच्या स्थापनेला २००२ मध्ये ३०० वर्षे झाली, त्याची स्मृती म्हणून या शहरातील जाणत्यांनी नागभूषण सन्मान सुरू करण्याचा उमदेपणा दाखवला. गोंड राजाची राजधानी, त्यानंतर मध्य प्रांताची राजधानी आणि आता महाराष्ट्राची उपराजधानी असा नागपूर शहराचा या ३०० वर्षांतला प्रवास आहे. राजधानी ते उपराजधानी असा प्रवास करणारे नागपूर हे कदाचित एकमेव शहर असावे. संयुक्त महाराष्ट्रात सहभागी झाल्यावर या शहराच्या नागरीकरणाला मोठा वेग आला. दळणवळणाची साधने वाढली आणि ती कमी पडत गेली म्हणून आणखी वाढतच गेली त्यामुळे गर्दी वाढली. गर्दी वाढली म्हणून बाजारपेठ वाढली, चारही दिशांनी शहर वाढले, बिल्डर्स वाढले, त्यांनी बांधलेली घरे घेणाऱ्यांची संख्या वाढली. सर्व जाती-धर्मांच्या लोकांचे लोंढे या शहरात आले आणि या शहराने या सर्वांना ममतेने सामावून घेताना कोणताही प्रादेशिक किंवा भाषावाद घातला नाही. नागपूरची संस्कृतीच सर्वसमावेशकतेची आहे. हे शहर विस्तारले, नागरी सोयी सुविधांवर कमी अधिक प्रमाणात ताण पडला, या सोयी सुविधांत गरजेप्रमाणे कमी-अधिक वाढ झाली. गल्लोगल्ली हॉटेल्स-बार सुरू झाले, ब्रांडेड दुकानांच्या पाट्या झळकू लागल्या. ही दुकाने, हॉटेल्स आणि बारमधील गर्दी सरता सरत नाही असे चित्र एकीकडे तर दुसरीकडे दैनंदिन जगण्यात अभावग्रस्तता असण्याची, ती अभावग्रस्तता चेहेऱ्यावर स्पष्ट दिसणाऱ्यांचीही संख्या वाढली. नवे स्वीकारावे आणि जुने जपून ठेवावे ही वृत्ती या शहराची आहे. या नवेपणाच्या म्हणा की गरजेपोटी म्हणा मिहानसारख्या प्रकल्पाची आस या शहराला आहे, आणखी विकासाची आशा आहे. जुनेपण जपून ठेवण्याच्या वृत्तीतून या शहराने खाद्य संस्कृती जपली; सावजी खाद्याची चव आणि अभिमान आजही कायम आहे, पै-पाहुणा आला की वडा-भात, गोळा-भात, पुरणपोळीचा बेत आजही होतो, त्यातले अगत्य कायम असते. म्हणूनच अती उष्ण, अती थंडी आणि भरपूर पाऊस असणाऱ्या नागपूरची ओढ कायम असते. अन्य कोणत्या गावी किंवा राज्यात किंवा देशात जरी गेलं की तीन-चार दिवसांतच नागपूरला परतण्याची ओढ लागते आणि नकळत साद घातली जाते, ओऽऽऽ नागपूर.

(हा मजकूर म्हणजे इतिहास लेखन नाही. गेल्या ३५-४० वर्षांत नागपुरात घडलेल्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक बदलाचे एका पत्रकाराच्या नजरेतून केलेले समालोचन आहे. या लेखात व्यक्त केलेली मते पूर्णपणे लेखकाची आहेत. या मजकुरात पत्रकारितेचा उल्लेख नाही. कारण, लोकराज्यच्या डिसेंबर २०११ च्या अंकात प्रस्तुत लेखकाचा एक लेख प्रकाशित झालेला आहे. जिज्ञासूंनी तो लेख वाचावा.)

**(संदर्भ साहाय्य : विवेक रानडे, सुरेश भुसारी, राम भाकरे)**

**संपर्क : ९८२२०५५७९९**





# कालिदासाच्या भूमीत



अनिल ठाकरे

विदर्भाचं वनवैभव पाहायला कोणाला आवडत नाही. महाराष्ट्रातील चार व्याघ्र प्रकल्पांपैकी तीन तर विदर्भातच आहेत. महाराष्ट्र व मध्य प्रदेशच्या सीमेवर असलेलं पेंच राष्ट्रीय उद्यान पर्यटकांसाठी पर्वणीच म्हणावं लागेल.

जैविक विविधतेनं नटलेलं पेंच राष्ट्रीय उद्यान नागपूर-जबलपूर मार्गावर ८० किलोमीटर अंतरावर आहे. नागपूर खापा सालेघाट हा दुसरा मार्ग आहे. सालेघाटपासून पेंच राष्ट्रीय उद्यानाची हद्द सुरू होते. पेंच नदीवर तोतलाडोह धरण आहे. या धरणाचे पाणी ७७ किलोमीटर परिसरात पसरले असून, येथे वीज निर्मिती करण्यात येते. धरणातील पाणी जलविद्युत केंद्रात आणण्यासाठी आठ किलोमीटरचा भुयारी बोगदा आहे. जलविद्युत प्रकल्पातून वीजनिर्मिती करण्यात येते. महाराष्ट्र व मध्य प्रदेश शासनातर्फे हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. धरणातील पाण्याच्या मध्यभागापासून मध्य प्रदेशची हद्द सुरू होते. कधलाईजवळ परसपानीपर्यंत महाराष्ट्राची हद्द आहे. धरण परिसरातील सातपुडा पर्वताचा एक हजार किलोमीटर भाग घनदाट जंगलाने व्याप्त आहे. सातपुड्याच्या काही टेकड्या धरणात अर्धवट बुडालेल्या आहेत. त्यांची सुंदर बेटे पाण्यात तयार झाली आहेत. सातपुड्याचा संपूर्ण भाग वन्यप्राण्यांचे निवासस्थान बनले आहे. विविध जातींच्या वन्यप्राण्यांचा वावर येथे आहे. त्यांच्या संरक्षणासाठी तोतलाडोह परिसरातील २५८ चौरस किलोमीटर जंगल १ ऑक्टोबर १९९० मध्ये राष्ट्रीय उद्यान म्हणून जाहीर करण्यात आले. पेंचला १९९० मध्ये भारतातील २५ वा व्याघ्र प्रकल्प म्हणून जाहीर करण्यात आला.हा व्याघ्रप्रकल्प पर्यटकांच्या आवडीचे ठिकाण. येथे स्वत:च्या वाहनाने सफारी करता येत असल्यामुळे पर्यटकांसाठी ती आनंदाची बाब आहे. अलीकडेच राज्य सरकारने आता निसर्ग पर्यटनाची संकल्पना मांडली आहे. त्यासाठी पेंच व्याघ्रप्रकल्पातील एका गावाचीसुद्धा निवड झाली आहे.



पेंच नदीच्या पात्राने पश्चिम आणि पूर्व अशा दोन भागांत या राष्ट्रीय उद्यानाचे विभाजन झाले. पश्चिमेला घुगुसगड नावाचा किल्ला आहे. येथील काही जुने अवशेष नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात ठेवले आहेत. पिंपरिया येथे वनक्षेत्रपालाचे कार्यालय आहे. सिल्लारी येथे गोंड आदिवासींची वस्ती आहे.

वनविभागाने स्थानिक लोकांना रोजगार मिळावा, हा उद्देश समोर ठेवून पर्यटकांना जंगलभ्रमंतीसाठी गाईडची सोय केली आहे. वन्यप्राणी निरीक्षणासाठी सकाळी ६ ते ८ आणि सायंकाळी ४ ते ६ ही वेळ उत्तम आहे. या काळात जंगलातील लहान-मोठ्या पाणवठ्यांवर वन्यप्राण्यांचे दर्शन घडते. सिल्लारी प्रवेशद्वारातून पुढे निघालेला गुळगुळीत रस्ता तोतलाडोह वीज निर्मिती प्रकल्पापर्यंत जातो. रस्त्याच्या दोन्ही बाजूने पर्यटनासाठी राष्ट्रीय उद्यानात घाटपेंड्री, राणीडोह, किरंगीसारा, कोलीतमारा, सावेघाट, अंबाखोरी, हत्तीगोटा, लामणडोह आणि सेडलडॅम ही ठिकाणे आहेत. जंगलात फिरण्यासाठी कच्चे रस्ते बांधण्यात आले आहेत. रस्त्यावरून चारचाकी वाहनानेही सहज फिरता येते. सिल्लारी येथे पर्यटकांना राहण्यासाठी वनविभागाचे विश्रामगृह, 'इको हट्स' आणि 'एमटीडीसी'चेही रिसोर्ट आहे. 'एमटीडीसी' रिसोर्टतर्फे जंगलभ्रमणासाठी जिप्सीची सोय आहे, तर पाटबंधारे विभागाचे तोतलाडोह व वनविभागाचे विश्रामगृह तसेच कोलीतमारा येथेही वनविभागाचे विश्रामगृह आहे. सायंकाळी सहानंतर राष्ट्रीय उद्यानात पर्यटकांना प्रवेश बंदी आहे.

वाघाच्या प्रजननासाठी उपयुक्त क्षेत्र म्हणूनही हे राष्ट्रीय उद्यान ओळखले जाते. साधारण मार्च ते मे या कालावधीत पर्यटकांना सहज वन्यप्राण्यांचे दर्शन होऊ शकते.




पेंच नदी नागपूरची जीवनरेखा असल्याने नागपूरकरांशी या परिसराचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. कारण, पेंच नदीचे पाणी कन्हान नदीच्या पात्रातून गोरेवाडा जलाशयात येते. तेथून नागपूरकरांना पिण्यासाठी उपलब्ध होते. राष्ट्रीय उद्यानात वाघ, बिबट, धिप्पाड गवा, चितळ, सांभर, नीलगाय, चौसीगा, भेडकी, कोल्हा, लांडगा आणि सरपटणारे ३० विविध प्राणी आहेत. हॉर्न बिल, हिरवे कबुतर यासह १६४ प्रजातींचे पक्षी आणि दुर्मीळ पांढऱ्या छातीचे





**नागपूरपासून ५० किलोमीटर अंतरावर रामटेक हे पौराणिक शहर आहे. या शहरातील रामटेक मंदिर प्रसिद्ध आहे. याशिवाय पुरातन जैन मंदिर तसेच इतर देवालये आहे. रामटेक गडावर कालिदास स्मारक, कालिदासांनी लिहिलेल्या काव्यरचना रेखांकित केल्या आहेत. रामटेक शहर हे जलनगरी म्हणूनही ओळखले जाते. खिंडसी तलाव रामटेकपासून पाच किलोमीटर अंतरावर आहे. डोंगरांनी वेढलेल्या या तलावात बोटिंगची व्यवस्था आहे.**



गिधाड पाहायला मिळते.

याशिवाय मनसर पुरातन संस्कृतीचा ठेवा आहे. तसेच मनसर येथे चंद्रपाल चौकक्षे यांनी रामधाम हे पर्यटन स्थळ विकसित केले आहे. या स्थळाला मध्यप्रदेश, छत्तीसगड व महाराष्ट्रातील पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात; तर नगरधन येथे शैल काळातील किल्ला आहे. याशिवाय नागपूरपासून ५५ किलोमीटर अंतरावर खेकरा नाला हे डोंगरानी वेढलेले आकर्षक पर्यटन स्थळ आहे. येथे



हमखास वाघ बघायला मिळतो. याशिवाय आदासा येथील गणेश मंदिर, धापेवाडा येथील विठोबा मंदिर पर्यटकांची श्रद्धास्थाने आहेत. याशिवाय आंभोरा येथील शिव मंदिर, कोराडी येथील जगदंबा मंदिर, वाकी येथील ताजुद्दीन बाबा दर्गा, टाकळघाट येथील विक्तु बाबा, मकर धोकडा, बल्ल्याची पहाडी झिरी, पारडसिंगा येथील अनसूया माता मंदिर, मन्नाथदेव ही तीर्थस्थळे भाविकांच्या गर्दीने बाराही महिने ओसंडून वाहतात. कामठी येथे ड्रॅगन पॅलेस, नागपुरातील दीक्षाभूमी ताजुद्दीबाबा दर्गा, टेकडीचा गणपती, बॉटनिकल गार्डन, फुटाळा तलाव, अंबाझरी बगिचा, महाराजबाग, नागपुरातील जपानी गार्डन, या स्थळांनाही पर्यटक भेटी देऊ शकतात. मध्य भारतातील एकमेव सीएसी ऑलराऊंडर या साहसी उपक्रम राबवणाऱ्या संस्थेने रामटेकजवळ कर्पूरबावडी येथे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी मोठा ॲडव्हेंचर हब उभारला आहे. त्यामुळे पर्यटकांची प्रचंड गर्दी या ठिकाणी पाहायला मिळते. पॅराग्लायडिंग, पॅरासेलिंग, पॅरामोटर्स, वॉटरस्पोर्ट ह्या ॲक्टिव्हिटीसाठी पूर्वी पर्यटकांना मुंबई, पुण्याकडे धाव घ्यावी लागायची. पण, सीएसी ऑलराऊडरने हे सर्व येथे उपलब्ध करुन दिले आहे. आदासातील अष्टविनायक आणि धापेवाडा हे विदर्भाचे पंढरपूर म्हणून प्रसिध्द आहे. नागपूरवरुन ४० किलोमीटर अंतरावर असलेले आदासा हे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. चार हजार वर्षे जुने असे हे मंदिर असल्यामुळे पर्यटकांची येथे गर्दी असते. हेमाडपंथी धाटणीचे हे मंदिर १२ फुट उंच आणि ७ फुट रुंद आहे. विदर्भाचा अष्टविनायक अशी त्याची ओळख आहे. आदासापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेले धापेवाडा हे तीर्थक्षेत्र विदर्भाचे पंढरपूर म्हणून ओळखले जाते. चंदभागा नदीच्या तीरावर हे मंदिर वसलेले आहे. नागपूरपासून २५ किलोमीटर अंतरावर असलेले मोहगाव झिल्पी म्हणजे शांततेचा एक उत्कृष्ट नमुना. एकीकडे या ठिकाणी मैत्रबन ही ज्येष्ठांना हवी असलेली शांत निवासाची नगरी उभारण्यात आली आहे, तर दुसरीकडे याच मैत्रबनमध्ये ॲडव्हेंचर कँप उभारण्यात आले आहेत. एक, दोन नव्हे तर तब्बल ३०० तंबुंची व्यवस्था इथे शिबिरार्थीसाठी आहे. याठिकाणी पावसाळयात ट्रेकिंग करणे म्हणजे एक वेगळा अनुभव असतो. सीएसीच्यावतीने येथे जवळपास बाराही महिने ॲडव्हेंचर कॅम्प घेतले जातात.

**संपर्क :९४२२८६८७२४**

## कुठे राहाल?

**पर्यटन विकास महामंडळातर्फे नागपूर, पेंच सिल्लारी, खेकरा नाला, खिंडसी, रामटेक येथे पर्यटकांच्या राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. नागपुरात प्रत्येकी दोन खाटांचे आठ कक्ष आहेत. याशिवाय पर्यटन महामंडळाचे प्रादेशिक कार्यालयही येथेच आहे. या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५३३३२५ असा आहे. याशिवाय पेंच सिल्लारी येथे दोन खाटांचे सोळा कक्ष, उपाहारगृह, खुले सभागृह आहे. तसेच सिल्लारी येथे वनखात्याचे कॉटेजेससुद्धा आहेत. खेकरा नाला येथे पर्यटकांसाठी दोन खाटांचे आठ कक्ष, उपाहारगृह, चार लोक निवास आहे. खिंडसी येथे लेकव्ह्यू रिसॉर्ट असून येथे दोन खाटांचे चौदा कक्ष, उपाहारगृह, सभागृह उपलब्ध आहे. आंभोरा येथे महामंडळातर्फे पर्यटक निवास, अठरा कक्ष व चार लोक निवासाचे बांधकाम, तरंगते उपाहारगृह यांचे बांधकाम सुरू आहे.**






# कुमारांसाठी माहितीचा खजिना


डॉ. चारुशीला ओक


आजच्या संगणकाच्या आणि वेगवान संपर्क माध्यमांच्या जगात पुस्तके आणि त्यातही माहितीपूर्ण कोशसाहित्य वाचणे दुर्मीळ झाले आहे. अशा वेळी विशेषत: कुमारवयीन मुलामुलींसाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या कुमार विश्वकोशाच्या जीवसृष्टी आणि पर्यावरण या ग्रंथ मालिकेच्या संकल्पित एकूण तीन भागांपैकी पहिला भाग हाती येत आहे ही मोठीच आनंदाची बाब आहे. मुलांसाठी बालविश्वकोश आणि कुमारविश्वकोश हे संपादित करण्याची योजना १९८० नंतर मंडळाच्या विचाराधीन होती. पुढे कुमार विश्वकोशाचा परिचय ग्रंथ प्रा. मे. पुं. रेगे व प्रा. रा. ग. जाधव यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत इ.स. २००३ मध्ये तयार झाला.


आता जीवसृष्टी आणि पर्यावरण हा सर्व जगाच्या दृष्टीने संवेदना आणि सहवेदनेचा विषय झालेला असल्याने त्या विषयाची कुमार विश्वकोशासाठी अग्रक्रमाने निवड डॉ. विजया वाड- अध्यक्ष मराठी विश्वकोश यांनी केली. इयत्ता ९ वी ते १२ वी या वर्गामध्ये शिकणारी म्हणजे सर्वसाधारणपणे १४ ते १८ या वयोगटातील मुले-मुली हा वाचक वर्ग इथे अभिप्रेत आहे. त्यादृष्टीने यातील नोंदी सुटसुटीत, सोप्या भाषेत आणि वाचकगम्य अशा असाव्या यावर इथे भर देण्यात आलेला आहे.

'जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग १' हा संपूर्ण खंड तयार करण्यास होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे अनमोल सहकार्य विश्वकोश मंडळास लाभले.

होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक आणि विश्वकोश निर्मिती मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. हेमचंद्र प्रधान यांच्या समन्वयाखाली हा ग्रंथ तयार झाला आहे. यातील पर्यावरण विषयक नोंदींच्या समन्वयनासाठी डॉ. जयकुमार मगर यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

याच वेळी, या खंडाचे जे वाचक त्या कुमार वयोगटातील मुलांना यातील काही नोंदी वाचून दाखवाव्यात व त्यावर त्यांचे मत घेऊन मग नोंदी परिपूर्ण कराव्या, अशी सूचना मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. जयंत नारळीकर यांनी सातत्याने केली व त्यानुसार विश्वकोश मंडळाने जळगाव, मुंबई, कोल्हापूर अशा विविध ठिकाणी नोंदीचे वाचन कुमार वयोगटातील मुले-मुली तसेच अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी शिक्षक यांचे समोर केले, त्यांच्या लेखी सूचनांचा अभ्यास करून नोंदीत आवश्यक ते बदल केले. कोश वाङ्मयातील लेखनासाठी अशी दक्षता आणि सावधगिरी बाळगून काम करण्यासाठी हे पाऊल खूप महत्त्वाचे ठरले.

कुमार वाङ्मयासाठी सुयोग्य चित्ररूप माहितीचा उपयोगही या खंडात केलेला आहे. जो मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र या दोन्हींमध्ये मान्य धरलेला आहे.




या खंडातील सर्व मजकूर व रंगीत चित्रवर्णनांचे युनिकोडमध्ये रूपांतर विश्वकोश निर्मिती मंडळाचे सन्माननीय सदस्य व संगणक तज्ज्ञ श्री. माधव शिरवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. यातील चित्रांसाठी प्रशांत मानकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले. यादृष्टीने या खंडातील काही चित्रे खूपच नयनरम्य आणि मनोवेधक आहेत. उदा. अंटार्क्टिकाचे पेंग्विन पक्षी (पृ. ५), भूमीखालील जलसंधारण (पृ.२०), अर्धशिशी डोकेदुखीचे मेंदूचे चित्र (पृ.४५), मश्रुमचे विविध प्रकार (पृ.५७) ॲनाकोंडा (पृ.६०), ऑक्टोपस (पृ.९१) इ. यामुळे पर्यावरण आणि जीवसृष्टी बद्दलची जिज्ञासा, कुतूहल आणि आवड कुमारांमध्ये नक्कीच वाढेल असे म्हणता येईल. कुमारकोशाच्या मुखपृष्ठासाठी इथे एक खास वेगळी पद्धत विजया वाड यांनी स्वीकारली, ती म्हणजे त्यासाठी युवा चित्रकारांची खास स्पर्धा घेऊन, त्यांनी तयार केलेल्या चित्रांमधून, यशश्री कांबळे या जे.जे. स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थिनीच्या चित्राची मुखपृष्ठासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या २४० चित्रांमधून निवड करण्यात आली. या चित्रांच्या कल्पनेत गोल पृथ्वीच्या भोवती जीवसृष्टीत प्रथम निर्माण झालेले जलचर मग भूमीवरील प्राणी, कीटक, वन्य पशू, त्यांच्या सहवासातील माणूस, वने जंगले, पक्षी या सर्वांमुळे निर्माण झालेली जीवसृष्टी आणि पर्यावरणाचे चक्र अशी सूचक आकृती दिसते. हे झाले या खंडाचे बाह्यरूप. याची ओळख झाल्यावर केवळ कुमार वाचकालाच नव्हे, तर कदाचित कुणाही जिज्ञासू वाचकाला या कोशाच्या अंतरंगाची ओळख करून घ्यावीशी वाटेल.

२७३ पृष्ठांच्या या खंडाचा विस्तार कोशवाङ्मयाच्या दृष्टीने काहीसा लहान वाटला तरी 'अंकुर ते ग्लुकोज'पर्यंतच्या २७२ नोंदींचा या खंडात सचित्र समावेश आहे.

यात जीवशास्त्र आणि पर्यावरण यांच्या परिघात येणाऱ्या विविध विषयांच्या नोंदी अकारविल्हे पद्धतीने संमिश्र स्वरूपात केल्याचे आढळून येते. त्यासाठी इंग्रजी व मराठी अनुक्रमणिकाही आहेत. पर्यावरण, वनस्पती (औषधी) प्राणी सृष्टी, पक्षी सृष्टी यानंतर मानवी जीवन आणि पर्यावरणाच्या




संपर्कातून येणारे विषय म्हणजे आहार, आरोग्य, आजार, औषधे, अन्न, कुपोषण, विषबाधा इ. नोंदी माहितीपर आणि रंजक झालेल्या आहेत.

**पर्यावरण विषयासंबंधीच्या नोंदी- अंटार्क्टिका (पृ. ४)**

हे पृथ्वीवरील दक्षिण ध्रुवाभोवतीचे हिमाच्छादित व पर्यावरण प्रदूषणमुक्त खंड आहे. ते जागतिक हवामानाचे नियंत्रक म्हणून ओळखले जाते. येथील हवामान जगातील इतर प्रदेशाच्या तुलनेत सजीवांसाठी अत्यंत प्रतिकूल मानले जाते. त्यामुळे हे कायमस्वरूपी मानवी वस्ती नसलेले एकमेव खंड आहे. या वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीत विविध प्रकारचे सागरी जीव वाढतात. त्यात क्रील, माखली यासारख्या लहान कवचधारी प्राण्यांपासून ते पेंग्विन, सील, व्हेल, अशा मोठ्या सजीवांचा समावेश आहे.

ऊर्जा संसाधने (पृ. ११५) म्हणजे कार्यशक्तीची साधने घरगुती वापरासाठी किंवा औद्योगिक कार्यासाठी ऊर्जेचा वापर आवश्यक असतो. कोळसा, पेट्रोल हा निसर्गाने निर्मिलेला साठा अपुरा पडल्यावर सौरऊर्जा, पवनऊर्जा ही साधने कामी येतात. म्हणून या ऊर्जेचा संयमित उपयोग करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण आणि जीवसृष्टी या दोन्हीशी निगडित असलेल्या वनस्पती विषयक अनेक माहितीपूर्ण नोंदी येथे आहेत. यातून आपण नेहमी पाहिलेल्या वस्तूंबद्दल बरीच वेगळी आणि आश्चर्यकारक माहितीही इथे मिळते.

**कोरफड –** (पृ-२११- सचित्र) लिलिएसी कुलातील वनस्पतीचे शास्त्रीय नाव आहे ॲलोवेरा. हिची हिरवीगार मांसल पाने गुच्छात येतात आणि ते पान काटेरी असते. यातील गर औषधी असतो. अलीकडे चेहऱ्यावर सौंदर्य प्रसाधनासाठी केस धुण्याच्या शांपूमध्ये हे वापरतात. आपल्या रोजच्या परिचयातल्या अनेक वनस्पतीजन्य वस्तूंची औषधी किंवा उपयोगितेची ओळख या खंडातल्या अनेक नोंदींमधून आपल्याला नव्यानेच होते. किशोरवयीन मुलामुलींचे कुतूहल त्या नोंदी वाचून वाढणार आहेच; परंतु, महिलांनाही ते आवडेल आणि उपयोगात आणता येतील असे त्या पदार्थाचे गुण कळतील. अळशीच्या बियांमध्ये ओमेगाड नावाचे मेदाम्ल आणि लिग्नेन नावाचे प्रति ऑक्सिडिकारक असते. हृदयविकार आणि कर्करोग रोखण्यास या बियांचे सेवन उपयुक्त ठरते. वनस्पती जीवनाची ही ओळख किशोरवयीन मुलांमुलींना नक्कीच प्रेरणा देणारी आहे.

निसर्गाने या जीवसृष्टीत इतके विविध नमुन्यांचे प्राणी, पक्षी निर्माण केले आहेत.. त्यांचा अभ्यास करणे हे खूप माहिती व मनोरंजनकारक ठरते. अशा जीवसृष्टीचा या खंडात समावेश आहे.

**उंदीर –** (९८ सचित्र ) आहे, तसाच उंट (९६ सचित्र) आहे. कावळा (१६९) हा पक्षांतला बुद्धिमान आणि सावध समजला जातो. कासव (१७१ सचित्र) भू- आणि जलचर मंदगतीचा प्राणी. सगळीच कासवे गरीब नसतात तर काही सर्वभक्षक हल्लेखोरही असतात.

**अमिबा –** (४३ सचित्र) हा एकपेशीय आदिजीवांपैकी एक आहे अमिबा ठरावीक आकारमानाइतका वाढला म्हणजे द्विपेशी विभाजनाचा अलैंगिक पद्धतीने याचे प्रजनन होते. यापैकी काही अमिबांच्या संसर्गाने माणसाला काही रोग होतात.

**कस्तुरी मृग –** (पृ. सचित्र) स्तनी वर्गाच्या समखरी गणातील हरणाच्या मृग कुलातील हा प्राणी मध्य व ईशान्य आशिया, काश्मीर, नेपाळ व भूतान येथे आढळतो. यांच्या नरांमध्ये सुगंधी कस्तुरी ग्रंथी असते. यासाठी या प्राण्यांची हत्या केली जाते. यांच्या संरक्षणासाठी जगभर विशेष प्रयत्न केले जात आहेत.

पक्षांचेही जगभरचे विविध नमुने या कोशात दिसतात.

जीवसृष्टी आणि पर्यावरणाचे मानवी जीवनाशी असलेले नातेही या कोशात संशोधक वृत्तीतून सोदाहरण मांडलेले आहे. मानवी जीवसृष्टीमध्ये आरोग्य, आजार, औषधे, अनुवंशिकता याबद्दलची माहिती देणाऱ्या महत्त्वाच्या नोंदी आहेत.

**कुपोषण –** (पृ. १५७) योग्य प्रमाणात अन्न, पोषक द्रव्ये नसलेल्या सकस अन्नाच्या अभावामुळे शरीराला येणारी रोगट स्थिती म्हणजे कुपोषण. शरीराला सातत्याने १,०० कॅलरींपेक्षा कमी ऊर्जा मिळाल्यास कुपोषण उद्‌भवते. आहारात प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांच्या कमतरतेमुळे कुपोषण होते व बरेच आजार संभवतात.

कुमारविश्वकोशाचे बाह्य व अंतरंग पाहताना लक्षात येते ते त्यातील नोंदींचे महत्त्व. या खंडाच्या सुरुवातीलाच लेखक, समीक्षक, भाषांतरकार व अभ्यागत संपादक सूची देण्यात आली आहे. त्यामध्ये प्राणी विज्ञान, रसायन शास्त्र, सूक्ष्मजीव शास्त्र, वनस्पती विज्ञान इ. विविध ज्ञानशाखेतील उच्चविद्याविभूषितांचा समावेश आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या त्या क्षेत्रातील अभ्यासकांनी लिहिलेल्या नोंदीही यात आढळतात. आपापल्या क्षेत्रात सखोल प्रदीर्घ व्यासंग करून ग्रंथ लिहिणे प्रशंसनीय ठरतेच; परंतु, विज्ञान विषयांबद्दल कुमारांना आकलन होऊन आवड निर्माण करणाऱ्या अशा संक्षिप्त नोंदी लिहिणे हे लेखकांचे कौशल्यही इथे मोलाचे ठरते.

**संपर्क : ९३२४२३६८८५**

✦✦

मराठी **कुमार विश्वकोश** जीवसृष्टी आणि पर्यावरण, भाग १

## कुठे मिळेल?

**१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई- ४००००४, दूरध्वनी : २३६३१४३३, २३६३१७९९**


**२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, व ग्रंथकार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ.नजीक, पुणे ४११००१. दूरध्वनी : २६१२५८०८,**

**३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथकार, सिव्हिल लाइन्स, नागपूर- ४४०००१. दूरध्वनी : २५६२६१५**

**४. सहायक संचालक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद -४३१००१, दूरध्वनी क्र. २३३१५२५.**

**५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. दूरध्वनी क्र. २६५०३९५, २६५०४०२.**

**ग्रंथाची किंमत – भाग-१, किंमत- ५०० रुपये.**



# एच.आय.व्ही.ची तपासणी?

सुहेल जमादार

MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

एच.आय.व्ही. म्हणजे, मनुष्याच्या शरीरातील रोग प्रतिकारशक्ती कमी करणारा विषाणू. हा विषाणू मनुष्याच्या शरीरात चार मार्गांनी पसरतो.

१ एकापेक्षा अधिक व्यक्तींसोबत (पुरुष किंवा स्त्री) असुरक्षित लैंगिक संबंध ठेवल्याने

२ एच आय व्ही संसर्गित रक्त घेतल्याने

३ एच आय व्ही संसर्गित सुई किंवा सिरिंजचा वापर केल्याने

४ एच आय व्ही संसर्गित गर्भवती मातेकडून तिच्या होणाऱ्या बाळाला

एखाद्याला एच.आय.व्ही.चा संसर्ग झाला आहे की नाही, हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी रक्ताची तपासणी करणे आवश्यक आहे. ही रक्त तपासणीची सुविधा सरकारी दवाखान्यातील आय.सी.टी.सी. केंद्रात मोफत उपलब्ध आहे.

आय.सी.टी.सी. म्हणजे एकात्मिक सल्ला व तपासणी केंद्र. हे केंद्र सरकारी दवाखान्यामध्ये स्थापन केलेले आहे, जिथे क्लायंटला एच.आय.व्ही. संदर्भातील प्रश्नांची उत्तरे मिळतील, व मोफत तपासणी करून घेता येईल. या आयसीटीसी केंद्रामध्ये समुपदेशक (स्त्री व पुरुष) असतो. तो क्लायंटला एच.आय.व्ही.ची पूर्ण माहिती देतो व एचआयव्हीची तपासणी करावयाची असल्यास पुढील मार्गदर्शन करतो. आय.सी.टी.सी.मधील सुविधांचा लाभ घ्यायचा असल्यास तुम्हाला केस पेपर काढण्याचीसुद्धा गरज नाही. ही सुविधा मोफत दिली जाते. त्याचबरोबर तेथे गोपनीयता म्हणजे, आपले नाव, पत्ता यासारख्या गोष्टींचा कोणत्याही कागदपत्रांवर उल्लेख केला जात नाही, तर आपणाला एक विशिष्ट क्रमांक दिला जातो व त्या क्रमांकावरच सर्व नोंदी ठेवल्या जातात. आपल्या नावावर नाही.

आयसीटीसी केंद्रामध्ये तुमची एच.आय.व्ही.



तपासणी करण्यापूर्वी समुपदेशक एच.आय.व्ही. म्हणजे काय, एच.आय.व्ही. आणि एड्समध्ये काय फरक आहे, कोणत्या कारणांनी एच.आय.व्ही. होऊ शकतो, त्याचबरोबर तपासणीचा निकाल आल्यानंतर (निगेटिव्ह किंवा पॉझिटिव्ह) काय? या विषयाबद्दल आपणाशी बोलतो व त्यानंतर जर तुमची तयारी असेल तर तपासणीसंदर्भात संमतीपत्र लिहून घेतले जाते. त्यानंतरच तपासणीसाठी रक्त देण्याकरिता आपल्याला लॅबमध्ये पाठवितो. एच.आय.व्ही. तपासणी करण्याकरिता रक्त घेतल्यानंतर, तीन वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या रक्ताची एच.आय.व्ही.साठी तपासणी केली जाते व तपासणीचा निष्कर्ष (रिपोर्ट) अवघ्या दोन तासांत दिला जातो. त्यानंतर समुपदेशक तुम्हाला तुमच्या तपासणीचा निकाल (रिपोर्ट) देईल. जर निकाल निगेटिव्ह असेल तर पुढे काय काळजी घेतली पाहिजे की जेणेकरून तुम्हाला एच.आय.व्ही.ला कसा प्रतिबंध करता येईल याबाबतची माहिती देतो. त्याचप्रमाणे जर निकाल पॉझिटिव्ह असेल तर त्याचा अर्थ काय, पुढील निगा व काळजी याबाबत मार्गदर्शन व मानसिक आधार देतो. तुमच्या परवानगीशिवाय तुमच्या एच. आय. व्ही. तपासणीचा रिपोर्ट इतर कोणालाही सांगितला जात नाही. तुमच्या निकालाबद्दल पूर्णपणे गोपनीयता ठेवली जाते हे महत्त्वाचे. जर गर्भवती माता एच आय व्ही संसर्गित असेल तर तिला आय.सी.टी.सी. अंतर्गत स्थापन केलेल्या पीपीटीसीटी (पालकांकडून अर्भकाला होणारा एच.आय.व्ही. संसर्ग प्रतिबंध केंद्र) या केंद्रात नावनोंदणी केली जाते व येथे एच.आय.व्ही. संसर्गित गरोदर मातेकडून तिच्या होणाऱ्या बाळाला एच आय व्ही संसर्ग होऊ नये यासाठी मार्गदर्शन व औषधोपचार केले जातात. चला, तर मनात एच.आय.व्ही.बद्दल प्रश्न असतील, तपासणी करून घ्यावयाची असेल तर जवळच्या सरकारी दवाखान्यातील आय.सी.टी.सी.ला भेट देऊ या. एच.आय.व्ही. संदर्भात अधिक माहितीसाठी साधन हेल्पलाइनशी संपर्क करा :

साधन
हेल्पलाइन
022-2411 4000

**संपर्क – ९४२२४२४८५८**

## शिक्षक

मी एक शिक्षक आहे
शिक्षण हा माझा धर्म आहे
शाळा हे माझे मंदिर आहे
विद्यार्थी हे माझे दैवत आहे
धडपड ही माझी पूजा आहे
'दुरिताचे तिमिर जावो'
ही माझी प्रार्थना आहे
समाजाने दिलेला आशीर्वाद
हाच माझा प्रसाद आहे !

## शिक्षकांसाठी प्रतिज्ञा

- मी निष्ठावान शिक्षक आहे. शिकवण्यावर माझे प्रेम आहे. ते काम मी मनापासून करीन.
- मला फक्त विद्यार्थी घडवायचे नाहीयेत, तर मला युवाशक्ती घडवायचीय. तीच या पृथ्वीतलावरची मोठी संपत्ती आहे.शिकवण्याच्या महत्कार्यासाठी मी कटिबद्ध आहे.
- सर्वसाधारण क्षमतेच्या विद्यार्थ्याला असाधारण कर्तृत्त्व गाजवण्यासाठी प्रवृत्त करणे, हे ध्येय मी ठेवेन. त्या ध्येयाची पूर्ती झाली तरच मला समाधान मिळेल.
- मी माझ्या विद्यार्थ्यांशी अत्यंत प्रेमाने आणि जिव्हाळ्याने वागेन.
- माझी वर्तणूक अशी असेल की, माझ्या वागण्यातून मुलांना योग्य तो संदेश मिळाला पाहिजे.
- माझ्या विद्यार्थ्यांना मी प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य देईन. त्यांनी चौकस व्हावे यासाठी मी त्यांना प्रोत्साहन देईन. त्यातूनच ते कल्पक आणि सर्जक नागरिक बनतील, यावर माझा विश्वास आहे.
- मी सर्व विद्यार्थ्यांशी समानतेने वागेन. धर्म, जात, भाषा अशा कोणत्याही कारणांवरून भेदभाव करणार नाही.
- माझ्या विद्यार्थ्यांना माझ्याकडून उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे, म्हणून मी माझी क्षमता सतत वाढवत नेईन.
- माझ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे छोटे-मोठे यश मी मोठ्या उत्साहाने आणि अभिमानाने साजरे करीन.
- शिक्षक या नात्याने माझे राष्ट्र उभारणीत महत्त्वाचे योगदान आहे, याचे मी भान ठेवीन.
- माझ्या मनाचे कप्पे कायम चांगल्या विचारांनी भरलेले असावेत, माझ्या कृतीतून त्या विचारांचा प्रसार व्हावा आणि माझे विद्यार्थी त्यानुसार घडावे, यासाठी मी कायम प्रयत्न करीन.

– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम,
माजी राष्ट्रपती

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, July 2012.
Date of Publication : 10th of every Month




O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / To :

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे